स्वधर्म सूर्य

डॉ.शैलजा राजवाडे

स्वधर्मसूर्य

लेखिका :
डॉ.शैलजा राजवाडे **M.A., Ph.D.**
Flat No.5, B-9
गुरुराज सोसायटी, पुणे सातारा रोड,
विवेकानंद पुतळ्यामागे, पद्मावती,
पुणे - ४११०३७
(भ्रमणध्वनी : ७७७४८९०४३९)

प्रकाशक :
समर्थ फाऊंडेशन - ठाणे.

अक्षर जुळणी :
श्री. प्रभाकर शं.केतकर

छपाई :
प्रिंटेक्स - ठाणे.

मुखपृष्ठ :
चैत्राली

मूल्य रु.६०/-

स्वधर्म सूर्य

अर्पण-पत्रिका

ज्यांनी आम्हां सर्वांना ‘भगवद्गीता
आणि ज्ञानेश्वरी’च्या वाचनाची,
चिंतन-मननाची गोडी लावली त्या
आमच्या वडिलांच्या
‘श्री.महादेव रघुनाथ लिमये वकील’
यांच्या चरणीं वाहिलेली ही भावपूर्ण
श्रध्दांजली.



डॉ.शैलजा राजवाडे

- मन की बात -

या साडेतीन हात देहाचे पूर्वाश्रमीचे नाव कुसुम महादेव लिमये तर विवाहानंतरचे सौ.शैलजा शंकर राजवाडे.

माझ्या आईला शिक्षणाची खूप हौस, मनापासून आवड म्हणूनच त्या जुन्या काळात तिने आम्हा सर्व भावंडाना 'द्विपदवी'धर केले. त्यावेळी अकरावीचा वर्ग करून मॅट्रीकची परीक्षा होई. दहावीची परीक्षा झाली त्यावेळी कल्पनाही नव्हती की आपण कधी कॉलेजात जाऊ. कारण त्यावेळी जळगावला कॉलेज नव्हते आणि मुलींना पुण्यामुंबईला वसतिगृहात ठेवून शिकविण्याची कल्पना कोणाच्या ध्यानीमनीही नव्हती. त्यामुळे एक वर्षानंतर आपल्या शिक्षणाला पूर्ण विराम मिळणार असे आम्ही मैत्रिणी म्हणत होतो.

पण म्हणतात ना ''ईश्वर देता है तो छप्पर फाडके देता है'' तसे झाले.

त्याच एप्रिल-मे मध्ये (१९४४) जळगावला कॉलेज निघणार असा बोलबाला सुरु झाला. आणि माझ्या मनाला नवी पालवी फुटली. मी वडिलांना मला पण कॉलेजमध्ये घालाल ना? अशी अगदी लाडिकपणे विचारणा केली. वडिलांची एका अटीसह संमती मिळाली. ''मी काही पैसेवाला नाही. एकदा फी भरेन. नापास होशील त्या वर्षी शिक्षणाचा नाद सोडावा लागेल''. त्या अटीला मी तोंडभरून होकार दिला व मॅट्रीक झाल्यावर कॉलेजात प्रवेश घेतला.

खूप धडपड करीत राहिले. यात सिंहाचा वाटा माझ्या आईचा. त्यावेळी दुसरे महायुध्द सुरु होते. त्यामुळे रात्री वीज नसे. समईच्या प्रकाशात अभ्यास. पण आईचे सतत लक्ष असे. मी B.A. ला ऑनर्स घेऊन चांगल्या मार्कांनी पास झाले. आईवडिलांना खूप समाधान वाटले. पुढे M.A. करण्याचीही संधी मिळाली.

नंतर विवाह झाला. माझा सहचर त्यावेळी 'डॉक्टरेट' करीत होता. त्यामुळे ते बीज मनात अंकुरले आणि लग्नानंतर बऱ्याच वर्षांनी दोन्ही मुले समजती झाल्यावर Ph.D करण्याचा विचार सुरु झाला. प्रा.ल.ग.जोग सरांच्या हाताखाली Ph.D केली. त्यावेळी आमचे वास्तव्य 'पणजी' येथे होते. पणजीच्या शिक्षक-प्रशिक्षण महाविद्यालयातून मुदत पूर्व निवृत्ती घेतली व मुलांच्यासह आम्ही पुण्याला स्थाईक झालो. दोन्ही मुले चांगली शिकत

होती. मन आनंदात होते. मुलांचा M.B.A चा निकाल हाती येण्यापूर्वीच पतिराजांना 'हृदयविकारा'चा झटका आला आणि जीवन अंधारमय झाले.

मला एकाकी झाल्यासारखे वाटू लागले, अचानक झालेल्या आघातामुळे. पण माझ्या लहान बहिणीने मला हात दिला. तिनेच मुलीच्या लग्नाची सर्व जबाबदारी स्वीकारली. मुलगा पण उद्योगाला लागला. तरीपण मनाची उमेद गेली ती गेलीच.

खरे पहाता ती 'अर्थ शास्त्रा'ची प्राध्यापिका. त्या विषयात तिला भरपूर गती. पण त्याबरोबरच भगवद्‌गीता आणि उपनिषदांचा अभ्यास हा तिचा छंद. त्यामुळे तिच्याशी वारंवार संवाद होई. त्यामुळे आध्यात्मिक विचारांना प्रोत्साहन मिळत गेले. पण तिचे आभार मानून राग ओढवून घेण्याची इच्छा नाही. भावना उत्कट होतात तेव्हा शब्द मुके होतात म्हणून हे मौन.

त्याचवेळी माझ्या एका मैत्रिणीने मला 'ज्येष्ठांनो, सेतू बांधा रे' या विषयावर लेखन करण्याचा आग्रह केला. त्या आग्रहाखातर केलेले लिखाण बक्षीसपात्र ठरले आणि दु:खाचा भागाकार करणाऱ्या लिखाणाचे व्यसनच जडले. तिच्याही ऋणातून मुक्त होण्याची इच्छा नाही.

माझी मुलगी आणि मुलगा यांच्या मनातील माझ्याबद्दल असलेल्या आत्मियतेने मला वृध्दापकाळाची चिंता कशी ती वाटलीच नाही आणि म्हणूनच मी खऱ्या अर्थाने 'वानप्रस्थाश्रमा'चे आचरण करीत आनंदाने जगते आहे.

सकाळचा वेळ त्या परमेश्वराचे पूजन, भजन, मनन करते. दुपारी वाचन, लेखन यात दिवस कसा जातो ते समजतच नाही. त्यातच 'समर्थ फाऊंडेशन' या संस्थेला सहकार्य करण्याची संधी मिळाली. त्या संस्थेने चालविलेल्या 'चिंतन' या दिवाळी अंकात लेख लिहू लागले. लेखन बऱ्यापैकी जमू लागल्याने इतरही मासिकातून लेख पाठवू लागले. आता दिवाळीच्या सुमारास लेख लिहिण्याची एकच लगीनघाई असते. त्यासाठी आधीपासूनच दु:खाचा भागाकार व आनंदाचा गुणाकार करणारे वाचन लेखन वर्षभर सतत चालू ठेवावे लागते.

लेखांना वाचकांकडून मिळालेला पसंतीचा, कौतुकाचा प्रतिसाद व मैत्रिणींचा न मोडता येणारा आग्रह म्हणजेच आजचा पुस्तक लिहून छापण्याचा संकल्प.

खरे तर लिखाण करण्याशिवाय माझा यात काहीच सहभाग नाही. इतर सर्व धडपड आणि प्रयत्न आहेत ते 'चिंतन'च्या दिवाळी मासिकाचे संपादक 'श्री.सुरेंद्र केतकर' यांचे. पण त्यांचेही शाब्दिक आभार मानण्यात मला तरी रस नाही आणि त्यांनाही ते आवडणार नाही.

माझ्या लेखांप्रमाणेच माझ्या या पुस्तकाचाही वाचकांनी मनापासून स्वीकार करावा ही आस मात्र मनी आहे. म्हणूनच यदाकदाचित् या पुस्तकाला चांगला प्रतिसाद मिळाला व पुस्तकाची विक्री झाली तर मिळणारी लक्ष्मी 'समर्थ फाऊंडेशन'च्या सत्कार्याला अर्पण करण्याची मनिषा असणारी.

आपली

डॉ.शैलजा राजवाडे

समर्थ फाऊंडेशनचा अल्पसा परियच

'समर्थ फाऊंडेशन' म्हणजे संत श्रेष्ठ समर्थ रामदासांच्या जीवनकार्याचा प्रचार आणि प्रसार करणारी एक सेवाभावी संस्था.

या संस्थेतर्फे २००९ पासून दरवर्षी 'चिंतन' नावाचा दिवाळी अंक निघतो आणि समर्थांच्या आशीर्वादाने दरवर्षी या मासिकाला बक्षीस मिळते.

समर्थ फाऊंडेशनने आसनगावजवळ असलेला 'तासपाडा' नावाचा आदिवासी पाडा दत्तक घेतला आहे. त्या पाड्याची बरीच सुधारणा होत आहे. पाणी, शाळा इ. दोन शिवणमशिन भेट म्हणून मिळाल्यामुळे तेथील महिला आता 'पिशव्या' 'गाऊन' शिवण्यास शिकल्या आहेत.

समर्थ फाऊंडेशनचे अन्य उपक्रम

१. ६.७.२००२ रोजी सहयोग मंदीर, ठाणे येथे पाठांतर स्पर्धेचे आयोजन करुन ह्या शुभकार्याची मुहूर्तमेढ रोवली. ८ ते १२ वर्षे वयोगटातील ९६ मुलामुलींनी खणखणीत आवाजात मारुती स्तोत्र व मनाचे श्लोक म्हणून घंटाळी परिसर भारुन टाकला. संस्थेच्या सल्लागार डॉ.सौ.विजया वाड यांच्या हस्ते बक्षिस समारंभ पार पडला.

२. ७.१२.२००३ रोजी अभिनव विद्यामंदिर, कल्याण येथे ‘सुंदर हस्ताक्षर व शुध्द लेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. अठरा शाळांतील २०४ विद्यार्थ्यांनी त्यात भाग घेतला होता. त्याचा बक्षिस समारंभ कलाकार व नाट्यदिग्दर्शक श्री.लीलाधर कांबळी यांच्या हस्ते पार पडला. सर्व विद्यार्थ्यांना प्रा.श्री.राम कापसे यांची सही असलेली लॅमिनेटेड प्रशस्तीपत्रके आणि स्मृतीचिन्हे वाटण्यात आली.

३. शनिवार तारिख १४ फेब्रुवारी २००४ श्री रामदास नवमी रोजी समर्थ फाऊंडेशन तर्फे दोन कार्यक्रम करण्यात आले. मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाणे येथे ‘तोचि येक रामदास’ या जनार्दन ओक लिखित कादंबरीचे प्रकाशन, ज्येष्ठ साहित्यिक श्री.सुभाष भेंडे यांच्या हस्ते करण्यात आले आणि ठाणे येथील रिक्षा मालक व चालक श्री.रामजनम बैजनाथ यादव जे गेली ६ वर्षे आपल्या रिक्षेतून अपंगांना विनामुल्य सेवा देत आहेत, त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांचा सत्कार ‘समर्थ फाऊंडेशन चे सल्लागार पद्मश्री श्री.कुमार केतकर यांच्या हस्ते करण्यात आला.

४. ११ जून २००४ रोजी दापोडी (पुणे) येथे घेण्यात आलेल्या ‘सुंदर हस्ताक्षर व शुध्दलेखन स्पर्धेचा बक्षिस समारंभ सुप्रसिध्द साहित्यिक श्री.रवीन्द्र भट व सुप्रसिध्द कलाकार श्री. प्रकाश इनामदार यांचे हस्ते संपन्न झाला. या स्पर्धेत १८ शाळांमधील ३०७ विद्यार्थी सहभागी झाले होते.

५. दासनवमीच्या निमित्ताने २७ मार्च २००५ रोजी ठाण्यातील २१ शाळांमधून ‘चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या या स्पर्धांना प्रचंड प्रतिसाद मिळाला. या स्पर्धेत ८१७ विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. या स्पर्धेचा बक्षिस समारंभ अध्यक्ष श्री.पां.के.दातार व प्रमुख पाहुणे किर्तनकार श्री.चारुदत्त आफळे यांचे हस्ते संपन्न झाला.

६. जि.प.मुलांची प्राथमिक शाळा आसनगाव व संत गाडगेमहाराज आश्रमशाळा, वाशिंद, ता. शहापूर, जि.ठाणे, यांना पिण्याचे पाण्यासाठी स्टीलची कॉक असलेली दोन मोठी पिंपे देण्यात आली.

७. अनुदानित आदिवासी आश्रमशाळा खडवली, ता.कल्याण, जि. ठाणे यांना, विद्यार्थ्यांना झोपण्यासाठी १० बाय १२ च्या ६ सतरंज्या देण्यात

आल्या.

८. शुक्रवार ३ एप्रिल २००९ 'श्रीरामनवमीचे' औचित्य साधून माथेरान येथील श्रीराममंदिरात १ ली ते ७ वी च्या विद्यार्थ्यांची 'मनाचे श्लोक व श्री मारुतीस्तोत्र पाठांतर स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेचा बक्षिस समारंभ नगराध्यक्ष मा.श्री.मनोज खेडकर यांचे हस्ते संपन्न झाला. इयत्ता ७ वी मधील दोन विजेत्या मुलांना व्यायामासाठी डंबेल्स देण्यात आली.

९. श्री रामदास नवमी ७ फेब्रुवारी (रविवार) २००८ रोजी आसनगाव जवळील 'तासपाडा' या आदीवासी पाड्यावरील २०० जणांना अन्नदान व वस्त्रदान केले. (लहान मुला-मुलींना सकाळी दूध-बिस्कीट-नाश्ता व नंतर सर्वांना प्रसादाचे जेवण देण्यात आले. तत्पूर्वी मुलांना गोष्टी सांगितल्या. तसेच त्यांचेकडून 'मनाचे श्लोक' म्हणून घेण्यात आले.)

१०. श्री रामनवमीचे सप्ताहात माथेरान येथील सरस्वती विद्यामंदिर व जिल्हा परिषद शाळेतील मुलामुलींची 'शुध्दलेखन व सुंदर हस्ताक्षर' व दोरीच्या उड्यांची स्पर्धा घेण्यात आली त्यात १७५ मुलामुलींचा सहभाग होता. संतसाहित्याच्या अभ्यासक श्रीमती शैलजा राजवाडे यांचे हस्ते श्रीराम मंदिर माथेरान येथे रामनवमीचे दिवशी बक्षिस समारंभ झाला. २०.दरवर्षी दिवाळीपूर्वी 'तासपाडा' येथील २०० आदिवासींना फराळ व मुलांना फुलबाज्यांचे वाटप करण्यात येते.

११. सोमवार दि.२० मे २०१३ रोजी 'तासपाडा' येथे बांधलेल्या हनुमान मंदिरात दक्षिणमुखी मारुतीच्या मूर्तीची रितसर प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. तसेच कळसही बसविण्यात आला. हे दोन्ही विधी श्री परागबुवा रामदासी यांचे हस्ते झाले.

।। जय जय रघूवीर समर्थ।।

।। स्वधर्मे निधनं श्रेय: परधर्मो भयावह: ।।

गुरूर्ब्रह्मा गुरूर्विष्णु : गुरूर्देवो महेश्वरः ।
गुरूसाक्षात् परब्रह्म तस्मै श्री गुरवे नमः ।।

अशी गुरूचरणी प्रार्थना करून मी माझ्या लेखनाला प्रारंभ करते.

अर्जुन - जो स्वभावत:च वीरवृत्तीचा आहे, क्षत्रिय असल्याने क्षत्रियकर्म हा ज्याचा 'स्वधर्म' आहे. त्याप्रमाणे युध्द करण्यासाठी युध्दभूमीवर आलेला अर्जुन स्वत:ला कोणाकोणाशी लढणे योग्य होईल, हे ठरविण्यासाठी दोन्ही सैन्यांच्या मध्यभागी रथ उभा करण्यास आपल्या सारथ्याला म्हणजेच श्रीकृष्णाला सांगतो. त्याप्रमाणे श्रीकृष्णाने रथ उभा केल्यावर अर्जुनाने दोन्ही सैन्यांमध्ये आपले जवळचे नातलग, मित्र, सगेसोयरे पाहिले आणि - ऐन युध्दाच्या वेळी, रणांगणात उभा ठाकल्यावर, उगाचच शौर्याच्या बढाया मारणाऱ्या 'उत्तर' नावाच्या राजपुत्राप्रमाणे भीतीपोटी नव्हे तर माझ्या गुरूवर्यांवर, आजोबांवर, बांधवांवर मी बाण कसे मारू त्यांना ठार कसे मारू? अशी वीरवृत्तीला न शोभणारी करूणा - एक प्रकारचा मोह - मनात खोलवर रूजल्यामुळे, दिङ्मूढ होत्साता, हातातले शस्त्र टाकून देऊन, 'माझी भ्याड अशी अपकीर्ती झाली तरी चालेल, मला भिक्षा मागून जीवन व्यतीत करावे लागले तरीही चालेल, शत्रूनेच मला ठार मारले तरी हरकत नाही पण मी युध्द करण्याचे हे महत्पाप करणार नाही' अशा दृढ निश्चयाने रथाच्या मागील भागात जाऊन बसला. अशा मोहामुळे, दु:खाने मन उव्दिग्न झालेल्या अर्जुनाला युध्द करण्यास प्रवृत्त करण्यासाठी श्रीकृष्णाने केलेला उपदेश म्हणजेच 'गीता.'

अर्जुन हा लौकिक नात्याने श्रीकृष्णाचा मेव्हणा असला तरी श्रीकृष्णाचा अत्यंत प्रिय असा सखा आहे. त्याची अनन्य भावाने भक्ती करणारा भक्त आहे. 'प्रेयस' नव्हे तर 'श्रेयस' आचरण्याची तयारी असलेला 'धीरोदात्त' पुरूष आहे. आणि म्हणूनच त्याने 'स्वधर्म' आचरावा या भावनेने नानाप्रकारे त्याची समजूत घालण्यासाठी प्रत्यक्ष भगवन्ताने गायलेले असे जणू हे गीत आहे. या भाऊकपणामुळे त्यात गोडवा आला आहे.

तरीही ‘गीत’ हा अकारान्त नपुं. लिंगी शब्द न स्विकारता ‘गीता असे आकारान्त स्त्रीलिंगी रूप करून त्याला ‘वात्सल्यरूप’ दिले आहे. आई ज्याप्रमाणे आपले मनोगत गोडगोड शब्दात सांगते, नाना प्रकाराने समजावते पण आपल्या अपत्याकडून त्याच्या कल्याणाचे असेल, हिताचे असेल तेच करवून घेते. त्याप्रमाणे श्रीकृष्णाने करूणेपोटी खोलवर उत्पन्न झालेल्या विषादामुळे निष्क्रिय झालेल्या अर्जुनाची ममतेने, मायेने समजूत घालून त्याच्याकडून त्याचा जो ‘स्वधर्म’ म्हणजे अन्यायाचा प्रतिकार करून न्यायाची, नीतीची, धर्माची प्रतिस्थापना करण्यासाठी आवश्यक असलेले युध्द करून - अन्याय - अत्याचार करणारांना, अनीतीने वागणारांना ठार मारण्याचे जे ‘क्षत्रीयकर्म’ ते करवून घेतले आहे.

आणि तेही त्यांच्यावर जबरदस्ती करून, धाकधपटशा दाखवून नव्हे तर त्याला पटवून देऊन गीतेच्या १८ व्या अध्यायातील ६३ व्या श्लोकात श्रीकृष्णाने स्पष्ट सांगितले आहे की,

इति ते ज्ञानमाख्यातं गुहयाद् गुहयतरं मया ।
विपृश्यैतदशेषेण यथेच्छसि तथा कुरू ।।६३।। अध्याय १८

अर्थ असा - गुढाहूनही अत्यन्त गूढ असे हे ज्ञान मी तुला सांगितले, त्याचा पूर्णपणे विचार कर आणि मगच तुझ्या इच्छेस येईल त्याप्रमाणे कर. श्रीकृष्ण स्वच्छच सांगतो आहे. ‘यथा इच्छसि तथा कुरू’ - तुझ्या मनाप्रमाणे वाग.

पण गंमत अशी आहे की, श्रीकृष्णाने शिष्याला सर्व काही इतके समजावून सांगितले आहे की, याच अध्यायात ७३ व्या श्लोकात अर्जुन स्पष्ट कबुल करतो की - नष्टो मोह: स्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादान्मयाच्युत।
स्थितोऽस्मि गतसन्देह: करिष्ये वचनं तव ।।७३।। १८ अध्याय

अर्थ असा - हे अच्युता, तुझ्या कृपेमुळे (माझा) मोह नष्ट झाला आहे, मला माझ्या खऱ्या स्वरूपाचे म्हणजे मी क्षत्रीय असल्याचे स्मरण झाले आहे, मी संशयरहित झाल्याने माझ्या कर्तव्याची जाणीव मला झाली आहे. आता तुझ्या आज्ञेप्रमाणे, इच्छेनुसार युध्द करण्यास मी तयार आहे (की ज्यामुळे अन्याय अत्याचार नाहीसा होईल व धर्माची प्रतिस्थापना होईल.)

अशा प्रकारे अर्जुन युध्द करण्यास तयार झाला. पुढील कथाभाग सर्वांना ज्ञात आहेच.

पण असा हा प्रभावी उपदेश केवळ एकट्या अर्जुना पुरताच मर्यादित नाही किंवा त्याने युध्द करावे एवढ्यापुरताच प्रासंगिकही नाही तर मानवी जीवनात उपयोगी असलेल्या शाश्वत - मूल्यांचा वस्तुनिष्ठ पध्दतीने केलेला विचार सांगणारे ते एक स्मृतिर्लब्धा 'शास्त्र' आहे. भगवन्त स्वत:च १५ व्या अध्यायात २० व्या श्लोकात १ल्याच ओळीत सांगत आहेत की - इति गुह्यतमं शास्त्रमिदमुक्तं मयानघ।। अर्थ असा अनघा, अघ म्हणजे पाप. अनघ म्हणजे ज्याने एकही पाप केले नाही असा -पुण्यात्मा-पुण्यकर्मा. प्रत्यक्ष श्रीकृष्णानेच त्याला हे नामाभिदान दिले आहे यावरून अर्जुनाची योग्यता ध्यानी यावी.

याशिवाय प्रत्येक अध्यायाच्या शेवटी 'ॐ तत्सदिति श्रीमद् भगवत्गीतासुउपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुन संवादे नंतर त्या अध्यायाचे नाव व त्या अध्यायाचा क्रमांक येतो स्वत: भगवन्तानेच गीता हे 'योगशास्त्र' आहे असे म्हटले आहे.

तेव्हा आता 'शास्त्र' म्हणजे काय? हे समजून घेणे आवश्यक आहे हे ओघानेच येते. शास्त्र म्हणजे एखादी कथा, कहाणी किंवा काव्य नाही हे उघडच आहे. पण एका विशिष्ट मानव समुहासाठी, विशिष्ट स्थळकालापुरते केलेले विधान वा बोधही नाही तर शास्त्र सर्वांच्यासाठी, सर्वकाळासाठी, सार्वत्रिक असे कायमस्वरूपी जे 'वैश्विक सत्य' त्याचाच शोध घेणे असते. ते 'सत्य' सांगण्याचे काम 'शास्त्र' करते. उदाहरण देऊन स्पष्ट करूया पहा - दोन अधिक दोन बरोबर चार (२+२=४) हे गणितातील एक सत्य आहे, प्रमेय आहे. हे भारतात सत्य आहे तितकेच ते अमेरिकेत आहे, तितकेच रशियातही आहे, तितकेच एखाद्या खेड्यातही आहे. कुठेही ते सत्यच आहे. आज जितके सत्य आहे, तितकेच ते काल सत्य होते व उद्याही राहणार आहे. जगाच्या पाठीवर कोणत्याही देशात तसेच कोणत्याही काळात ते सत्यच आहे म्हणून हे प्रमेय सांगणारे - सत्य सांगणारे 'गणित' हे एक शास्त्र आहे.

तसेच 'गीता' हेही एक शास्त्र आहे. पण ते, शास्त्र सांगण्याच्या काहीशा रूक्ष पध्दतीने, शास्त्रीय सूत्राच्या भाषेत न सांगता 'सत्यंब्रूयात्, प्रियंब्रूयात्' अर्थ असा 'खरे असेल तेच सांगा पण गोड बोलून सांगा' या वेदवाक्याप्रमाणे प्रियतम पध्दतीने श्लोकबध्द केल्याने गेय करून सांगितले आहे. गेय झाले आहे.

अर्थात् याचे सर्व श्रेय आपल्याला 'व्यासमहर्षिना' द्यावे लागेल. आज आपणासमोर असलेली गीता ही श्रीकृष्ण आणि अर्जुन यांच्यामध्ये ऐन रणधुमाळीच्यावेळी रणांगणावर जसा मोकळा संवाद झाला असेल त्या संक्षिप्त स्वरूपात नाही तर व्यास महर्षिंनी त्या संवादातील भावार्थाचा जराही आपलाप होऊ न देता आशयाच्या स्वरूपाप्रमाणे विस्तृत स्वरूपात निरनिराळया 'अठरा' अध्यायात विभागून त्याला अर्थवाही करून, त्यात गेयता आणून महाभारतात ग्रंथित केलेल्या श्लोकांच्या स्वरूपात आहे.

गीतेतील दिङ्मूढ झालेला अर्जुन हे सामान्य माणसाचे प्रतीक मानले असावे असे वाटल्यावाचून रहात नाही. योग्यतेच्या दृष्टीने विचार केला तर अर्जुन सामान्य माणसापेक्षा कितीतरी वरच्या पायरीवर आहे हे निर्विवाद. म्हणूनच त्याला जीवनात कधी नव्हे तो एकदाच विषाद उत्पन झाला, मोह झाला आणि तो गोंधळला. आपण - सामान्य लोक आपल्या आयुष्यात कितीतरी वेळा मोहाच्या आहारी जातो, गोंधळतो, अशा संभ्रमित अवस्थेचा अनुभव अनेकवार घेत असतो. खरे तर अर्जुनासारख्याला विषाद उत्पन्न झाला म्हणून तर यशस्वी जीवनाचे रहस्य सांगणारी 'गीतामाऊली' आपल्याला लाभली. तसे पाहिले तर अर्जुनाचे आपल्यावर हे मोठेच उपकार आहेत. आणि 'व्यासमहर्षीं'चे तर ऋण फेडता येणारच नाही.

अर्जुनाचा संभ्रम दूर करून योग्य मार्गावर आणण्यासाठी श्रीकृष्णासारखा सखा, त्याला म्हणून लाभला. असा मार्गदर्शक सखा आपल्यासारख्या पामरांना कोठून हो मिळणार? आणि हे ध्यानी घेऊनच की काय आपल्यासारख्या सामान्य माणसांच्या कल्याणाचाच सतत विचार करीत असलेल्या व्यासमहर्षिंनी श्रीकृष्णाचा उपदेश श्लोकबध्द करून अजरामर केला आहे की, जेणेकरून या उपदेशाच्या आधाराने व्यवहार

करून सामान्य माणूसही आपल्या जीवनाचे सोने करून घेऊ शकेल, हे मी म्हणत नाही तर प्रत्यक्ष ज्ञानेश्वरांनीच १८ व्या अध्यायातील १६८६ व्या ओवीत स्पष्ट म्हंटले आहे.

'कैसा विश्वाचिया कृपा। करूनि महानंद सोपा। अर्जुनव्याजें रूपा।।
आणिला देवे।। १६८६।। अध्याय १८'

म्हणूनच मी म्हणणार आहे की 'गीता' एखाद्या कादंबरीप्रमाणे वाचून ठेवून द्यावा असा ग्रंथ नाही तर वारंवार किंबहूना रोज थोडा तरी वाचत राहिले पाहिजे. इतकेच नव्हे तर वाचलेल्या भागाचे सतत मनन करीत राहिले पाहिजे, तरच मन ज्यावेळी संभ्रमात पडेल, गोंधळेल, नको त्या विचारांचा पगडा मनावर बसू लागेल तेव्हा आपलेच मन विवेक करून आपल्याला योग्य मार्गदर्शन करू शकेल आणि अनुचित कर्म आपल्या हातून होणार नाही. कारण गीता हे जीवनातील धर्म-अधर्म, कर्तव्य-अकर्तव्य, नीती-अनिती, सत्य-असत्य, चांगले-वाईट, दैवी-असुरी, योग्य-अयोग्य अशा अनेक महत्वाच्या द्वंद्वाचा विचार करून त्यांना विवेकपूर्ण उत्तर देणारे नीतीशास्त्र अथवा जीवनशास्त्र आहे. यालाच गीतेमध्ये 'योगशास्त्र' असे संबोधले आहे. आणि म्हणूनच गीतेच्या मार्गदर्शनाप्रमाणे जीवन जगणाराला कधीही पश्चाताप करण्याची पाळी येणार नाही. अशा माणसालाच 'ज्ञानेश्वरांनी ग्रंथोपजीवीये' म्हटले आहे.

असे जीवन यशस्वीपणे जगून मिळालेल्या नरदेहाचे सार्थक कसे करून घ्यावे हे समजावून सांगणाऱ्या गीतेच्या 'कर्मयोग' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या तिसऱ्या अध्यायातील ३५ साव्या श्लोकाचा तिसरा व चौथा चरण आहे. स्वधर्मे निधनं श्रेय: परधर्मो भयावह: ।।३५।। अध्याय ३ रा. हीच ओळ आपण आपल्या प्रकट चिंतनासाठी घेतलेली आहे. तो पूर्ण श्लोक असा आहे. श्रेयान्स्वधर्मो विगुण: परधर्मात्स्वनुष्ठितात्। स्वधर्मे निधनं श्रेय:परधर्मो भयावह:।। ३५।। अध्याय ३ रा.

अन्वय असा - स्वनुष्ठितात् परधर्मात् स्वधर्म: निगुण: (अपि सन्) श्रेयान्। (तस्मात्) स्वधर्मे निधनं (अपि) श्रेय:(किन्तु) परधर्म: भयावह: (अस्ति)।। अर्थ असा - उत्तम प्रकारे व्यवहारात असलेल्या, लोकांमध्ये

प्रतिष्ठा प्राप्त झालेल्या परधर्मापेक्षा स्वधर्म गुणाने उणा म्हणजे कमी प्रतीचा असला (किंबहुना) आचरण्यास कठीण वाटत असला, तरीही तोच आचरणे श्रेयस्कर म्हणजे कल्याणप्रद असते. प्रसंगी स्वधर्म आचरत असताना मरण पत्करावे लागले तरीही स्वधर्म टाकून परधर्म म्हणजे दुसऱ्याचा धर्म आचरू नये असा परधर्म आचरणे भयप्रद असते. नुकसान करणारे, हानी करणारे असते.

अर्जुन क्षत्रिय होता. तेव्हा न्यायाच्या प्रस्थापनेसाठी, प्रजेच्या - लोकांच्या कल्याणासाठी अन्याय दूर करणे व धर्माची पुन: प्रतिस्थापना करणे हा त्याचा ‘स्वधर्म’ होता. साम, दाम, दंडादि सर्व उपाय थकले होते. कृष्णशिष्ठाई ही निष्फळ ठरली होती. ‘देवाधिदेव शंकरा’ बरोबरही युध्द करून त्याने त्यांच्याकडून ‘पाशुपत’ अस्त्र मिळविले होते. तेव्हा अर्जुनाला युध्दाची भीती वाटत होती असाही भाग नव्हता. खरे तर तो युध्दासाठीच रणांगणावर आलेला होता. पण माझ्या नातेवाईकांना, गुरूवर्यांना कसे मारू अशी क्षत्रियाला न शोभणारी अशी करूणा (मोह) त्याच्या मनात अवेळी उत्पन्न झाल्यामुळे त्याची ‘वीरवृत्ती’ त्याला सोडून गेली आणि तो दिङ्मूढ झाला. ज्ञानेश्वरांनी या प्रसंगासाठी फारच सुंदर असे रूपक केले आहे. ते म्हणतात ‘अर्जुन क्षत्रिय होता. त्यामुळे त्याचे लग्न झालेले होते ‘वीरवृत्ती’शी. पण अचानक वीरवृत्तीची जणू ‘सवत’ अशी ‘करूणा’ अर्जुनाच्या मनात उदित झाल्यामुळे, ‘ते तेथ मनीं गजबज जाहाली। आणि आपैसी कृपा आली। तेणें अपमाने निघाली। वीरवृत्ती ।।१८५।। जिया उत्तमे कुळींचिया होती। आणि गुणलावण्य आयी। तिया आणिकातें न साहती। सुतेजपणे।।१८६।। त्या प्रसंगी (अर्जुनाच्या) मनात गडबड उडाली आणि सहजच करूणा उत्पन्न झाली. उच्चकुळातील रूप गुणसंपन्न स्त्रियांना अंगच्या पाणीदारपणामुळे सवतीचे वर्चस्व सहन होत नाही. त्या अपमानाने त्याची वीरवृत्ती निघून गेली. कारण तिची जागा अवेळी उत्पन्न झालेल्या मोहाने करूणेने घेतली होती. म्हणूनच तो युध्द करण्यास तयार नव्हता जो खरे तर त्याचा ‘स्वधर्म’ होता. भिक्षा मागून जीवन जगणे त्याला मान्य होते पण भिक्षेवर जीवन जगणे हे ब्राह्मणांचे काम - त्यांचा तो स्वधर्म असला तरी अर्जुनाचा तो ‘परधर्म’ होता. आत्ता जरी त्याला तो योग्य वाटला असला तरी तो मरायलाही तयार

होता. पण तेही उचित नव्हते. युध्द न करता मरण पत्करणे अर्जुनासख्या योध्द्याला शोभा देणारे नव्हते. शिवाय दुर्योधन दु:शासनादी लोकांचे त्यामुळे फावणार होते. ते त्याची 'भ्याड' 'नामर्द' अशीच संभावना करणार होते. इतकेच नाही तर समाजात अन्याय - अत्याचार बोकाळणार होता. धर्माची पायमल्ली होणार होती, म्हणूनच श्रीकृष्ण त्याला परोपरीने समजावून सांगत होता. मरणच पत्कारायचे तर युध्द करताना मेलास तर स्वर्ग प्राप्त होईल. आणि जिंकलास तर या पृथ्वीचे राज्य मिळेल. शिवाय दुर्योधनादी दृष्टांचा नाश होईल, संत सज्जनांना अभय मिळेल, धर्माची पुन: प्रतिस्थापना होईल. तेव्हा मरणच पत्कारायचे तर युध्द करणे हा जो तुझा 'स्वधर्म' आहे, तो सोडू नकोस. खरा योध्दा मरणाला कधीच भीत नाही. पण युध्दातून असे पलायन करणे तुझ्यासारख्याला शोभा देत नाही. त्यापेक्षा 'स्वधर्म' आचरताना मरण आले तर ते नि:संशय कल्याणप्रद आहे, श्रेयस्कर आहे.

या श्लोकावर भाष्य करताना ज्ञानेश्वर म्हणतात 'अगा स्वधर्मु हा आपुला। जरी का कठिणु जाहला। तरी हाचि अनुष्ठिला। भला देखे।।२१९।। येरू आचारू जो परावा। तो देखता कीर बरवा। परि आचरतेनि आचरावा। आपुलाचि ।।२२०।। अर्थ असा - अरे आपला स्वत:चा धर्म आचरण्यास कठीण जरी असला तरी त्याचेच आचरण करावे दुसऱ्याचा धर्म खरोखर दिसण्यात चांगला जरी दिसला तरी आचरण करणाराने आपणांस विहित असलेल्या कर्माचेच आचरण करावे. हे समजावण्यासाठी पुढच्या ओवीत सुंदर दृष्टांन्त दिला आहे. ते म्हणतात 'सांगे शूद्रघरीं आघवीं। पक्कान्ने आहाति बरवी। ती द्विजे केवी सेवावीं। दुर्बळु जरी जाहला।।२२१।।' अर्थ असा शूद्राच्या घरी सर्व चांगली पक्कान्ने आहेत. ती, ब्राह्मण जरी दरिद्री असला तरी त्याने कशी बरे खावीत ते योग्य होणार नाही.

सद्यस्थितीत ज्ञानेश्वरांच्या या दृष्टान्तावर मोठ्ठा आक्षेप घेऊन हल्लाबोल होण्याची शक्यता आहे, म्हणुनच प्रथमच त्याचे स्पष्टीकरण करावे हे योग्य. येथे शूद्र आणि ब्राह्मण या शब्दांचे अर्थ आपण आज ज्या अर्थाने या शब्दांचा उपयोग करतो त्या अर्थाने घ्यावयाचे नाहीत. ज्ञानेश्वरांचा काळ म्हणजे १२वे शतक. त्या काळातील स्थिती भिन्न होती. त्यातून ज्ञानेश्वर गीतेवर

भाष्य करीत आहेत. गीतेतील चातुर्वर्ण्य -व्यवस्था गुणकर्मावर आधारलेली आहे. ४थ्या अध्यायातील १३व्या श्लोकात भगवान् स्वत:च सांगत आहेत. 'चातुर्वर्ण्यं' मया सृष्टं गुणकर्म विभागश:।। श्रीकृष्णने निर्माण केलेली चारवर्णांची व्यवस्था जन्मावर आधारलेली नाही तर त्या त्या व्यक्तीजवळ असलेली जन्मजात वैशिष्टये, त्याने आवडीने, मनापासून स्विकारलेले कर्म यावर आधारीत आहे. (हल्लीप्रमाणे जन्मावर आधारलेली नाही).

ईश्वर एकाच चेहऱ्याची माणसे जन्माला घालत नाही. त्याची प्रतिमा दुबळी नाही. तर संपन्न आहे, म्हणून तो शेकडो रंगाची, शेकडो गंधाची फुले फुलवितो, निरनिराळ्या आकाराची, निरनिराळ्या चेहऱ्यामोहऱ्याची, भिन्नभिन्न बुध्दीमत्तेची माणसेही जन्माला घालतो. एकासारखा दुसरा सापडणे कठीण. परमेश्वराची ही निर्मिती म्हणजे एखाद्या यंत्रातून काढलेले ठराविक साच्याचे ठोकळे नव्हे तर त्याच्या सृजनतेत विविधता आहे. या विविधतेतही एक सौंदर्य आहे. तसेच या विविधतेत एक प्रकारचे समत्वही आहे.

माणसे दिसण्यात जशी एकाच रूपाची नाहीत, तशीच ती एकाच प्रकारचे गुणवैशिष्ट्ये असलेली, एकाच स्वभावाची, एकाच आवडी निवडीची नाहीत. प्रत्येकाचा स्वभाव निराळा, आवडनिवड निराळी म्हणूनच आपण म्हणतो 'व्यक्ती तितक्या प्रकृती'. असे असले तरी या विविधतेत एक समत्वही आहे. गीता अधिकार भेदही जाणते. म्हणूनच सर्वानी एकाच प्रकारचे कार्य करावे असे सांगत नाही. तर प्रत्येकाने आपआपल्या जन्मजात गुणवैशिष्ट्यांचा, स्वभावाचा, आवडी निवडीचा विचार करून कार्य करावे. प्रत्येकाने स्वत:च्या योग्यतेप्रमाणे कार्य करावे व ते समजून घ्यावे. अशी अधिकारपरत्वे केलेली कामे भिन्नभिन्न असली तरी ती सर्व कर्मे ईश्वराला म्हणजेच समाज पुरूषाला अर्पण केली की त्यात समत्व येते. या अर्थाने कर्मामध्ये विविधता पण त्या विविधतेत 'समत्व-एकता' गीता सांगते.

ज्याप्रमाणे मोटारीला मोठ्या चाकापासून तो लहानशा स्क्रूपर्यंत सर्वांची सारखीच गरज असते. त्या सर्वांना मोटारीच्या सृष्टीत समान महत्व असते. त्यापैकी प्रत्येकाला त्याचे त्याचे योग्य असे एक स्थान आहे, एक क्रिया आहे. एखाद्या लहानशा स्क्रू वाचूनही मोटारीचा सांगाडा अपूर्ण राहू शकतो.

निकामी ठरू शकतो. तसेच विश्वरूपी मोटारीत प्रत्येक लहानमोठ्या व्यक्तिला स्थान आहे. त्याचे त्याचे असे एक कार्यही आहे. त्या कार्यालाही त्याचे असे महत्वही आहे. अशा विविध गुणधर्म असलेल्या, विविध आवडीनिवडीनुसार विविध कार्ये करणाऱ्या माणसांची समाजाला गरजही आहे. तरच हा विश्वाचा गाडा योग्य मार्गावर चालू शकेल. प्रत्येकाच्या वाट्याला आलेले हे विहित कर्म म्हणजेच त्याचा 'स्व-धर्म' असे म्हटले तर वावगे ठरू नये. मोटारीत ज्याप्रमाणे इकडचा भाग तिकडे बसवून चालणार नाही. त्याप्रमाणे माणसालाही 'स्वधर्माचरणा' ऐवजी 'परधर्माचरण' करून चालणार नाही. असो.

ज्याप्रमाणे 'गंध' हा निकष मानला तर गंध असलेली म्हणजे 'सुगंधी' व गंध नसलेली म्हणजे 'गंधहीन' अशी फुलांची विभागणी दोन प्रकारात होईल. त्याप्रमाणे गुणकर्मानुसार ईश्वराने मानवांची विभागणी चार प्रकारात केली ती अशी १) ब्राह्मण २) क्षत्रिय ३) वैश्य ४) शूद्र. प्रत्येकाची वृत्ती निराळी, स्वभाव वेगळा, आवड वेगळी आणि कर्मही भिन्न. हीच चातुर्वर्ण्य - व्यवस्था.

१) ब्राह्मण कोण - 'ब्रह्म जानाति इति ब्राह्मण' :! ब्रह्म म्हणजे ते परमतत्व ते ज्ञानाने जाणून घेण्याची जिज्ञासा ज्याला आहे तो ब्राह्मण. अध्ययन म्हणजे ज्ञान मिळविणे, अध्यापन म्हणजे ज्ञान देणे - शिकवणे, यजन म्हणजे यज्ञ करणे, याजन म्हणजे यज्ञ करवून घेणे दान म्हणजे दान देणे, परिग्रह म्हणजे दान स्विकारणे. ही षट्कर्म हा ब्राह्मणांचा स्वधर्म आहे. या सहाही कर्मामध्ये पैसा मिळविण्याचे एकही साधन ब्राह्मणाजवळ नाही. शिकविणे किंवा यज्ञ करवून घेणे या कर्मांसाठी त्याने पैसा मागावयाचा नाही. त्याचा उदरनिर्वाह चालणार तो त्याला मिळणाऱ्या दानावर-दक्षिणेवर, त्यातूनही त्याने दान करावे अशी अपेक्षा आहेच तेव्हा ब्राह्मण हा नेहमी दरिद्रीच असतो. म्हणून आटपाटनगर होते. तेथे एक श्रीमंत ब्राह्मण राहत होता असे कोणत्याही कहाणीत येत नाही तर त्या नगरीत राहत असतो एक दरिद्री ब्राह्मण (पैशाने दरिद्री पण ज्ञानाने संपन्न) पण ब्राह्मणाने त्यातच समाधान मानून समाजाचे मानसिक संतुलन सांभाळावे, लोकांना विद्या शिकवून 'शहाणे करावे सकळ

जन' लोकांना उन्नत जीवन जगण्यासाठी कल्याणाचा मार्ग दाखवावा हाच आहे ब्राह्मणाचा 'स्वधर्म'. अर्थातच त्यासाठी त्याला जन्मतःच त्यागाची आवड हवी, वृत्तीने तो सुखासीन असता कामा नये तर विरागी हवा. नित्य संतुष्ट असला पाहिजे तरच तो आपला हा आचरण्यास अत्यंत कठीण असा असला तरी स्वधर्म चांगल्या प्रकारे आचारू शकेल.

क्षत्रिय कोण? ज्याला स्वभावतःच पराक्रमाची आवड आहे. मरणाचे भय वाटत नाही. संपत्ती व उपभोग अगदीच वर्ज्य नाहीत पण ते व्यापक पातळीवर घेण्याची तयारी आहे. मन स्वयंकेंद्रीत नाही. समाजाचे संरक्षण, मनापासून समाजावर प्रेम, न्यायाची, नीतिची, धर्माची प्रतिस्थापना करण्यासाठी दृष्टांचा संहार करताना मन संभ्रमित होणार नाही, सतत नवनवीन शस्त्रास्त्र विद्या शिकून घेण्याची तयारी. अशा क्षात्रवृत्ती तेजस्वी गुणांची जोपासना करण्याची मनापासून तयारी असणारा तो 'क्षत्रिय' पुरूषार्थ गाजविणे, समाजाचे संरक्षण, आणि धर्माची प्रतिस्थापना हे त्याचे नियत कर्म म्हणजेच 'स्वधर्म'.

वैश्य कोण? व्यापार उदीम करून पैसा मिळविणे व समाजाची आर्थिक बाजू मजबूत सांभाळणे हा त्यांचा 'स्वधर्म' तो आचरण्यासाठी रात्रंदिवस कष्ट करण्याची तयारी आहे. हिशोब चांगल्या प्रकारे ठेवू शकतो, जरूर पडली तर परदेशगमन करण्यासाठी मागेपुढे होणारा नाही, हरणार नाही समाजाच्या उदरभरणाची काळजी करणारा त्यासाठी योग्य तो साठा ठेवणारा पण व्यवहार मात्र चोख करणारा. व्यापार उदीम करून मिळणाऱ्या पैशाचा उपभोग घेण्यात रस आहे. असा व्यापारी वृत्ती असणारा समाजाचा जो घटक तो 'वैश्य' होय.

शूद्र कोण? शूद्र म्हणजे सामान्य माणूस. ज्याला ब्राह्मकर्म, क्षात्रकर्म वा व्यापारउदीम काहीच जमण्यासारखे नाही. असा सेवाकर्म करणारा, सेवकधर्म सांभाळणारा, नोकरी करून वा कलेची सेवा करून उदरनिर्वाह करणारा, चाकरमान्या वा कलाकार या दोघांकडेही पैसा मिळविण्याची भरपूर साधने असतात, पैसा मिळविण्याची आवडही असते. त्या पैशाचा उपभोग घेण्याची लालसाही असते असा 'सर्वसामान्य माणूस' म्हणूनच म्हटले आहे - 'जन्मनः जायते शूद्रः' संस्कारात् द्विज उच्यते! अर्थ असा

की जन्मत: सगळेच शूद्र असतात. संस्कारांच्या प्रभावाने त्यातील काही द्विज होतात. जन्माने सर्वच सामान्य असतात, पण संस्कारामुळे शिक्षणाने काही द्विज होतात. द्विज या शब्दाचा अर्थ हल्ली फक्त ब्राह्मण असा होतो. पण द्विज म्हणजे फक्त ब्राह्मण नव्हे तर ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य असे तीन वर्ण. संस्काराच्या प्रभावाने काहींमध्ये ब्राह्मण, क्षत्रिय वा वैश्य या वर्णांपैकी एखाद्या वर्णाची कर्मे स्वीकारण्याची वृत्ती तयार होते. त्यांच्याजवळ ती योग्यता ही असते, त्यांना ती आवडही असते म्हणून ते या तीन वर्णांपैकी त्यांना रुचणाऱ्या व जमणाऱ्या वर्णाचा स्वीकार करतात व शूद्र म्हणजे सामान्य माणूस न राहता या तीन वर्णांपैकी एका वर्णाचे होऊन जातात म्हणजे द्विज होतात. पण ज्यांच्याजवळ अशी काहीही योग्यता नसते, आवडही नसते ते सामान्यच राहतात. अशा सामान्यांना 'शूद्र' म्हटले आहे. शूद्र म्हणजे कमी प्रतीचे वा टाकावू असा अर्थ नाही 'अस्पृश्य' तर नाहीच नाही तर 'सामान्य'. 'अस्पृश्य' असा हा कमीपणा दाखविणारा जातीविशेष फार नंतर समाजात रूढ झाला. दलित वा अस्पृश्य असा कोणीच त्यावेळी नव्हता. खरे तर भारतीय समाजाचे अध:पतन झाल्यावर निर्माण झालेला जातीविशेष आहे हा, असे वाटल्यावाचून राहत नाही.

आपल्या शरीराच्या अवयवांवर केलेले रूपक, अतिशय बोलके आहे. मस्तक हे ब्राह्मणांचे प्रतीक तर बाहू क्षत्रियांचे, पोट वैश्यांचे आणि पाय शूद्रांचे. मग सांगा यातील कोणता अवयव कमी योग्यतेचा. 'अस्पृश्य' असे म्हणता येईल काय? तरी पण प्रत्येकाचे कार्य भिन्न भिन्न आहे. पण सर्वांच्या कार्यातील 'एकता' असेल तरच सक्षम मानवी देह होईल. तसेच समाजरूपी मानव शरीराचे आहे. याचा अर्थ हाच की समाजातील कोणताच वर्ण श्रेष्ठ नाही आणि कोणताच कनिष्ठही नाही. पण कार्यपरत्वे भिन्नत्व मात्र आहे पण प्रत्येक वर्णाची समाजाला गरज आहे हे नि:संशय. आता इतके स्पष्टीकरण केल्यावर ज्ञानेश्वरांनी वापरलेले ब्राह्मण व शूद्र दोन्ही शब्द गीतेतील चातुर्वर्ण्य व्यवस्थेच्या योजनेनुसार घ्यावयाचे आहेत. हल्ली आपण वापरतो त्या अर्थाने नाही. कारण आपली हल्लीची व्यवस्था जन्मावर आधारीत आहे. ब्राह्मणकुळात जन्माला आला म्हणून ब्राह्मण मग त्याची वृत्ती, आवड, वा व्यवसाय कोणताही असो. तसेच दलित जातीत जन्मला

म्हणून दलित. मग तो आंबेडकरांसारखा विद्यासेवक, असला तरीही दलितच. आपली आहे ती 'जातीव्यवस्था' आणि गीतेतील आहे ती 'गुणकर्मावर आधारीत वर्णव्यवस्था'.

गीतेच्या वर्णव्यवस्थेप्रमाणे केवळ ब्राह्मणकुळात जन्माला आलो असलो तरी नोकरी करून वा कलेची सेवा करून जगणारे आपण सर्व 'शूद्र' आहोत, आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच खरे 'ब्राह्मण' आहेत.

मग अशा ज्ञानासक्त ब्राह्मणाने शूद्राच्या घरी अन्न सेवन करू नये असे सांगण्यात ज्ञानेश्वरांचे काय चुकले? कारण आपण जसे अन्न सेवन करतो तसे त्याचे परिणाम शरीरावर व मनावरही होतात. हे आज वैज्ञानिक दृष्टीनेही मान्य झालेले आहे. म्हणूनच 'मधुमेह' असलेल्या माणसाला साखर तर 'रक्तदाब' असलेल्या माणसाला 'मीठ' वर्ज्य असते. रोजच्या जेवणात मसालेदार पदार्थ जास्त खाऊ नयेत असे डॉक्टर सांगतात. म्हातारपणी जड व भरपूर जेवण करू नये हा नियम कटाक्षाने सांभाळावा लागतो. अन्नमय प्राण हे जरी खरे असले तरी अन्नाचा जसा चांगला परिणाम होतो, तसाच तो वाईटही होऊ शकतो आणि हा परिणाम फक्त शरीरावरच होत नाही तर मनावरही होतो. हे आपल्यासारख्या सामान्य माणसांना चटकन समजत नसले तरी ज्ञानेश्वरांसारख्या द्रष्ट्या पुरूषाला नक्की ज्ञात असणार. म्हणूनच ते सांगत आहेत की, ब्राह्मणाने शूद्राच्या घरी अन्न सेवन करू नये. कारण दोघांची वृत्ती-धर्मच वेगळा असतो. ब्राह्मणांची वृत्ती ज्ञान मिळविण्याची तर शूद्रांची म्हणजेच सामान्य माणसांची वृत्ती -आवड पैसा मिळविण्याची, हौस मौज करण्याची, चैन करण्याची, तेव्हा दोघांच्या मानसिक जडणघडणींतच स्वभावत:च महदंतर आहे.

ब्राह्मणाला कांदालसूण, सामिष भोजन वर्ज्य मानले आहे. हे पदार्थ कामवासना उद्दीपित करतात. मनाची मृदुता कमी करतात. सुखासिन वृत्ती वाढवतात आणि हे ब्राह्मणाला मारक आहे. याचा उघड अर्थ असा आहे की, भोजनाचा परिणाम केवळ शरीरावरच नव्हे तर मनावरही होत असतो. आजही आपल्याला हे दृश्य दिसते. दोन नंबरचा पैसा मिळवणाऱ्या लोकांची मुले फारशी कर्तुत्ववान नसतात. कारण त्यांचे पालनपोषण त्या कलंकित

पैशावर झालेले असते, त्यामुळे साहजिकच वृत्ती स्वैराचारी, चंगळवादी, भोगासक्त तयार होते. हा त्या पैशाने पोषण झाल्यामुळे झालेला मानसिक परिणाम तेव्हा शूद्राच्या घरी केलेल्या भोजनामुळे पैशाचा मोह ब्राह्मणाच्याही मनात उत्पन्न होण्याची शक्यता नाकारता येत नाही. इतका व्यापक अर्थ आहे ज्ञानेश्वरांच्या दृष्टांताचा.

दुसरा दृष्टान्त दिला आहे तो 'घराचा' ते म्हणतात ''तरी लोकांची धवळारे। देखोनिया मनोहरें। असती आपुली तणारे। मोडावी कवीं''।।२२३।। अध्याय ३रा अर्थ असा दुसऱ्यांची सुंदर चुनेगच्ची घरे पाहून, आपल्या असलेल्या गवताच्या झोपड्या कशा मोडून टाकाव्यात बरे. आपली झोपडी आपण मोडली म्हणून काही तसे सुंदर घर आपल्याला मिळणार नाही. कारण ते दुसऱ्याचे आहे, पण तसे केल्याने आपला निवारा मात्र नाहीसा होऊन जाईल.

तिसरा दृष्टान्त याहीपेक्षा सरस आहे. ते म्हणतात - हे असो वनिता आपुली। कुरूप जरी जहाली। तरी भोगिता तेचि भली। जियापरी।।२२३।। ३रा अध्याय अर्थ असा, आपली बायको जरी रूपाने वाईट असली तरी संसार तिच्याच बरोबर करावा हे चांगले. दुसऱ्याच्या सुस्वरूप पत्नीची अभिलाषा धरून काय उपयोग ती मिळणार तर नाहीच. पण तिची अभिलाषा उत्पन्न झाल्यामुळे स्वतःच्या पत्नीबरोबरही सुख-समाधान मिळणार नाही. मन सतत असंतुष्ट राहील. त्याप्रमाणे कितीही अडचणीचा असला, आचरण्यास त्रास पडत असला, तरी स्वतःचा धर्मच आचरावा तेच सुखकर व श्रेयस्कर होय. हा सिध्दान्त समजावून सांगण्यासाठी ते म्हणतात - हां गा साकर आणि दूध। हे गौल्य कीर प्रसिध्द। परि कृमिदोषीं विरूध्द। धेपे केवीं।।२२६।। अध्याय ३रा म्हणोनि आणि कांसी जें विहित। आणि आपणे यां अनुचित। तें नाचरावे जरि हित। विचारजे।।२२८।। अर्थ असा - दूध आणि साखर हे दोन्ही पदार्थ गोड आहेत. हे सर्वांनाच माहीत असते, पण जंत झालेल्या रोग्यावर त्याचा वाईट परिणाम होतो, त्यामुळे जंत झालेल्या रोग्याने त्याचे सेवन करू नये. कोणतीही गोष्ट सर्वांनाच चांगली वा वाईट असत नाही तर ती त्या त्या व्यक्तिच्या प्रकृती गुणानुसार चांगली वा वाईट

ठरते. म्हणून आपल्याला जे हितावह असेल तेच स्वीकारावे -चांगले वा गोड आहे म्हणून स्वीकारू नये. पुढे जाऊन ज्ञानेश्वरांनी स्पष्ट शब्दात सांगितले आहे की 'या स्वधर्मा ते अनुष्ठितां। वेचु होईल जीविता। तोही निका वर उभयतां। दिसत असे।।२२९।।' अध्याय ३रा अर्थ असा - (फार काय) या आपल्या स्वधर्माचे आचरण करीत असता, प्राण जरी खर्ची पडले तरीही इहपर लोकांच्या दृष्टीने स्वधर्म आचरणे हेच योग्य होय.

ज्याप्रमाणे मधुमेह झालेल्या माणसाला कार्ल्याचा वा कडूलिंबाचा रस कितीही कडू असला तरी तोच घेणे हितावह असते आणि गोड न खाणे फायद्याचे असते.

गीतेच्या १८व्या अध्यायातील ३७ साव्या श्लोकात श्रीकृष्ण सांगत आहे. 'यत्रदग्रे विषमिव परिणामेऽमृतोपमम्। तत्सुखं सात्विकं ...।।३७।। अर्थ असा - जे प्रारंभी विषासारखे वाटणारे पण परिणामी अमृताप्रमाणे गोड फळ देणारे जे सुख तेच 'सात्विक सुख' होय. त्याप्रमाणे स्वधर्म आचरताना कितीही कठीण वाटला किंबहूना मरणप्राय यातना देणारा वाटला तरी तोच आचरावा हेच श्रेयस्कर होय. परिणामी तेच कल्याण करणारे ठरते. अशा प्रकारे ज्ञानेश्वरांनी या श्लोकाचा भावार्थ अगदी सोप्या शब्दात, मार्मिक दृष्टान्त देऊन स्पष्ट केला आहे.

आपण प्रकट चिंतनासाठी घेतलेल्या ३५ व्या श्लोकात 'स्वधर्म' शब्द दोनदा व 'परधर्म' शब्द दोनदा आला आहे. एकूण 'धर्म' शब्द चार वेळा आला आहे पण श्लोकात आलेला 'धर्म' शब्द हल्ली आपण ज्या अर्थाने 'धर्म' शब्द वापरतो त्या अर्थाचा द्योतक नाही. तेव्हा त्या शब्दाचा योग्य अर्थ समजून घेतला पाहिजे. अन्यथा 'निम हकीम, खतरेजान' अशी अवस्था व्हावयाची. आपण हल्ली 'धर्म' हा शब्द इंग्रजीतील 'रिलिजन' (Religion) या शब्दाला प्रतिशब्द म्हणून वापरतो. रिलीजन या शब्दाचा शब्दकोषात अर्थ दिलेला आहे - System of Faith म्हणजे विश्वास किंवा श्रध्दा. म्हणजे तंत्र, प्रणाली किंवा व्यवस्था. Faith म्हणजे विश्वास किंवा श्रध्दा. Worship म्हणजे ईश्वराची उपासना वा पूजाअर्चा. म्हणजे रिलीजन या शब्दाचा भावार्थ असा की - ईश्वरावर विश्वास वा श्रध्दा ठेवावी अशी भावना मनात निर्माण करणारी अशी एखादी सर्वांना मान्य असलेली व्यक्ती,

ग्रंथ वा प्रार्थना वा ईश्वराची उपासना वा पूजाअर्चा करण्याची पध्दती म्हणजेच कर्मकांड हे सर्व ज्यात एकत्रित आहे अशी व्यवस्था तेव्हा 'रिलीजन' या शब्दाचा कोषगत अर्थ ध्यानी घेतला असता 'इस्लाम' 'पारशी' 'ख्रिश्चन' यांना 'रिलीजन' ही संज्ञा देता येईल. एक प्रेषित, एक ग्रंथ, एक प्रार्थना, एक कर्मकाण्ड ही पंथाची व्यवच्छेदक लक्षणे मानली जातात. या तीनही लोकसमुहातील प्रत्येक समुहाचा असा एक प्रेषित आहे. एक ग्रंथ आहे, एक प्रार्थना आहे आणि एक कर्मकांडही आहे. त्यामुळे ते सर्व निरनिराळे पंथ आहेत असे म्हणणे चुकीचे होणार नाही. तेव्हा 'रिलीजन' या शब्दाला योग्य प्रतिशब्द आहे. 'पंथ' किंवा 'संप्रदाय' रिलीजन म्हणजे धर्म नव्हे. हिंदू हा काही एखादा पंथ किंवा सांप्रदाय नाही तसेच तो धर्मही नाही, तर ती आहे एक 'संस्कृती' सुसंस्कार करणारी एक 'जीवन प्रणाली' जीवनपध्दती. ही जीवन पध्दती सर्वांना सदाचाराने, गुण्यागोविंदाने एकत्र राहण्यास शिकवते. उपास्य दैवत, उपासनापध्दती, ग्रंथ वा परमेश्वराच्या सगुण निर्गुण रूपावरून भांडणे, मारामाऱ्या या जीवनपध्दतीला मान्य नाही -

'सर्वेऽपि सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः।'
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चित दुःखमाप्नुयात् ।।

अर्थ असा - सर्वजण सुखी असावे, सर्वांना निरामय म्हणजे निरोगी आयुष्य लाभावे. सर्वांचे कल्याण व्हावे, कोणालाही दुःखाचा स्पर्शही होऊ नये ही आहे भावना सर्वांसाठी. हा आहे आदर्श या जीवनप्रणालीचा किंबहुना हिंदूसंस्कृती हे अनेक पंथांचे किंवा सांप्रदायांचे असे एक विशाल कुटुंब आहे. पूर्वीपासून आजतागायत शिवाला (शंकराला) उपास्य दैवत मानणारे 'शैव' विष्णूला उपास्य दैवत माननारे 'वैष्णव' देवीची उपासना करणारे 'शाक्त' तसेच जैन, बौध्द, शीख असे कितीतरी पंथोपपंथ या संस्कृतीत आहेत. या प्रत्येक सांप्रदायाचा त्यांना पूज्य वाटणारा असा एक ग्रंथ आहे, प्रत्येकाची पूजा करण्याची एक विशिष्ट पध्दत आहे. कपाळाला गंध लावण्याची सुध्दा स्वतंत्र अशी एक धारणा आहे, तसे उपासतापास, सण समारंभ निरनिराळे आहेत ते साजरे करण्याची रीतही भिन्न आहे, तरीही ते सर्व हिंदूच आहेत. इतकेच नाही तर चार्वाकासारखा परमेश्वराचे अस्तित्वच मान्य नसणारा, निरीश्वरवादी असूनही तितक्याच इतमामाने,

सन्मानाने या संस्कृतीचा घटक आहे. हिंदू संस्कृती खऱ्या अर्थाने 'लोकशाही' चा पुरस्कार करणारी आहे. (त्यावेळी 'लोकशाही' हा शब्द रूढ नसेल कदाचित पण तत्व स्विकारलेले होते) प्रत्येक सांप्रदाय आपले तत्वज्ञान हिरिरीने मांडतो पण दुसऱ्याचेही तितक्याच शांतपणाने ऐकूनही घेतो. प्रत्येकजण स्वत:च्या विचारांचा आग्रही असतो पण आपले विचार समोरचा मान्य करीत नाही म्हणून त्याला जीवे मारण्याचा विचारही त्याच्या मनाला शिवत नाही. वाद होतात, वादंग चालतो पण शाब्दिक आणि 'वादे वादे जायते तत्वबोध:' या उक्तीप्रमाणे ज्याच्या तत्वज्ञानाचा प्रभाव जनमानसावर पडेल, त्या सांप्रदायाला त्यावेळी मोठ्या प्रमाणात अनुयायी मिळतात, पण या वादविवादाचे पर्यवसन जीवितहानी करण्यात, छळ करण्यात असे होत नाही आणि हेच तर आहे, या संस्कृतीचे वैशिष्टय म्हणून मी कुटुंब असा ययार्थ शब्द वापरला आहे.

आणि मी तर म्हणेन की या पंरपरेनुसार 'अल्ला' ला देव मानणारे 'कुराण' हाच पवित्र ग्रंथ असे मानणारे, 'नमाज पडण्याची' पध्दत स्वीकारणारे इस्लामीसुध्दा या संस्कृतीचे घटक होऊ शकतात. पण त्यांनी आम्ही म्हणतो तेच फक्त सत्य 'अल्ला' हा एकच परमेश्वर, इतर देवांना भजणारे सर्व 'काफर' म्हणून त्यांची कत्तलच केली पाहिजे हा वेडा विचार सोडून दिला पाहिजे.

तसेच 'येशू' ची उपासना करणारे 'बायबल' मधील विचार प्रमाण मानणारे 'ख्रिश्चन' सुध्दा सन्मानाने या संस्कृतीत सहभागी होऊ शकतात. पण येशुलाच एकमेव तारणहार म्हणून मान्यता न देणारे असतील त्यांना जीवंत राहण्याचा अधिकारच नाही, म्हणून त्यांना जीवंत जाळण्याचा किंवा आपलीच विचारप्रणाली बळजबरीने, धाक दाखवून मान्य करण्यास लावण्याचा विचार त्यांनी करता कामा नये.

तर 'एकं सत् विप्रा:बहूधा वदन्तिं।' ही उक्ती मान्य करावी लागेल याचा अर्थ असा - सत् म्हणजे परमेश्वर. विप्र म्हणजे ज्ञानी. तो परमेश्वर एकच आहे पण ज्ञानी त्याला आपआपल्या आवडीप्रमाणे अनेक नावाने संबोधतात. आपण आपल्या लाडक्या अपत्याला जसे 'सोनु' 'मनु' 'राजु' अशा अनेक नावाने हाका मारतो, पण तो असतो मात्र एकच त्याप्रमाणे त्या

परमेश्वराला कोणी 'शिव' म्हणेल कोणी 'राम' तर कोणी 'कृष्ण' म्हणेल तसेच कोणी 'अल्ला' म्हणावे तर कोणी 'येशू' या नावाने साद घालावी पण तो आहे 'एकच' हे विसरू नये. त्या सत्तत्वाला कोणी 'परमात्मा' म्हणून तर कोणी 'परब्रह्म' म्हणून तर कोणी 'शून्य' म्हणून ओळखले. शब्द कोणतेही असोत 'भाव' एकच आहे. ते तत्व शब्दात व्यक्त होणारे नसल्याने त्याला एक ठराविक असे नाव नाही. म्हणून जो तो आपल्या आवडीचे नाव त्याला देतो.

कोणी त्या देवाला 'सगुण' रूपात पहातो, तर कोणी 'निर्गुण' मानतो. पण तो ज्ञानेश्वरांनी म्हंटल्याप्रमाणे 'सगुण निर्गुण एक गोविंद रे'. म्हणून मूर्तीपूजा करा वा करू नका. परमेश्वराबद्दलची भक्ती महत्वाची पण स्वत:ला मुर्तीपूजा मान्य नाही. म्हणून मूर्ती फोडणे वा छिन्न भिन्न करणे शहाणपणाचे नाही. आपण मूर्तीपूजा करू नये. ज्याला जशी भक्ती कराविशी वाटेल तशी तो करेल. तात्पर्य :- त्या परमेश्वराला कोणतेही नाव द्या, पूजेची पध्दत तुमच्या आवडीप्रमाणे स्वीकारा, जो ग्रंथ प्रमाण मानावासा वाटेल तो माना, तुमच्या प्रेषिताला राम म्हणा, बुध्द म्हणा, महमंद म्हणा नाही तर येशू म्हणा पण एक सत्य विसरू नका. 'स्वत: आनंदाने जगा व दुसऱ्यालाही आनंदाने जगू द्या' आणि हे साध्य करण्यासाठी 'स्वधर्म' म्हणजे स्वत:चे विहित कर्म व्यवस्थित करा हाच संदेश हिंदू संस्कृती देत आहे. आपल्या श्लोकात आलेला 'धर्म' हा शब्द हिंदूधर्म या अर्थाने आलेला नाही हे तर निश्चित आहे. तेव्हा आता 'धर्म' या शब्दाचा अर्थ काय आहे. त्याची व्याप्ती किती आहे हे जाणून घेणे क्रमप्राप्त झाले आहे. 'धर्म' या शब्दाच्या अनेक व्याख्या केल्या गेल्या असल्या तरी भावार्थ एकच आहे असे म्हटल्यास वावगे ठरू नये. श्लोकाचा यथोचित भावार्थ समजण्यासाठी काही व्याख्यांचा अभ्यास करणे उपयुक्त होईल.

'धारणात् इति धर्म:' अशी 'धर्म' या शब्दाची व्याख्या पूर्वसुरींनी केली आहे. अर्थ असा - जीवनाची धारणा करणारा तो धर्म. म्हणजेच जीवन सुव्यस्थित व्यतीत करता यावे यासाठी उपयुक्त 'आचारसंहिता' म्हणजे धर्म. आचारसंहिता म्हणजे दैनंदिन जीवनात उठावे केव्हा? निजावे

केव्हा? खावे काय? स्नान करावे का करू नये? पूजा करावी की नमाज पढावे देवाला राम म्हणावे की येशू याची जंत्री नव्हे तर जी आचारसंहिता आचरणात आणल्यामुळे माणसाची ऐहिक तसेच पारमार्थिक उन्नती होते. ही आचारसंहिता म्हणजे 'जीवननिष्ठा' म्हणजेच उन्नत असे ऐहिक तसेच पारमार्थिक जीवन जगण्यासाठी 'उपयुक्त असलेली तत्वप्रणाली' अर्थात ही सर्वांसाठी, सार्वत्रिक व सार्वकालिक असली पाहिजे हे सांगण्याची गरज नाही. म्हणूनच या तत्वप्रणालीतील तत्वे 'वैश्विक' पातळीवर कसोटीला उतरली पाहिजेत.

वैश्विक पातळीवर कसोटीला उतरणारे १) सत्य २) अहिंसा ३) अस्तेय ४) अपरिग्रह ही चार मूलतत्वे आहेत. त्या तत्वानुसार आचरण करणे ही 'जीवननिष्ठा' म्हणजेच 'आचारनिष्ठा' म्हणजेच आचारसंहिता आणि हाच धर्म होय. अर्थातच धर्म म्हणजे काय? हे जाणून घेण्यासाठी भगवान् पतंजलींनी सांगितलेल्या या चार मूलतत्वांचा सांगोपांग विचार करणे योग्य होईल.

१) सत्य - जे वस्तुस्थितीला धरून आहे ते 'सत्य' अशी सत्याची सर्वसाधारण परिभाषा करावी लागेल. या वस्तुस्थितीचे दर्शन घडविणारे जे निवेदन वा विधान ते 'सत्यवचन' जेथे वस्तुस्थिती आणि निवेदन यात विसंगती येईल तेथे सत्य असणारच नाही म्हणून ते असत्य.डोळे आणि कान ही दोन महत्वाची ज्ञानेंद्रिय म्हणजे ज्ञानाची प्रवेशद्वारे. डोळयाने जे पाहिले ते 'सत्य' घटना जशी घडली तशी सांगणे म्हणजे सत्यकथन. काही विचारवंतांच्या दृष्टीने जीवनाचा प्रत्यक्ष जो अनुभव येतो ते सत्य. उदा. पाण्याने तहान भागते किंवा अन्नाने पोट भरते. काही विचारवंताना कृतीच्या सफलतेवर सत्य अवलंबून असते असे वाटते. सत्याची परिभाषा करताना अनेक विद्वानांची अनेक मते असल्याचे दिसते.पण श्रीकृष्णाने केलेली 'सत्य' या शब्दाची परिभाषा आपल्या 'धर्म' या शब्दाच्या दृष्टीने जास्त जवळची आहे. ती अशी -'सत्य' म्हणजे वस्तुस्थितीचे दर्शन घडविणाऱ्या ज्या विधानामुळे प्राणीमात्रांचे कल्याण होईल असे विधान म्हणजे 'सत्य'. मात्र यात एक अतीव अवघड पण नितान्त गरजेचे असे पथ्य सांभाळले गेले

पाहिजे ते हे की त्या विधानात विधान करणाराचा यत्किंचीतही स्वार्थ डोकावता कामा नये तर निव्वळ निखळ समाज कल्याणाचा हेतूच असला पाहिजे. त्यात प्रेयस साधण्याची भावना नसावी तर 'श्रेयस' साधण्यासाठीच ते असावे. अन्याय अनीतिचा प्रतिकार व्हावा व न्यायनीतिची, माणूसकीची प्रस्थापना व्हावी. हा विचार एक उदा. देऊन स्पष्ट करते - 'एकदा एका गायीला मारण्यासाठी एक कसाई तिच्या मागे धावत आला. गाय जीवाच्या भयाने पळत सुटली होती. तेथेच एक साधक साधना करीत बसला होता. गाय कोणत्या बाजूने गेली हे अर्थातच त्याने पाहिले होते. कसायाने जेव्हा त्याला विचारले 'गाय कोणत्या बाजूने गेली हो?' तुम्ही येथेच आहात तेव्हा तुम्ही पाहिले आहेच. तेव्हा साधक म्हणाला, 'तुम्ही म्हणता ते खरे आहे. पण ज्यांनी पाहिले त्यांना बोलता येत नाही. जिला बोलता येते ती पाहू शकत नाही. अर्थ असा की डोळयांनी पाहिले पण त्यांना बोलता येत नाही. जीभ बोलू शकते पण ती पाहू शकत नाही. म्हणून माहीत नाही हे विधानच खरे आहे. असे सांगून साधकाने गायीचे प्राण वाचवले. म्हणूनच साधकाचे विधान सत्य आहे, जरी ते वस्तूस्थितीला धरून नसले तरीही. तसे पाहता ते असत्यच म्हणावे लागेल. आणि असे सत्य समाजाचे कल्याण करणारेच असणार हे निर्विवाद. जसे - नेहमी सत्यच बोलणाऱ्या 'धर्मराजाला' 'नरो वा कुंजरो वा' असे मनात बोलण्यास सांगून प्रत्यक्षात मात्र 'अश्वत्थामा' मेला या विधानाला मान्यता देण्यास सांगणाऱ्या श्रीकृष्णाच्या मनात कोणताही स्वार्थ नव्हता तर केवळ न्यायनीतिची प्रतिस्थापना करण्याचाच हेतू होता. म्हणून श्रीकृष्णाने धर्मराजाला दिलेला सल्ला सत्य बोलण्यात जमा झाला आहे.

पुढे उत्तरेच्या 'गर्भात' चेतना उत्पन्न करण्यासाठी प्रार्थना करताना श्रीकृष्ण म्हणतो आहे की, 'मी जर कधीही असत्य बोललो नसेन तर माझी प्रार्थना सफल होईल आणि गर्भ 'सचेतन' होईल आणि त्याप्रमाणे गर्भ 'सचेतन' झाला आहे. हा प्रसंग श्रीकृष्णाने केलेल्या सत्याच्या परिभाषेला पुष्टी देणारा असाच आहे.

भगवान पतंजलींनी सांगितलेले दुसरे तत्व आहे 'अहिंसा'. हिंसा म्हणजे सजीवाला ठार मारणे किंवा नष्ट करणे. मग ठार मारलेला जीव

लहानशा कीटकापासून तो मानवापर्यंत कोणताही असो. किंबहुना श्री.जे.सी.बोस यांनी सिध्द केलेल्या सिध्दान्ताप्रमाणे झाडांना सुध्दा जीव असतो, तेव्हा झाड तोडून टाकणे ही सुध्दा हिंसाच म्हणावी लागेल.

या हिंसेचे प्रमुख दोन भाग करता येतील. १) शारीरिक २) मानसिक.

शारीरिक हिंसा म्हणजे जीव घेऊन शरीर काष्टवत् - निर्जिव करणे. तर मानसिक हिंसा म्हणजे मनाची अवस्था अपमानाच्या अतीव दु:खाने एखाद्या शीलेप्रमाणे भावशून्य करणे.

शारीरिक हिंसेत तीन पोटप्रकार असतात १) कृत २) कारित ३) अनुमोदित.

१) कृत :- म्हणजे स्वत: ठार मारणे उदा. कसाई ज्याप्रमाणे गायीला ठार मारतो किंवा खाटिक मेंढया बकऱ्यांचा जीव घेतो, धीवर मासे पकडतो किंवा एखादा माणूस दुसऱ्या माणसाचा खून करतो. ही कृती स्वत: पण कोणत्यातरी शस्त्रांच्या, विषासारख्या एखाद्या पेयाच्या सहाय्याने केली जाते. मात्र ठार मारणारा आणि जीव गमावणारा यांच्यामध्ये तिसरा कोणी मध्यस्थ नसतो. दुसऱ्या कोणाचा संबंध नसतो. अशा पध्दतीने स्वत: केलेली म्हणून 'कृत'.

२) कारित :- म्हणजे हत्या स्वत: न करता ती दुसऱ्या कोणाकडून करवून घेतली जाते. जसा देवीला दाखविला जाणारा बोकडाचा नैवेद्य वा यज्ञात बळी दिला जाणारा पशू. स्वत: पूजा करणारा व नैवेद्य दाखविणारा किंवा यज्ञ करणारा स्वत:च्या हाताने मारत नाही. पण त्यांच्या सांगण्या बरहुकूम प्राणी मारला जातो. तसे एखाद्या व्यक्तिला ठार मारावयाचे असते पण आपण त्यात दोषी ठरू नये म्हणून किंवा ठार मारण्याची हिंमत नसल्यामुळे म्हणा ती हत्या करण्यासाठी पैसे देण्याचे कबूल करून किंवा एखादे महत्वाचे काम करून देण्याचे आश्वासन देऊन दोघांमध्ये करार केला जातो. हे दोघे म्हणजे ज्याला हत्या करवून घ्यायची असते तो व जो प्रत्यक्ष हत्या करणारा असतो तो. गुन्हा उघडकीला आला तरी चटकन् खरा गुन्हेगार सापडत नाही. पकडला जातो तो प्रत्यक्ष खून करणारा. वास्तविक प्रत्यक्ष कृती करणारापेक्षाही 'सुपारी' देणारा गुन्हेगार असतो. खरे तर त्याच्या

सांगण्यावरून हत्या झालेली असते, पण तो मात्र त्यातून सही सलामत सुटतो, नामानिराळा राहतो आणि समाजात 'प्रतिष्ठित' म्हणून फिरतो. अर्थात खून करणाराही पापी असतोच कारण कृती प्रत्यक्ष 'त्याने' केलेली असते व त्या मोबदल्यात स्वत:साठी काहीतरी 'घबाड' मिळविलेले असते. अन्यथा युध्दाच्या वेळी रणांगणात सेनापतीने 'Fire' अशी आज्ञा देताच गोळ्या बंदुकीतून सटासट सुटतात व अनेकांचे प्राण घेतात. पण त्यात सेनापती वा सैनिक कोणीच हे काम स्वत:च्या स्वार्थापोटी करत नाहीत. तर देशाच्या रक्षणासाठी केले जाते, न्यायासाठी केले जाते म्हणून कोणीच दोषी नाही.

अशी आपल्या इच्छेनुसार पण दुसऱ्याच्या करवी करवून घेतलेल्या हिंसेला 'कारित हिंसा' असे म्हणतात.

३) अनुमोदित हिंसा - म्हणजे हिंसा प्रत्यक्ष स्वत: करत नाही किंवा कोणाकडून करवूनही घेत नाही पण त्या हिंसेला त्याची अप्रत्यक्ष 'संमती मात्र असते' जसे 'सामिष' आहार घेणारे लोक. त्यांना चांगले ज्ञात असते की, माशांचे किंवा मटनाचे जेवण मासे मारल्याशिवाय, किंवा बोकड वगैरे प्राणी ठार केल्याशिवाय तयार होत नाही. म्हणजे असा आहार घेणाऱ्या मंडळींची या हत्येला अप्रत्यक्षपणे मान्यता असते. जरी ते स्वत: मारीत नसले तरी पैसे देऊन ती सामुग्री विकत घेतात व त्याचे सेवन करतात. अशी ही अनुमोदन असणारी हिंसा म्हणून त्या हिंसेला 'अनुमोदित' हिंसा असे म्हणतात.

वरील तिन्ही प्रकारच्या हिंसेत प्रत्यक्ष जीव घेतला जातो. पण प्रत्यक्ष जीव न घेता मनाला मरणप्राय यातना देणे ही सुध्दा एक प्रकारची 'हिंसा'च. येथे शरीराची हत्या होत नाही तर मनाची होते म्हणून या हिंसेला 'मानसिक' हिंसा म्हणण्यास प्रत्यव्याय नसावा.

मानसिक हिंसा:- यात दोन पोट प्रकार पडतील १) वाचिक २) कायिक.

वाचिक - म्हणजे वाचेने केली जाणारी पण मनाचीच हिंसा. प्रत्यक्ष जीव न घेता जीव घेतला असता तरी बरे झाले असते असे मरणप्राय दु:ख व्हावे असे कठोर मनाला बोचणारे शब्द बोलून वा लिहून मनाची केलेली हिंसा. ही हिंसा शस्त्राच्या वा विष प्रयोगाच्या सहाय्याने न करता शब्दांच्या सहाय्याने केली जाते. येथे हिंसा करण्याचे साधन आहे 'शब्द' म्हणून ही 'वाचिक'

हिंसा. उदा. द्रौपदी वस्त्रहरणाच्या वेळी कर्ण दुर्योधनादि चांडाळ चौकडीने द्रौपदीचा व तिच्या पाचही पतींचा पाणउतारा करण्यासाठी वापरलेले अपमानास्पद शब्द - या शब्दांनी द्रौपदी व तिचे पती यांचे मन तर विदीर्ण झालेच पण दरबारी मंडळींनाही ते ऐकणे असहनीय वाटू लागले. ही मनाची हिंसा वाचेने केली गेली म्हणू ती 'वाचिक' हिंसा होय. अशी हिंसा करून घेण्याची वेळ सामान्यांवरच नाही तर संतसज्जनांवरही येऊ शकते. असे दृष्ट प्रवृत्तीचे लोक समाजात भेटू शकतात.

तसेच एखाद्या व्यक्तिचे 'चारित्र्यहनन' केले जाते. त्यासाठी उपयोगात आणला जातो तो शब्दांचा फापटपसारा. तो बऱ्याच वेळा लिखित स्वरूपात असतो पण साधन असतात 'शब्द'च. जीव घेतला तर एकदाच शेवट होतो पण अशा मनाला घायाळ करणाऱ्या शब्दांची आठवण जितक्या वेळा येते, तितक्या वेळा मन मरणप्राय यातना अनुभवते किंबहुना अशी आठवण कधी विस्मरणात जातच नाही. चारित्र्य हनन करणारे शब्द लिहून सज्जन माणसाला अप्रत्यक्षपणे संपवण्याचाच उद्योग केलेला असतो. कारण चारित्र्य सज्जनाला, स्वाभिमानी माणसाला प्राणापेक्षाही प्रिय असते. तो प्रत्यक्ष मरण स्वीकारेल पण चारित्रहनन सहन करणे त्यांच्या सहनशक्तीच्या पलिकडचे होते.

शब्द हे बाणासारखे असतात. ते जिथून सुटतात तेथे जखम होत नाही पण जिथे लागतात तेथे मात्र खोल जखम करतात. म्हणूनच शब्द जपून वापरले पाहिजेत. भात्यातून सुटलेला बाण जसा परत घेता येत नाही तसे शब्द तोंडातून निघाले की ते परत घेता येत नाहीत. वेळेवर विवेक करुन असे शब्द न वापरणे म्हणजे अहिंसा. अशी अहिंसा काटेकोरपणे जीवनात आली तर समाजातील वा नात्यातील माणसांचे एकमेकांशी असलेले संबंध सौहार्दाचे, सलोख्याचे, प्रेमाचे राहू शकतील.

या मानसिक हिंसेचा दुसरा पोट प्रकार म्हणजे 'कायिक हिंसा' हा प्रकार तर वरील 'वाचिक' हिंसेपेक्षाही जास्त भयानक आहे असे म्हणावे लागेल. ही हिंसा मानसिक खरी पण यात हत्या करण्यासाठी वापरलेले साधन असते ती 'काया' शरीर. शरीराच्या माध्यमाद्वारे केली जाणारी

अशी ही हत्या असते. उदा. द्रौपदी वस्त्रहरणाच्यावेळी दुर्योधन-दु:शासनाने केलेले कृत्य पांडवांना सहन करणे मरणापेक्षाही दुस्सह वाटले. अशा प्रसंगातूनच पुढे महाभारतातील युध्दाची ठिणगी पडली.

तसेच एखाद्या स्त्रीवर होणारा बलात्कार. स्त्रीच्या इच्छेविरुध्द तिला मान्य नसताना अनधिकार असा 'संभोग' म्हणजे बलात्कार. (हल्ली तर त्याचे पेवच फुटले आहे असे वाटते. मग स्त्री तान्ही असो वा आजी. कशाचाच विधीनिषेध राहिलेला नाही. ही आहे भारतीय समाजाची अधोगती - अध:पतन) असा बलात्कार होतो तेव्हा त्या असाहाय्य स्त्रीच्या मनाची होणारी उलघाल जीवाची होणारी तडफड शब्दात सांगता येणार नाही अशा प्रसंगाने स्त्रीचे भाऊक-मन उध्वस्त होते. किंबहुना तिचे जीवन जगण्यातील स्वारस्यच संपून जाते. बऱ्याचजणी अशा प्रसंगानंतर आत्महत्या करतात. पण ज्यांना ते जमत नाही त्यांचे नंतरचे जीवन म्हणजे मरता येत नाही, म्हणून जगायचे अशा स्वरुपाचे असते. तेव्हा प्रत्यक्ष ठार मारण्यापेक्षा करुन ठेवलेली ही अवस्था अतीव भयानक असते.

तरीपण शरीराच्या माध्यमातून, देहबोलीद्वारे वा वागणूकीने समोरच्या माणसाचे मन दुखावले जाऊ नये याची काळजी घेणे म्हणजे अहिंसा-पालन. सर्वांना सुख- समाधान लाभावे, समाजाची धारणा व्हावी यासाठी अहिंसेचे पालन कटाक्षाने करणे आवश्यक आहे.

असे जरी असले तरीही काही वेळा अन्यायाचा प्रतिकार करून, न्याय व नीतीची प्रतिस्थापना करण्यासाठी, संतसज्जनांचे रक्षण करण्यासाठी, त्यांना अभय देण्यासाठी, दुष्ट प्रवृत्तीच्या लोकांना मारण्याशिवाय पर्यायच नसतो. त्यावेळी समाजस्वास्थ्यासाठी अहिंसेपेक्षा हिंसेचाच स्वीकार करावा लागतो. प्रत्यक्ष श्रीकृष्णानेच अध्या.४ था श्लोक नं.८ मध्ये स्वच्छ म्हटले आहे.

परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्।
धर्म संस्थापनार्थाय सम्भवामि युगे युगे।।८।।

अर्थ असा, संत-सज्जनांच्या संरक्षणासाठी, दुष्टांचा संहार करण्यासाठी, धर्माची संस्थापना करण्यासाठी मी युगायुगाच्या ठिकाणी म्हणजे

प्रत्येक युगामध्ये अवतार घेतो. म्हणजे सज्जनांच्या रक्षणासाठी, धर्माची प्रतिस्थापना करण्यासाठी दुष्टांचा संहार करणे जेव्हा भाग पडते तेव्हा तोही करावा लागतो आणि तो करण्यास प्रत्यक्ष परमेश्वरच अवतार घेतो. श्रीकृष्णाने त्याप्रमाणे प्रत्यक्ष स्वत:च्या मामाचा- कंसाचा वध केला आहे, आतेभाऊ असलेल्या शिशुपालाचाही नाश केला आहे.

याचा अर्थ असा की हिंसा करण्यामागील उद्देश जर 'सर्वेऽपि सुखिन: सन्तु' याप्रमाणे समाजाला सुखस्वास्थ्य मिळवून देण्याचा असेल आणि या उद्देशाच्या आड जी कोणी (दुष्ट) व्यक्ती येत असेल तर तिची हिंसा करणेसुध्दा आवश्यकच ठरते. इतकेच काय 'स्त्री' ची हत्या हे अगदी निषिध्दकर्म मानलेले आहे. पण विश्वामित्रांसारख्या ज्ञानी ऋषींनीही 'त्राटिके'चा वध करण्याची आज्ञा प्रभु रामचंद्राला दिली आहे.

याचा अर्थ असा की स्वार्थापोटी, अहंकाराच्या पोषणासाठी, स्वान्त:सुखाय हिंसा होता कामा नये. तसेच ती निरपराध जीवाची असता कामा नये.

म्हणूनच श्रीकृष्णाने अर्जुनाला अन्यायाच्या प्रतिकारासाठी, नीतिच्या व धर्माच्या स्थापनेसाठी, प्रत्यक्ष गुरूवर्य, आजोबा यासारख्या नात्यांचा सुध्दा विचार न करता युध्द करण्यास प्रवृत्त केले. युध्दात हिंसा करावीच लागते हे काय श्रीकृष्णाला माहीत नव्हते काय? पण युध्द करण्याचे हे कर्म अहंकाराचा मदु आणि कर्मफलाचा स्वादु यांचा त्याग करुन करावयाचे आहे हे तो वारंवार बजावतो आहे. तेव्हा अहंकाराचा व स्वत:च्या लाभाचा त्याग करुन, समाजाच्या स्वास्थ्यासाठी केली जाणारी कृति म्हणजे 'अहिंसा' असे म्हटल्यास वावगे ठरु नये. पण सामान्य माणसाला इतका सूक्ष्म विवेक दैनंदिन करणे त्याच्या आवाकाच्या बाहेरचे आहे. म्हणून त्याने अहिंसेचे सामान्य नियम पाळावेत व समाजाचे स्वास्थ टिकवावे हाच त्याचा स्वधर्म होय. तो त्याने व्यवस्थित आचरावा हे उत्तम.

आता तिसरे तत्व-अस्तेय, अस्तेय म्हणजे चोरी न करणे. चोरी करणे म्हणजे आपली नसलेली वस्तू घेणे. वस्तू आपली केव्हा होते? ती स्वत: कष्ट करुन मिळविलेली असली पाहिजे किंवा जन्माच्या आधारावर (Right by birth) म्हणजे वारसा हक्काने ती आपल्या मालकीची झाली असली

पाहिजे जसे, वडिलार्जित घर, जमीनजुमला, पैसा इ. किंवा विवाहानंतर पत्नी या नात्याने प्राप्त झालेल्या (Right by Law) अधिकारानुसार पतीचा पैसा, मालमत्ता वा निवृत्तीवेतन इ. तसेच पूर्वी राज्य वा एखादे वतन घराण्यात चालत आलेले असे. असे परंपरेनुसार चालत आलेले राज्य वा वतन (उदा. कुलकर्णीपण) वरील निकषांद्वारे प्राप्त झालेले धन स्वत:चे प्राप्त झालेले राज्य व वतन हे ही स्वत:चे धन होय.

पण जी वस्तू या कसोटीच्या आधारावर आपली ठरत नाही. ती घेणे म्हणजे चोरी. मग ती वस्तू पैसा, सोने, घर वा वतन काहीही असू दे. वा एखाद्या देशाचे राज्य असू दे. (जसे इंग्रजांनी भारतावर राज्य केले ती चोरी होती) तसेच दुसऱ्याचे वाङमय असू दे वा दुसऱ्याची पत्नी असू दे. दुसऱ्याचे साहित्य स्वत:च्या भाषेत लिहून स्वत:चे म्हणून अधिकार सांगणे या चोरीला 'वाङमयचौर्य' म्हणतात. एखाद्या पुस्तकाचे भाषांतर करतानाही दुसऱ्याचे लिखाण आपण आपल्या भाषेत भाषांतरीत करतो पण त्यावेळी मूळ पुस्तकाचा वा लेखकाच्या नावाचा उल्लेख करुन 'अनुवादक' असे म्हणून भाषांतर करणारा स्वत:चे नाव देतो आणि त्यासाठी सुध्दा मूळ लेखकाची अनुमती घेतलेली असते. दुसऱ्याचा हक्क हिरावून घेणे ही सुध्दा चोरीच. जसे कौरवांनी पांडवांच्या राज्यावरील त्यांचा हक्क नाकारून राज्य आमचेच आहे असा दावा केला होता किंवा सध्या भारताचाच भूभाग असलेल्या काश्मीरवर पाकिस्तान स्वत:चा प्रदेश असल्याचा दावा करीत आहे. तसेच इंग्रजांनी १५० वर्षे भारतावर अमानुषपणे राज्य केले. ही सर्व चोरीच होय. दुसऱ्याची पत्नी पळवून आणणे ही देखील चोरीच. जशी रावणाने रामाची पत्नी (सीता) पळविली. तसेच हिंदूच्या मंदिराचा विध्वंस करुन, मंदिरातील मूर्ती फोडून तेथे मशिदी बांधून त्यावर अधिकार सांगणे हेही चौर्यकर्मच. इतकेच कशाला दुसऱ्याच्या झाडावरील फुले वा फळे घेणे हाही चोरीचाच प्रकार होय. त्या फळझाडांसाठी जागा, त्या झाडांची करावी लागणारी देखभाल हे कष्ट दुसऱ्याचे असतात.

तेव्हा चोरी मग ती फुलांची असो, संपत्तीची असो, राज्याची असो वा साहित्याची चोरी ती चोरीच. अशी होणारी चोरी समाजात

असुरक्षितपणाची भावना निर्माण करते, भय निर्माण करते, त्यामुळे समाजस्वास्थ बिघडते. एक पुरातन कथा आहे. शंख आणि लिखीत असे दोन सख्खे भाऊ होते. एकदा शंखाने लिखिताच्या बागेतील दोन फळे तोडली. दोघांचे एकमेकांवर खूप प्रेम. त्यामुळे तोडताना शंखाला काहीच जाणवले नाही. मनात शंका वा भीतीही नव्हती. पण नंतर मात्र त्याच्या मनात विचार आला फळे घेताना आपण भावाची परवानगी विचारली नाही. भाऊ जरी असला तरी बाग त्याची आहे तेव्हा अनुमती न घेता फळे घेणे म्हणजे चोरीच नाही का? चौर्यकर्म निषिध्द मानले आहे. म्हणून त्याला शिक्षाही सांगितली आहे. तेव्हा आपण शिक्षेला पात्र आहोत. म्हणून तो भावाकडे गेला शिक्षा मागण्यासाठी. भावाने परोपरीने समजावले पण शंख आपला हट्ट सोडेना. शेवटी भावाने त्याला राजाकडे नेले. सर्व हकीगत सांगून शिक्षा देण्याची विनंती केली. कारण शिक्षा करण्याचा अधिकार राजाचा किंवा पालकांचा वा गुरूचा. लिखित एक नागरिक. शिक्षा सांगू शकत नाही. ते अधिकारावरील आक्रमण होणार होते. समाजस्वास्थ्याच्या दृष्टीने तेही घातकच होते....

अशीच एक गोष्ट दादोजी कोंडदेवांबद्दल सांगितली जाते. शिवाजीला मार्गदर्शन करणारे शिवरायांचे 'गुरूजी' असलेले असे दादोजी. एकदा शिवाजी राजांच्या बागेतील सुंदर पिकलेला आंबा पाहून त्यांच्या मनात मोह उत्पन्न झाला. त्यांनी तो तोडला आणि नंतर लगेच त्यांना जाणवले की झाले हे कृत्य योग्य झाले नाही. ही चोरी झाली. त्यांनी आपला गुन्हा राजांजवळ कबूल केला आणि त्यासाठी शिक्षा देण्याचा आग्रह धरला. राजांनी खूप समजावले. गुरूजी, बाग माझी असली तरी आपण माझे गुरूजी आहात. तेव्हा माझ्या बागेतील आंब्यावर आपला अधिकार आहेच. त्यात गुन्हा तो कोणता? आणि शिक्षा तरी कसली? पण दादोजी काही ऐकेनात. त्यावेळी चोरी करणाराचा हात कलम केला जाई. दादोजींचा हात तोडणे राजांना मान्य होईना. शेवटी पर्याय निघाला. दादोजींनी अंगरख्याच्या उजव्या बाहीत हात घालू नये अशी शिक्षा राजांनी दिली आणि राजाने दिलेली शिक्षा म्हणून दादोजींनी ती मान्य केली. वास्तविक ही सुध्दा सतत आठवण करून देणारी अशीच कठोर शिक्षा होती.

वरील दोन्ही कथा खूप बोलक्या आहेत. गीतेच्या तिसऱ्या अध्यायातील २१व्या श्लोकातील पहिल्या ओळीत म्हटले आहे. 'यद्यदाचरति श्रेष्ठस्त देवेतरो जनः।' अर्थ असा, समाजातील श्रेष्ठजन जसे आचारण करतील त्याचेच अनुकरण इतरेजन करतात. तेव्हा समाजधुरीणांनी अतिशय दक्ष असले पाहिजे. म्हणूनच शंखाने काय किंवा दादोजींनी काय स्वतःच स्वतःला शिक्षा देण्यासाठी आग्रह धरला व आदर्श घालून दिला. लिखिताने शिक्षा सांगितली नाही त्यासाठी राजाकडे गेला. नाहीतर त्याला नसलेले अधिकार त्याने गाजवले असे झाले असते आणि ते योग्य नव्हते.

असे अधिकार न समजता लोक वागू लागले तर चोरी करणाऱ्याला शासन करण्याचे काम शासन व्यवस्थेला वा राजाला करावेच लागते आणि शासन व्यवस्थाही आपले अधिकार योग्य प्रकारे जाणू शकले नाही तर सद्यःस्थिती येण्यास वेळ लागत नाही. रावणाने रामाची पत्नी पळविली आणि तो (रावण) गुन्हा मान्य करून सीतेला परत पाठविण्यासही तयार होईना. तेव्हा रामाला युध्द करुन रावणाचा वध करावा लागला. कारण रावण हा काही रामाचा प्रजाजन नव्हता तर एक बलिष्ट मदोन्मत्त असा लंकाधिपती होता. तेव्हा न्याय मिळविण्यासाठी युध्दाशिवाय पर्याय नव्हता. रावणाला ठार मारणे हीच योग्य शिक्षा होती कारण तो समाज धुरीण होता. 'यथा राजा तथा प्रजा' या उक्तीप्रमाणे प्रजाजनही रावणाचे अनुकरण करण्याची शक्यता होती. तेव्हा कठोर शिक्षा करणे भागच होते. तरच वचक राहतो. असे शासन झाले नाही तर समाजात अंदाधुंदी माजेल. कोणालाही सुरक्षित वाटणार नाही. भ्रष्टाचार हाच शिष्टाचार होईल. टेबलाखालून व्यवहार करण्याची, वरची कमाई मिळविण्याची व चारचौघात गौरवाने ते सांगण्याची लाज वाटेनाशी होईल. तोच नित्याचा व्यवहार होईल. राजरोस दुसऱ्यांच्या मुलीबाळींवर हात टाकण्यात दिक्कत वाटणार नाही. थोडक्यात समाज असुरक्षित होईल. म्हणूनच सर्व नियमांचे व आचारसंहितेचे कटाक्षाने, पूर्णांशाने पालन झाले पाहिजे तरच समाज सुरक्षित राहील, समाज स्वास्थ टिकेल. असे समाजस्वास्थ्य टिकविणे हेच धर्माचरण करणे होय. मग ते करणे कितीही कठीण वाटले तरी परिणामी हितावह असते, श्रेयस्कर ठरते.

अपरिग्रह - हे चौथे तत्व. परिग्रह म्हणजे संग्रह. संग्रह म्हणजे साठा. संग्रह वा साठा न करणे म्हणजे 'अपरिग्रह' हे तत्व अक्षरश: पाळणे फक्त संन्याशालाच शक्य आहे व आवश्यकही आहे. पण गृहस्थाश्रमी माणसाला याचा शब्दश: अर्थ घेऊन चालणार नाही. त्याला थोडातरी साठा करावाच लागतो. कारण तिन्ही आश्रमांची (ब्रम्हचर्याश्रम, वानप्रस्थाश्रम, संन्यासाश्रम) जबाबदारी या आश्रमावरच असते. समर्थ रामदास दासबोधात म्हणतात 'नाना वेष नाना आश्रम। सर्वांचे मूळ गृहस्थाश्रम। जेणे पावती विश्राम त्रैलोक्यवासी।।' देव, ॠषी, मुनी, योगी, नाना तापसी, वीतरागी, अतीत, अभ्यागत हे सर्व गृहस्थाश्रमातच तयार होतात. पण या सर्वांना भिक्षेसाठी पुन: गृहस्थाकडेच यावे लागते. कारण अन्न हे कोणीतरी निर्माण करावे लागते, संपादन करावे लागते त्याशिवाय मिळत नाही आणि हे कार्य गृहस्थच करू शकतो व करतोही 'या कारणे गृहस्थाश्रम। सकलांमध्ये उत्तमोत्तम।।' आणि अशा आश्रमांची जबाबदारी घेणाऱ्या, समाजाचा आधारस्तंभ असलेल्या गृहस्थाश्रमी माणसाला अभ्यागताला जेवू घालयचे, अतिथीचे स्वागत करावयाचे, संन्याशाला भिक्षा द्यावयाची तर साठवण केल्याशिवाय कसे चालेल? तहान लागल्यावर विहीर खणून कसे चालेल? म्हणून त्याला थोडा तरी साठा करावाच लागेल. किंबहुना समर्थांनी स्वच्छ शब्दांत म्हंटले आहे की 'मेळविती तितुके भक्षिती। ते कठीण काळी मरोनी जाती। दीर्घ सूचनेने वर्तती भले।।' अर्थ असा, साठा करणे आवश्यकच आहे मग तो धान्याचा असो वा धनाचा किंबहुना असा साठा करणारेच भले म्हणजेच शहाणे. कारण कधी कठीण प्रसंग आला उदा. दुष्काळ, परचक्र इ. तर अशा साठवणीचाच उपयोग होतो. जे व्यक्तिचे तेच राष्ट्राचे. राष्ट्राकडे तर धान्य, धन सुवर्णाच्या साठ्याप्रमाणे, शस्त्रांचा, दारुगोळ्याचा साठा असणेही गरजेचे आहे. त्याशिवाय गृहस्थ आपला गृहस्थाश्रम व्यवस्थित सांभाळू शकणार नाही व राष्ट्रसंरक्षण करु शकणार नाही. तसेच ते राष्ट्र संपन्न व समर्थही राहू शकणार नाही. सुवर्णाचा साठा किती यावर राष्ट्राची अर्थव्यवस्था टिकून असते. ज्या राष्ट्रातील लोक खाऊनपिऊन सुखी समाधानी नसतील ते राष्ट्र रसातळाला जाण्यास वेळ लागणार नाही. सैन्यसुध्दा पोटावर चालते. तेव्हा गृहस्थाने व राष्ट्राने 'परिग्रह' केलाच पहिजे.

मग ‘अपरिग्रह’ म्हणजे काय? हे तत्व जास्त करून वैश्यांसाठी महत्वाचे आहे. व्यापार, उदीम करणारांनी याचा भावार्थ नीट समजून घेणे जरुरीचे. व्यापाऱ्याकडेही साठा हवाच साठा न करता तो दुकान कसे थाटणार आणि व्यापार तरी कसा करणार? तेव्हा निरनिराळ्या जीवनावश्यक वस्तुंचा साठा त्याला करावाच लागणार त्याशिवाय गिऱ्हाइकांची गरज तो कशी भागवणार?

मग ‘अपरिग्रह’ म्हणजे काय? हे तर कोडेच झाले की, पण पतंजली सारखा तत्ववेत्ता, समाजहितचिंतक असे कोड्यात टाकणारे तत्व समाजधारणेसाठी सांगणार नाही हे निश्चित. तेव्हा त्या तत्वाचा नीट भावार्थ जाणून घेतला पाहिजे.

‘अपरिग्रह’ म्हणजे असा साठा करू नये की ज्यामुळे बाजारात त्या वस्तुची कृत्रिम टंचाई निर्माण होईल व सामान्य माणसाला त्या वस्तुचा तुटवडा भासू लागेल. लोकांना जीवन जगणे कठीण होईल. विशेषत: गरीब लोक भरडले जातील. उदा. साखरेचा साठा करून कृत्रिम टंचाई निर्माण करावयाची. आरडाओरडा करावयाचा व मग भाव वाढवून विक्री सुरू करावयाची. अशा वेळी गरीब जनता संकटात सापडते. म्हणून व्यापार करणाराने सुध्दा किती फायदा घ्यावा याचे सुध्दा नियम घालून दिलेले असतात. ते डावलून पैशाच्या मोहाने चढ्या भावाने विक्री करता यावी म्हणून कृत्रिम टंचाई निर्माण करुन साठा करणे हा गुन्हाच आहे. असा अवाजवी साठा न करणे म्हणजे ‘अपरिग्रह’ होय.

संकटकाळी उपयोगी पडावे म्हणून धान्याचा वा धनाचा साठा असणे आवश्यक. पूर्वी शेतकरी शेतातील धान्याच्या रूपात सरकारी शेतसारा देत असत आणि ते धान्य सरकार कोठारात साठवून ठेवत ही व्यवस्था आपतकाळी उपयोगी पडावी म्हणून असे. तसेच सरकारी कोठारे धान्याने व तिजोरी संपत्तीने परिपूर्ण असणे हे त्या राज्याचे समृध्दीचे व संपन्नतेचे लक्षण मानले जाई. एखादे वर्षी पावसाने डोळे वटारले तर प्रजा उपाशी राहू नये म्हणून अशी कोठारे धान्याने भरून ठेवत. इतकेच नाही तर जनावरांसाठी गवतसुध्दा साठवले जाई. पण आपत्काळीसुध्दा कोठारातील धान्य बाहेर

न काढता प्रजेला मरू देणे हा अक्षम्य गुन्हाच म्हणावा लागेल अशी साठेबाजी न करणे म्हणजे 'अपरिग्रह.'

पूर्वी यवनांची सत्ता असतानाची गोष्ट. सर्वांना ज्ञात असेल. राज्यात दुष्काळ पडला. लोकांना अन्न मिळेना. वास्तविक याची दखल घेऊन सुलतानाने कोठारातील धान्य लोकांना देण्याची आज्ञा देणे हे 'राजा' या नात्याने त्याचे कर्तव्य होते. पण तो बोलून चालून परका. त्याला हिंदू प्रजेची दया कशी येणार? त्यावेळी 'दामाजीपंत' त्या सर्व कोठारांचे अधिकारी होते. थोडा काळ वाट पाहून त्यांनी सुलतानाची आज्ञा न घेताच प्रजेसाठी धान्याची कोठारे मुक्त केली व लोकांचे प्राण वाचवले. अर्थातच सुलतानाला ही गोष्ट रुचली नाही दामाजीपंतांना सुलतानी रोषाचा फटका बसलाच. त्यांना जेरबंद होऊन तुरुंगवास भोगावा लागला. पण एका अधिकाऱ्याच्या त्यागामुळे, कर्तव्यतत्परतेने प्रजेचे प्राण वाचले. दामाजीपंतांना लोक संत मानू लागले. ही दामाजीपंतांची कृती म्हणजे 'अपरिग्रहा'चे आदर्श उदाहरण होय.

म्हणून अवाजवी साठा न करणे म्हणजे 'अपरिग्रह'. कृत्रिम टंचाईसाठी साठा न करणे म्हणजे 'अपरिग्रह'. आपत्काली असलेल्या साठ्याचा योग्य उपयोग करणे म्हणजे खऱ्या अर्थाने 'अपरिग्रह.'

याला अपवाद फक्त ज्ञानाचा. ज्ञानाचा साठा मात्र जितका जास्त करता येईल तितका करावा. एखाद्याने ज्ञानाचा कितीही साठा केला तरी ज्ञानाची कधीच टंचाई निर्माण होत नाही. एखाद्याने सर्व जन्म जरी ज्ञानाचा साठा करण्यात वेचला तरी ज्ञानाच्या समुद्रातील जणू एक ओंजळभरच ज्ञान त्याला प्राप्त झालेले असते व बाकीचे शिल्लक राहते म्हणून जितके जास्त ज्ञान मिळविता येईल तितके मिळवावे व त्याचा साठाही करावा. तरीपण तो साठासुध्दा नुसता साठवून ठेवू नये तर जितका जास्त उपयोगात आणता येईल तितका आणावा. त्यामुळे तो कधीही संपणार नाही तर वाढतच जाईल म्हणूनच एका सुभाषितात कवी म्हणतो. 'अपूर्वः कोऽपि कोषोहि विद्यते तव भारती।' अर्थ असा, हे सरस्वती तुझा कोष म्हणजे साठा खरोखरच अलौकिक आहे. (कारण) जो खर्च करावा तितका वाढत जातो. धन

साठवले आणि ते खर्च करीत गेले की संपत जाते. पण मिळविलेला विद्येचा साठा 'शहाणे करुनी सोडावे। सकलजन।।' यासाठी खर्च करीत गेले असता तो वाढत जातो. म्हणजे अनुभवाने आपल्या ज्ञानात भर पडत जाते आणि मिळविलेल्या ज्ञानाचे विस्मरण तर होत नाहीच.

समाजाचे रक्षण व्हावे म्हणून अवाजवी साठा न करणे म्हणजे 'अपरिग्रह' या तत्वाचे पालन करणे हेच धर्माचरण. मग ते करताना दामाजीपंताप्रमाणे जीवनावर बेतले तरी स्वधर्म सोडून परधर्म म्हणजे या तत्वाचे पालन न करण्याचा करंटेपणा करु नये.

तात्पर्य असे, या चार तत्वांचे पालन केल्याने समाजाची धारणा होऊ शकते म्हणजेच समाजस्वास्थ टिकते म्हणून धारणात इति धर्म: श्री. विनोबा भावे आपल्या 'धर्मामृत' या पुस्तकात धर्मविचार सांगताना म्हणतात - 'भारतभूमीमध्ये अगदी वेदकालापासून आजपर्यंत 'धर्म' हा शब्द सतत चालत आला आहे. 'धर्म' हा शब्द संस्कृत आहे पण या शब्दाला दुसऱ्या कोणत्याही भाषेत नेमका प्रतिशब्द मिळत नाही धर्म शब्दाचा अनुवाद दुसऱ्या भाषेत करायला सांगितला तर मोठी फजिती होईल. दुसऱ्या भाषेत त्याचा अर्थ दिला जातो 'धर्म म्हणजे धर्म' लहान मुलाला जर विचारले की तुझ्या आईचे नाव काय? तर तो म्हणेल 'माझ्या आईचे नाव आई आहे. त्याला दुसरे नाव माहीतच नसते तसेच 'धर्म' या शब्दाचे आहे. हिंदुस्थानातील सर्व भाषांमध्ये 'धर्म' शब्दच चालतो.

धर्म हा एक व्यापक शब्द आहे. आपले जीवन ज्या नीती -विचारांवर आधारलेले असते त्यालाच धर्म म्हटले जाते. धर्म अविचल आहे. त्याची तत्वे कोठल्याही देशात आणि कोठल्याही काळात स्थिर असतात. उदा. सत्य, प्रेम, करुणा हे सद्‌गुण देश कालानुसार बदलत नाहीत म्हणून धर्म तो जो धारण करतो. ज्या तत्वांच्या अभावामुळे जीवन छिन्नविछिन्न होते अशी पायाभूत तत्वे. भगवन्ताने ज्या गुणांना दैवी संपत्ती म्हटले आहे. ती मूलभूत न बदलणारी आहेत. अशी पायाभूत तत्वे म्हणजे धर्म. या मूल्यांना न सोडणे, त्यांच्यावर अढळ टिकून राहणे म्हणजे धर्माचरण. विनोबांचे हे विचार भगवान पतंजलींच्या विचारांशी खूपच मिळते जुळते आहेत.

धर्म या शब्दाची दुसरी व्याख्या किंवा अर्थ गीतेच्या ३ऱ्या अध्यायातील ८व्या श्लोकात श्रीकृष्णानेच सांगितलेला आहे तो श्लोक असा. नियतं कुरु कर्मत्वं कर्म ज्यायो ह्य कर्मणः। शरीरयात्रापि च ते न प्रसिध्देद कर्मणः।।८।। अध्या ३ रा. अर्थ असा, विहित असे जे कर्म, ते तू करत जा. कर्म न करता रहाण्यापेक्षा कर्म करणे अधिक चांगले. कर्म केले नाहीस तर तुझे जीवन व्यवहारही सुरळीत चालणार नाहीत. या श्लोकावर भाष्य करताना ज्ञानेश्वर म्हणतात. 'म्हणशी नैष्कम्र्य होआवे। तरी एथ तें न संभवे। आणि निषिध्द केवीं राहाटावे। विचारीं पां ।।७७।। म्हणोनि जे जे उचित। आणि अवसरे करुनि प्राप्त ते कर्म हेतुरहित आचरतू ।।७८।। देखे अनुक्रमाधारें। स्वधर्मु जो आचरे। तो मोक्षु तेणें व्यापारे। निश्चित पावे।।२०।। अर्थ असा - कर्मे टाकून देऊ म्हणशील तरी जोपर्यंत देह आहे तोपर्यंत कर्मे टाकून कर्मातीत होणे संभवतच नाही. कारण कर्मे ही होतच राहाणार उदा. श्वासोश्वास, अन्नसेवन, मलमूत्र विसर्जन इ. असे जर आहे तर शास्त्रबाह्य वर्तन काय म्हणून करावे. म्हणून जे जे करण्यास योग्य व आवश्यक तसेच प्रसंगानुरुप प्राप्त झालेले कर्म असेल ते तू फलाशा सोडून करीत जा. जो कोणी वर्णाश्रमधर्मानुसार आपल्या वाट्याला आलेले विहित कर्म आचरणात आणतो त्याला त्या आचरणामुळेच मोक्षप्राप्त होतो हे निश्चित आहे.

वरील श्लोक व त्यावरील ज्ञानदेवांचे भाष्य याचा एकंदर भावार्थ लक्षात घेता 'धर्म' म्हणजे प्रसंगानुरुप वर्णाश्रमानुसार वाट्याला आलेले विहित कर्म असे म्हणावे लागते. आपला परिचित शब्द सांगावयाचा तर धर्म म्हणजे 'कर्तव्य'. जे करण्यास योग्य ते कर्तव्य. पुढे जाऊन ज्ञानेश्वर सांगतात - 'स्वधर्म जो बापा। तोचि नित्ययज्ञ जाण पां। म्हणोनि वर्तता तेथे पापा संचारु नाही ।।८१।। म्हणोनि स्वधर्मानुष्ठान। जे अखंड यज्ञयाजन। जो करी तथा बंधन। काहींच नाही।। ८३।। अर्थ असा, आपला जो धर्म म्हणजे कर्तव्य तोच नित्ययज्ञ असे समज. म्हणूनच त्याचे आचरण करीत असताना त्यात पापाचा शिरकाव होत नाही म्हणजे पाप लागत नाही. स्वधर्माचे आचरण करणे म्हणजेच यज्ञयाजन करणे. म्हणूनच स्वधर्माचरण जो करतो तो केव्हाच बंधनात पडत नाही तर तो मोक्षाप्रत जातो.

आता आपण विचार करणार आहोत तो व्यक्तिगत प्राप्त झालेल्या विहित कर्माचा. म्हणजेच व्यक्तीव्यक्तिला आचराव्या लागणाऱ्या धर्माचा म्हणजेच कर्तव्यांचा 'शिवमहिम्न' स्तोत्रात म्हटल्याप्रमाणे 'रुचीनां वैचित्र्यात्' प्रत्येकाची रुचि, आवड भिन्न असल्याने वाट्याला येणारी विहित कर्मेही भिन्न असणार हे ओघानेच आले. त्याशिवाय प्रसंगानुरुप, भूमिकेनुसार विहीत कर्म करावे लागणार तेव्हा प्रत्येकाच्या वाट्याला एकाच वेळी 'एकच धर्म' येईल असेही म्हणता येणार नाही. तर या जीवन रंगमंचावर तो जितक्या भूमिका करीत असेल तितकी त्या त्या भूमिकेला साजेशी विहितकर्मे त्याला करावी लागतील.

हे विधान चांगले समजून घेण्यासाठी आपण काही व्यक्तिंना कराव्या लागणाऱ्या कर्तव्यांचा जास्त सखोल अभ्यास करूया. पहिले उदा. मी घेणार आहे ते 'राजधर्माचे' व्यक्तिगत खरी पण एक व्यापक भूमिका समाज जीवनाला वळण लावणारी, प्रजाजनांचा आदर्श असणारी. भारतीय विचार धारेप्रमाणे आपण म्हणतो 'यथा राजा तथा प्रजा' जसा राजा असेल म्हणजे राजा जसा वागेल तशी प्रजा वागते. घराचा विचार केला तर आईवडील वागतील त्याचेच अनुकरण मुले करतात. गीतेतील २ऱ्या अध्यातील २१साव्या श्लोकात म्हटल्याप्रमाणे.

'यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः। स यत्प्रमाणं करुते लोकस्तदनुवर्तते ।।२१।। ३रा आध्या. अर्थ असा - श्रेष्ठ पुरुष जे आचरण करतो त्याचेच अनुकरण इतर सामान्य लोक करतात. तो जी गोष्ट प्रमाण मानतो. आदर्श मानतो त्यालाच इतर लोक आदर्श मानतात. यावरील ज्ञानेश्वरांचे भाष्य तर फारच समर्पक आहे ते म्हणतात 'एथ वडील जें जें करिती तया नाम धर्मु ठेविती। तेंचि येर अनुष्ठिती। सामान्य सकळ।।१५८।। हे ऐसे असे स्वभावें। म्हणोनि कर्म न सांडावे। विशेषें आचरावें। लागे संतीं।।१५९।।' अर्थ असा - या जगात थोर लोक जे कर्म आचरतात त्याला सामान्य लोक 'धर्म' असे म्हणतात आणि सर्वजण त्याचेच अनुकरण करतात म्हणून संतांनी म्हणजेच समाज धुरिणांनी आपले आचरण विशेष काळजीपूर्वक विचाराने केले पाहिजे.

आपण पाश्चात्यांप्रमाणे 'The people get the Government they deserve' म्हणजे लोक ज्या योग्यतेचे असतील त्या योग्यतेचे सरकार त्यांना मिळते. असे मानत नाही. असे मानणे म्हणजे मुलाची योग्यता असेल तसे आईवडील त्याला मिळतात व तसे वागतात असे म्हटल्यासारखे आहे. वास्तविक पहाता आईवडील जे संस्कार करतात व जसे वागतात तशी मुले निपजतात. मुलांमध्ये योग्यता काही जन्मजात उत्पन्न होत नाही. आणि जे काही गुणदोष जन्मत: येतात तेही मातापित्यांच्या गुणसूत्रानुसार येतात. मुलांमध्ये योग्यता निर्माण होते. ती आईवडील व समाजाकडून होणाऱ्या संस्कारामुळे. म्हणूनच भारतीय संस्कृतीने संस्कारांना विशेष महत्व दिले आहे. तेच नाते राजा व प्रजा यांचे आहे. तेव्हा उघड आहे की राजाची जी वागणूक प्रजाजन पाहतील तसे वागण्याचा प्रयत्न प्रजा करणार. या दृष्टीने राजाची भूमिका व्यक्तिगत खरी पण अतिशय व्यापक स्वरुपाची म्हणून पहिला मान राजधर्माला दिला आहे.

आता भारत प्रजासत्ताक आहे. त्यामुळे राजा नाही तर प्रजेचे, प्रजेने निवडून दिलेले प्रतिनिधी कारभार पाहातात तेव्हा प्रजेचे प्रतिनिधी म्हणून जे आमदार, खासदार, सभापति, राज्यमंत्री, उपपंतप्रधान, पंतप्रधान असे विविध लोक कारभार पाहतात. लोकांनी मोठ्या विश्वासाने त्यांच्यावर ही जबाबदारी सोपविली आहे तेव्हा त्यांचा कारभार, त्यांची प्रत्येक कृति ही अतिशय पारदर्शक असली पाहिजे. ते देशाचे स्वामी नाहीत तर सेवक आहेत हे ध्यानी घेऊनच कारभार झाला पाहिजे नाहीतर आजचा सावळागोंधळ आपण पाहतोच आहोत. भ्रष्टाचार हाच शिष्टाचार झाला आहे. सामान्य माणसाची अवस्था 'दे माय धरणी ठाय' अशी असहनीय झाली आहे. असो.

'आदर्श राजा' म्हणून सर्वांनी मान्यता दिलेला, गौरवलेला राजा म्हणजे प्रभु रामचंद्र आणि आदर्श राज्य म्हणजे 'राम राज्य'(म्हणूनच गांधीजींची भारताचे राज्य 'रामराज्य' व्हावे अशी अपेक्षा होती म्हणून प्रथम आपण रामाने आचरलेला राजधर्माचा विचार करुया आणि नंतर प्रजाजनांच्या म्हणजे सामान्य माणसांच्या कर्तव्यांचा.

राजधर्म - म्हणजे राजा म्हणून वाट्याला येणारी कर्तव्ये. 'रंजनात इति राजा' अशी राजा या शब्दाची व्याख्या केली जाते 'रंजन' म्हणजे

आपण हल्ली करतो तसा करमणूक असा मात्र अर्थ नाही. राजा म्हणजे काही खुषमस्कऱ्या नव्हे तर तो एक जबाबदार व्यक्ती आहे. तेव्हा प्रजेचे कल्याण म्हणजे रंजन. प्रजेचे कल्याण करणे हे राजाचे प्रमुख कर्तव्य. प्रजेचे कल्याण करण्यासाठी जे जे करावे लागेल ते ते सर्व त्याने केले पाहिजे. उदा. प्रजेचे पालन करणे, मार्गदर्शन करणे, रक्षण करणे जितके महत्वाचे तितकेच समाजकंटकांना शासन करणेही आवश्यक आहे. म्हणून अपराध्याला शिक्षा करण्याचे काम राजाचे म्हणून त्याच्या हाती असतो 'राजदंड'.

यादृष्टीने 'राम' हा राजा या नात्याने आहे आपला आदर्श. ज्याने प्रजेच्या हितासाठी काय केले नाही? प्रत्यक्ष स्वत:च्या प्राणापेक्षाही प्रिय असणाऱ्या आपल्या पत्नीचा सीतेचा त्याग करतानाही मागेपुढे पाहिले नाही. भारतीय संस्कृतीने राजा हा 'विष्णूचा अवतार' असे मानले आहे. त्याच्याबद्दल प्रजेच्या मनात प्रेम असले पाहिजे. भक्तीभावना असली पाहिजे, कोणता संदेह असता कामा नये. प्रजेच्या मनात राजाबद्दल लहानशी जरी शंका आली तरी त्यांच्या मनात चलबिचल होते. अशी चलबिचल लोकांच्या निष्ठेला बाधक ठरते. राज्य सुखरुप, समाधानी रहावे असे वाटत असेल तर लोक राजाशी व राजा प्रजेशी एकनिष्ठच असले पाहिजेत. प्रजेला राजाबद्दल नितान्त आदर असला पाहिजे व राजाला प्रजेबद्दल वात्सल्यभावना व आपत्यव्रत प्रेम हवे. तरच राजा प्रजेचे कल्याण करू शकतो व प्रजा सुखासमाधानाने, निष्ठेने राहू शकते.

म्हणून प्रजेच्या (काही लोकांच्या) मनात सीतेच्या चरित्र्यासंबंधी विकल्प उत्पन्न झाला आहे असे हेरांकडून समजताच राजा - रामाने पत्नी निरपराध आहे हे माहीत असूनही तिचा त्याग केला. पण प्रजेच्या मनात शंकेला जागा ठेवली नाही म्हणजेच राजधर्म पाळला. पर्यायाने 'राजा' या नात्याने 'स्वधर्म' पाळला 'Caesar's wife should be above suspicion' अशी एक इंग्रजी उक्ती आहे ती याच अर्थाची आहे.

सीता जर तुम्हाला साम्राज्ञी म्हणून मान्य नसेल तर मीच अयोध्येचे राज्य सोडून सीतेबरोबर वनात जातो. कसे झाले तरी ती माझी पत्नी आहे

आणि ती निर्दोष आहे हे मला माहीत आहे. असा बडगा त्याने प्रजाजनांना दाखवला नाही. राजा या नात्याने अयोध्यावासियांचे रक्षण करणे, पालन करणे, कल्याण करणे हे रामाचे कर्तव्य होते ते त्याने स्वत:च्या व पत्नीच्या सुखाचे बलिदान देऊन केले. वास्तविक सीतेवर तर घोर अन्याय झालेला आहे. तरीपण तिने या कर्तव्यपालनासाठी रामाचे कौतुकच केले आहे. तिला रामाचा राग आलेला नाही तर अभिमानच वाटला आहे. कारण व्यक्तीपेक्षा समष्टीचे सुख व कल्याण महत्वाचे हा मौलिक विचार दोघांच्याही डोळयांपुढे होता. तसे पाहिले तर बालपणी काय सुखसमाधान मिळाले असेल, लाडकोड झाले असतील तेवढेच पण पुढील सर्व आयुष्यात राम काय आणि सीता काय, दोघेही सद्गुणी असूनसुध्दा सुखाचा वारासुध्दा मिळालेला नाही तरीपण रामाने आपले कर्तव्य सोडलेले नाही. राजपद सोडून त्याने वनवासी जीवन स्वीकारले असते तर वनातील लोकांनी त्याचे स्वागतच केले असते. आणि अशा मन:स्थितीत राजवाड्यात राहून नाना प्रकारची राजकर्तव्ये करण्यापेक्षा रामालाही ते हजारपटीने सोपे व सुखकर झाले असते. पण ते योग्य नव्हते. आपल्या कर्तव्यापासून पळ काढणे अयोग्य ठरले असते. राम राज्य करीत होता म्हणून अयोध्या नावाप्रमाणे 'अयोध्या' होती, राज्य सुखरुप राहिले. भावाभावांमधील ऐक्य टिकून राहिले. अन्यथा राज्यात गोंधळ झाला असता, अनागोंदी माजली असती. त्यात सर्वांचेच जीवन उध्वस्त झाले असते. त्यापेक्षा रामाने स्वत:च्या व सीतेच्या सुखाचा बळी देऊन राज्य सुखरुप राखले, राजाचे कर्तव्य केले.

आक्षेप घेणारे विचार न करता रामाला सीतात्यागावरुन दूषण देऊन मोकळे होतात. दूषण देणे व उपदेश करणे सर्वात सोपे असते. वास्तविक रामाला राज्याचा मोह नव्हता हे त्याने ऐन उमेदीत राज्याचा मोह न करता १४ वर्षे वनवास स्वीकारला, भरत परत आणण्यासाठी गेलेला असताही तो आलेला नाही. यावरुन स्पष्ट झालेले आहेच. यावेळी तर राज्यपद सोडून वनवासात जाणे म्हणजे त्याच्यासाठी इष्टापत्तीच होती. पण राजा या नात्याने त्याचे ते विहित कर्म नव्हते म्हणजे राजा म्हणून तो त्याचा धर्म नव्हता. परधर्म होता. सुखाचा होता पण राजाने स्वत:च्या सुखाचा विचार

न करता प्रजाजनांचे सुख पाहणे, राज्याचे रक्षण करणे हा राजधर्म होता. वास्तविक तो सांभाळणे खूपच त्रासदायक होते. पण परधर्माचे पालन योग्य नव्हते. अंतीमत: ते फार क्लेशदायक ठरले असते.

राजधर्माचे पालन करताना निरपराध पत्नीवर केलेल्या अन्यायाची टोचणी रामाला मरणप्राय यातना देत नसेल असे म्हणता येईल काय? हे दु:ख सहन करण्यापेक्षा मरणसुध्दा सुखावह असे वाटल्यावाचून राहिले असेल काय? या रामाच्या उदाहरणावरुन स्वधर्मे निधनं श्रेय: । या उक्तीचा यथोचित अर्थ गवसतो।

मी वर म्हंटल्याप्रमाणे प्रत्येकाला एकावेळी एकच 'धर्म' आचरावा लागेल असेही नाही. एकाच वेळी तो जितक्या भूमिका करीत असेल त्या त्या भमिकेनुसार अनेक धर्म म्हणजे कर्तव्ये त्याला करावी लागतील. राम हा 'अयोध्ये'चा राजा होता तसा तो सीतेचा 'पती' होता. तेव्हा पती या नात्यानेही त्याला पतीचे कर्तव्य होतेच. फक्त पती तो एकाच व्यक्तीचा होता आणि राजा अनेक प्रजाजनांचा होता त्यामुळे 'राजधर्म' आणि 'पतीधर्म' असा संघर्ष आला तेव्हा त्याने व्यक्ती पेक्षा समष्टीला महत्व दिले व 'राजधर्म' स्वीकारुन अनेकांचे कल्याण केले, सीतेवर अन्याय होतो आहे हे ज्ञात असूनही. पण वैयक्तिक जीवनात त्याने 'पतिधर्म'ही डावा मानलेला नाही. जितके महत्व त्याने सामाजिक जीवनात 'राजधर्मा'ला दिले तितकेच महत्व त्याने वैयक्तिक जीवनात ''पतीधर्मा'' ला दिले आहे. कसे ते पाहूया.

पतीपत्नी यांचे नाते विचारात घेता सुख असो वा दु:ख असो वैभव मिळो वा आपत्ती येवो दोघांनीही त्यात सारखेच सहभागी व्हावयाचे असते. अशी एकमेकाला साथ करणारी पतीपत्नी 'अनुरूप' मानली जातात. राम-सीता हे तर अनुरूप पतीपत्नीचे आदर्श उदाहरण...

प्रजाजनांनी आक्षेप घेतल्यानंतर रामाने सीतेला महर्षी वाल्मिकींच्या आश्रमात पोचविण्यास लक्ष्मणाला सांगितले होते. त्यामुळे सीता वाल्मिकींच्या आश्रमात तपस्विनींचे जीवन जगत होती. रामाला राजाची कर्तव्ये करण्यासाठी अयोध्येत राहणे क्रमप्राप्त होते. तो राजवाड्यात रहात असला तरी राजाचे वैभवसंपन्न जीवन जगत नव्हता. तोही सीतेप्रमाणे तापसाचेच जीवन जगत

होता. त्याने राजवाड्यातील सुग्रास भोजनाचा आस्वाद कधीही घेतला नाही तर वनवासी तापसांप्रमाणे कंदमुळे फळे हाच त्याचा आहार होता. त्याने निद्रेसाठी मंचकाचा वा मऊमऊ गादीचा उपयोग केला नाही. तर वनातल्याप्रमाणे गवताच्या शय्येवरच तो शयन करीत असे. सीतेशिवाय 'कामिनी' म्हणून प्रत्यक्ष उपभोग तर नाहीच पण साधा विचारसुध्दा अन्य कोणत्याही स्त्रीबद्दल त्याच्या मनात आला नाही.

राजा असल्याने हे तीनही उपभोग त्याला सहज शक्य होते नव्हे सर्वांनी तो त्याचा अधिकारच आहे असे कौतुकाने मान्य केले असते. समोर असे ऐश्वर्य आहे. उपभोग घेण्यास शरीर सक्षम आहे असे असूनही त्या ऐश्वर्याकडे ढुंकूनही न पाहता 'सन्यस्त' जीवन जगून पतीधर्माचे पालन करणे 'ये तो नव्हे। लेकुराच्या गोष्टी।' थोडक्यात काय रामाने 'राजधर्माप्रमाणे' 'पतीधर्म'ही पुरेपूर आचरणात आणला पण दोन्हीही जीवघेणेच होते. या धर्मपालनापेक्षा 'मरणम् वरम्' असे वाटेल कोणालाही.

म्हणूनच राम हा आपल्या जीवनासाठी आपला आदर्श असावा असे म्हटल्यावाचून राहवत नाही. रामाचा आदर्श समोर ठेवलेल्या छत्रपती शिवरायांनी व माधवराव पेशव्यांनी आपला राजधर्म म्हणजेच स्वधर्म आचरणात आणला. म्हणूनच 'राजा म्हणजे उपभोगशून्य स्वामी' हे तत्व दृष्टीआड होऊ दिले नाही. स्वामी म्हणजे मालक पण कसा? उपभोगशून्य. किती कठीण काम. सर्व शक्ती पणाला लावून स्वतःच्या स्वास्थ्याची पर्वा न करता प्रजेचे कल्याण करावयाचे, राज्याचे रक्षण करावयाचे म्हणून तो स्वामी पण राजा म्हणून मिळणाऱ्या वैभवाचा मनासारखा उपभोग मात्र घ्यावयाचा नाही त्यावेळी 'उपभोग शून्य' शिवरायांना पोटच्या पोरावर माया करता आली नाही तर राजाचे कर्तव्य पार पाडल्यामुळे माधवरावांची आई-गोपिकाबाई रागावून दूर जाऊन राहिल्या. तो सल शेवटपर्यंत माधवरावांना सहन करावा लागला. या तिघांनी सहन केलेल्या दुःखा पेक्षा मरणसुध्दा सुखावह वाटावे अशीच ही दुःखे आहेत. हे स्वधर्म पालनासाठी स्वीकारलेले निधनच नव्हे काय? पण ते श्रेयस्कर कारण त्यामुळे त्यांनी समाजाचे हित साधले. प्रजेला स्वास्थ्य दिले.

लोकशाहीमध्ये 'राजधर्म' सांभाळावा लागतो पंतप्रधान आणि त्याचे सहकारी यांना आणि असा 'राजधर्म' सांभाळणारा पंतप्रधान या भारतानेही एकदा अनुभवला. लालबहादूर शास्त्री पंतप्रधान असताना एका वर्षी तांदूळाचे पीक चांगले आले नाही तर शास्त्रीजींनी न बोलता सोमवारी उपवास करुन स्वत: तांदूळ वाचवण्यास सुरूवात केली. परिणाम असा झाला की सर्व जाणकार भारतीयांनीही सोमवारी उपवास करून तांदुळाची उणीव भरुन काढली आणि त्यासाठी खर्च करावे लागणारे परकीय चलन वाचवले.

रामप्रमाणेच आपल्यापैकी प्रत्येकाला 'स्वधर्म' म्हणून एकापेक्षा अधिक धर्मांचे आचरण करावे लागते उदा. एकच व्यक्ती आपल्या मातापित्याचा मुलगा असतो म्हणून 'पुत्रधर्म' पत्नीचा पती असतो म्हणून पतिधर्म आपल्या अपत्यांचा पिता असतो म्हणून पितृधर्म, भारताचा नागरिक म्हणून 'राष्ट्रधर्म' अनेक शेजाऱ्यांचा शेजारी म्हणून शेजारधर्म, मित्रांसाठी मित्रधर्म इ.इ. जे पुरुषांचे तेच स्त्रीचे. ती आपल्या आईवडीलांची मुलगी असते तर सासुसासऱ्यांची सून. अशावेळी तिचा धर्म आज्ञापालनाचा आणि त्यासाठी वृत्ती हवी अतिशय विनयशील व नम्र नाहीतर तिच्या उध्दट बोलण्याने त्या वृध्दांचे मन विदीर्ण झाल्याशिवाय राहणार नाही स्वत:चे म्हणणे बरोबर असले तरी मऊमुलायम भाषेत ते पटवता आले पाहिजे. ज्येष्ठांची काळजी घेताना कित्येक वेळा मन मारून राहावे लागेल. पण त्याचे वाईट वाटून घेता उपयोगी नाही. मनाची योग्य समजूत घालता आली पाहिजे. प्रसन्न चित्ताने त्यांची सेवा करणे हा यावेळी तिचा 'धर्म' ती आपल्या पतीची खऱ्या अर्थाने 'सहधर्मचारिणी' झाली पाहिजे. पत्नी या नात्याने त्याला सुखी समाधानी ठेवणे हे तर तिचे कर्तव्य आहेच. पण जेवू घालताना तिने त्याची 'आई' झाले पाहिजे, इतर सांसारिक सुखदु:खात सखी व्हावे तर महत्वाचे निर्णय घेताना 'सचिवाची' भूमिका करता आली पाहिजे, संकटात बरोबरीने साथ करावी आणि वैभव प्राप्त झाले तर मनापासून उपभोगही घ्यावा. पती 'कर्तव्यात' चुकत असेल, अयोग्य वागत असेल, अधर्माचरण करीत असेल तर मात्र नम्रता स्वीकारुन चालणार नाही. अशावेळी जरुर ती कठोर भूमिका घेऊन सुध्दा पतीला योग्य मार्गावर आणण्याचे काम,

त्याच्याकडून धर्माचरण करून घेण्याचे अतीव अवघड काम तिने केले पाहिजे. अशा वेळी तिचे आदर्श हवेत 'कैकयी' किंवा 'द्रौपदी'. कैकयीने ज्याप्रमाणे स्त्रिला मिळालेल्या रुसवाफुगवा, लडिवाळपणा अश्रू इ. अनेकविध अस्त्रांचा उपयोग करुन, अभिनय कौशल्य पणाला लावून दशरथाकडून धर्माचरण करून घेतले परिणामत: पतीनिधनाचे आणि दुष्कीर्तीचे दु:खही सहन केले. तसेच द्रौपदीनेही आपल्या मोकळ्या केसांची याद वेळोवेळी देऊन भीमाला व अर्जुनाला पराक्रम करण्यास प्रवृत्त करुन दुर्योधनादी चांडाळ चौकडीने केलेल्या अन्यायचा, अनितीचा बदला घेण्यास प्रवृत्त करुन आपल्या पतींना धर्माचरण करणे भाग पाडले. कर्तव्यच्युत होऊ दिले नाही. स्वत:च्या निधनापेक्षाही दुस्सह असे पुत्र निधनाचे दु:खही सहन केले पण पत्नी म्हणून आवश्यक असे धर्माचरण केले.

अशाच पध्दतीने सद्य: स्थितीत घरात येणारा पैसा कोणत्या मार्गाने येतो यावर नजर ठेवून पतीला भ्रष्टाचारापासून दूर ठेवण्याचे कर्तव्य पत्नीचेच आहे असे म्हटले तर वावगे ठरु नये. पण त्यासाठी आलेल्या परिस्थितीत समाधान मानण्याची तयारी प्रथम पत्नीला करावी लागेल व तरच ती पतीला या अधर्माचरणापासून रोखू शकेल. अर्थात पतीला रोखण्यासाठी, विरोध करण्यासाठी खूप धैर्याची व निष्ठेची गरज आहे हेही तितकेच खरे आहे. हे काम वाटते तितके सोपे नाही पण कठीण काम पार पाडण्यातच खरा गौरव आहे नाही का? या दोन भूमिकांपेक्षाही मोलाची व मानाची पण तितकीच अवघड जबाबदारी म्हणजे 'मातृत्व' माता म्हणून कर्तव्य पार पाडताना अपत्यांना योग्य मार्गदर्शन करण्यासाठी लोण्यापेक्षा मऊ तर प्रसंगी वज्रापेक्षा कठीण व्हावे लागते. नेहमी कोमल, मुलायम, लाडिक भूमिका घेऊन आईचे कर्तव्य पार पाडता येणार नाही. आईने अशी भूमिका घेतली तर मुले चांगली निपजणार नाहीत. तेव्हा जरूर तेथे कडक होऊन का होईना पण त्यांचे कल्याण होईल असे वागले पाहिजे. येथे मला एक गोष्ट आठवली. एका गुन्हेगाराला फाशीची शिक्षा झाल्यावर रिवाजाप्रमाणे त्याला त्याची शेवटची इच्छा विचारली तो म्हणाला मला आईला भेटावयाचे आहे. सर्वांना त्यात काहीच वावगे वाटले नाही. आई रडत रडतच जवळ गेल्यावर त्याने तिला जोराचा चावा घेतला. तेव्हा मात्र सर्वजण अवाक होऊन पाहू लागले.

न्यायाधीश म्हणाले 'अरे हे काय?' मुलाने त्या स्थितीतही अगदी समर्पक उत्तर दिले. तो म्हणाला 'महाराज, मी पहिला गुन्हा केला तेव्हाच जर आईने मला योग्य शिक्षा करुन समजावले असते तर मी आजच्या स्थितीला आलोच नसतो. त्यावेळी ती तिच्या कर्तव्याला चुकली आहे, म्हणून तिला दिलेली ही सजा.' गोष्ट अगदी योग्य बोध देणारी आहे. अशा वेळी आईने नेभळट बनून चालणार नाही तसेच नेहमी संतापी स्वभावाच्या आहारी जाऊन किंवा आक्रमक बनूनही चालणार नाही. त्यामुळे मुलांना योग्य व आवश्यक प्रेम न मिळाल्याने ती आईपासून दुरावतील व प्रेमाअभावी त्यांच्या व्यक्तिमत्वाचा योग्य विकास होणार नाही. जे आईच्या बाबतीत तेच पित्याच्या संदर्भातही म्हणावे लागेल.

थोडक्यात असे म्हणावे लागेल की पालकांच्या पाच बोटातील चार बोटे मायेची, लाडाची असावीत पण एक बोट वेळीच कर्तव्यकठोर होणारे असले पाहिजे. योग्य वेळी योग्य शिक्षा हेही एक प्रकारचे वात्सल्यच. योग्य शिक्षा हा सुध्दा शिक्षणातील एक भाग होय, पण शिक्षा करण्याऱ्यामध्ये नैतिकतेचे अधिष्ठान हवे तेच नसेल तर त्याच्या शब्दांमध्ये सामर्थ्य प्रगटत नाही. शिक्षा म्हणजे क्रोधाचा आविष्कार नव्हे तर हितचिंतनाचा तो एक प्रकार असावा लागतो तरच मुलांवर त्याचा परिणाम होतो व मुले चारित्र्याची व यशाची मानकरी होतात आणि त्यासाठी कितीही कठीण परिस्थिती आली तरी 'जिजाबाई' सारखी तिळमात्रही न डगमगणारी, धैर्याने संकटाला सामोरी जाणारी माता बनणे अत्यंत जरुरीचे आहे. पुरुष असो वा स्त्री, संसारी जीवनातील खरे कर्तृत्व मुलांचे योग्य संगोपन करण्यात आहे हे नाकारता येणार नाही. पालक या नात्याने स्वत:चे कर्तव्य म्हणजे स्वधर्म योग्य प्रकारे आचरणे म्हणजे विस्तवावरुन चालत जाणेच असते. चटके बसत असले तरी थांबता येत नाही. दूर होता येत नाही.

बरे इतके करूनही तो Thankless job, ना कोणाला सोयर ना सुतक. मुले मोठी झाल्यावर, कर्तृत्ववान निघाल्यावर त्यांनी त्याची जाण ठेवली तर समाधान तरी मिळते आणि तसे न होता 'विशेष काय केलेत? तुमचे कर्तव्यच होते ते' अशी भावना व्यक्त केली गेली व दुर्लक्ष केले गेल तर 'निधनं परं' असे म्हणण्यावाचून पर्याय नाही. तरीपण स्वधर्म म्हणून आपली कामगिरी

पार पाडलीच पाहिजे. बरे मुलांना योग्य मार्गदर्शन झाले नाही तर मुले चांगली निपजणार नाहीत. चांगले नागरिक तयार होणार नाहीत पर्यायाने राष्ट्रकर्तव्यातही चूक केल्यासारखे झाले. शिवाय मुलांची दुर्दशा स्वत:च्या डोळयांनी पाहण्यासारखे तर दुसरे असहनीय असे दु:खच नाही. तेव्हा 'धरले तर चावते, सोडले तर पळते' या मराठी म्हणीची गत म्हणून १८ व्या अध्यायातील ३७ साव्या श्लोकाप्रमाणे 'यत्तदग्रे विषमिव परिणामेऽमृतोपमम्' म्हणजे सुरवातीला विषप्रमाणे कडू असला तरी परिणामी अमृताप्रमाणे गोड असा निदान स्वत:ला तरी समाधान देणारा स्वधर्म आचरणे हेच श्रेयस्कर नाही काय?

भारताचा नागरिक या नात्याने तर फारच मोठी नैतिक जबाबदारी येते. प्रत्यक्ष रामानेच म्हटले आहे 'जननी जन्मभूमीश्च स्वर्गादपि गरीयसी' भारतीय नागरिकांची जन्मभूमी 'भारत' भारत म्हणजे काही भारताचा केवळ भूभाग नव्हे तर भारतीय लोक. तेव्हा त्यांचे आपल्या हातून जराही नुकसान होऊ नये असे वागणे हे भारतीय नागरिक या नात्याने आपले कर्तव्य - स्वधर्म मग आपल्याला कितीही त्रास पडला, आर्थिक दृष्टीने नुकसान सहन करावे लागले तरीही प्रदूषणासारखी समस्या निर्माण होऊ नये म्हणून घरातील कचरा रस्त्यावर न टाकणे. आपल्या वाहनातील हानिकारक धूर बाहेर येऊ नये म्हणून वाहनाची योग्य देखभाल करणे यासारख्या लहानसहान गोष्टीपासून तो परदेशी माल वा परकीय संस्कृतीचे आक्रमण होऊ नये म्हणून योग्य ते प्रयत्न करण्यापर्यंत सर्व कर्तव्ये पार पाडावी लागतील. हे झाले सामान्य माणसाचे. पण अधिकार पदस्थांना तर कोणत्याही अमीषाला बळी न पडता देशहिताचाच विचार करावा लागेल. असे मोह आवरणे सोपे नसते हे खरे पण स्वधर्माचरणासाठी तो एक आवश्यक भाग आहे.

तोच भाग शेजारधर्माचा. सध्याच्या स्थितीत तर शेजारी हाच आपला खरा 'सोयरा' असतो. शेजारी सोयरा व्हावा असे वाटत असेल तर आपण प्रथम त्याचा सोयरा झाले पाहिजे. प्रसंगपरत्वे शक्य असेल ते सर्व सहकार्य केले पाहिजे. दोन गोड शब्द बोलणे, शेजाऱ्याची गैरसोय होणार नाही असे वागणे येथपासून तो कठीण प्रसंगात स्वत:ला कितीही त्रास पडला, चार पैसे

खर्च करावे लागले तरी आवश्यक ती सर्व मदत करावी लागेल तरच आपण शेजारधर्म आचरु शकू.

थोडक्यात एकाच व्यक्तीला अशी निरनिराळी कर्तव्ये म्हणजे एकापेक्षा अधिक धर्माचे आचरण करावे लागते तरच खऱ्या अर्थाने 'माणूस' म्हणून आपण जगू शकू. म्हणूनच 'धर्म म्हणजे कर्तव्य' या अर्थाने सुध्दा स्वधर्माचरण किती आवश्यक आहे तसेच ते किती अवघड आहे हे जाणवल्याशिवाय रहात नाही. पण 'परधर्म' म्हणजे स्वत:चे नसलेले कर्तव्य सोपे आहे, मोहक आहे, प्रतिष्ठा प्राप्त करुन देणारे आहे म्हणून स्वीकारुन भयावह परिस्थिती निर्माण करण्यापेक्षा 'स्वधर्माचरण' हे निश्चितच श्रेयस्कर होय.

साने गुरुजींनी 'धर्म' शब्दाचा अर्थ 'वर्ण' असा सांगितला आहे. वर्ण म्हणजे 'मूळस्वभाव' म्हणजेच जन्मत: येणारा 'गुणधर्म' उदा. सुगंध हा गुलाबाच्या फुलाचा गुणधर्म म्हणजे मूळस्वभाव. अवीट गोडी व मधुरवास हा हापूस आंब्याचा गुणधर्म. वसंत ऋतू आला की पंचमाचा सूर आळवणे हा कोकिळाचा स्वधर्म. तशीच प्रत्येक माणसाची जन्मजात अशी एक मूळ आवड असते. असा एक स्वभाव असतो आणि हा स्वभाव बदलू शकत नाही. म्हणूनच म्हटले जाते स्वभावो दुरतिक्रम: त्याला थोड्याफार प्रमाणात मुरड घालता येते आवश्यकतेनुसार पण पूर्ण बदलू शकत नाही.

म्हणूनच प्रत्येक माणसाचा एक मूळ स्वभाव असतो म्हणजेच जन्मजात एक आवड असते. ती ध्यानी घेऊनच आपण आपला व्यवसाय स्वीकारला तर प्रगती योग्य प्रकारे व लवकर होते. मग व्यवसाय करताना 'पाटया टाकाव्या' लागत नाहीत. त्याऐवजी दुसऱ्याचा व्यवसाय पैसे देणारा आहे. प्रतिष्ठेचा आहे याचा मोह वाटून तो स्वीकारला म्हणजे व्यवसायातील गोडी (Job satisfaction) संपून जाते केवळ 'यंत्रवत' काम होत रहाते. उदा. सध्या समाजात डॉक्टरी पेशा किंवा तांत्रिक व्यवसायाला प्रतिष्ठा आहे. तर शिक्षकीपेशा किंवा शेती करण्याचा उद्योग हा कमी प्रतीचा म्हणजेच 'निगुण' मानला जातो. जो व्यवसाय भरपूर कमाई मिळवून देतो तो प्रतिष्ठेचा मानला जातो इतकेच. खरे पाहता 'डॉक्टरी पेशा' हा पैसा मिळविण्याचे साधन असता कामा नये तर तो व्यवसाय म्हणजे समाजाचे आरोग्य

सांभाळणारा असला पाहिजे. डॉक्टरला रोग्याची सेवा ही देवपूजेप्रमाणे पवित्र वाटली पाहिजे. रोग्याचा रोग बरा करणे, त्याचे दु:ख कमी करणे हे डॉक्टरचे परम कर्तव्य. डॉक्टरांच्या भेटीतच रोग्याला दिलासा मिळाला पाहिजे. त्यासाठी डॉक्टरचे व्यक्तिमत्व प्रसन्न असले पाहिजे. व्यक्तिमत्व हा मनातील भावभावनांमुळे तयार होणारा घटक असतो. रोगी बरा झाल्याचे समाधान मनाची प्रसन्नता वाढवू शकते पण त्यावेळी मनात पैशाचा विचार रुंजी घालत नसेल तर, आणि त्यासाठी जन्मत:च त्यागी वृत्ती, सेवाभावी वृत्ती हवी. तरच हा पेशा मनापासून केला जाईल. अन्यथा तो सध्यासारखा 'धंदा'च होणार. पैसा मिळविण्याचे एक साधन. म्हणून ज्याचा मूळ स्वभाव त्यागात आनंद मानणारा, सेवेत समाधान मानणारा असेल तरच त्याने हा पेशा स्वीकारावा. पैसा मिळविणे, मौजमजा करणे, गाड्या उडविणे हेच जीवन सर्वस्व मानणारे तरुण जेव्हा अवास्तव फी भरुन, योग्यता नसतानाही पैशाच्या बळावर मेडिकल कॉलेजात प्रवेश घेऊन अशा अवैध मार्गानेच डॉक्टर होतात तेव्हा त्या पेशाचे नव्हे धंद्याचे भयावह परिणाम आपण नित्य अनुभवत आहोतच. डॉक्टरकडे गेले की पाण्यापेक्षाही सढळ हाताने पैसा खर्च करावा लागतो असे आपण सहज बोलून जातो. परिणामत: गरिबाने मरणाला सामोरे जावे पण डॉक्टरांकडे जाऊ नये हे समीकरण होत आहे. वर्ष-दोन वर्षात 'चारचाकी' दारात आली नाही तर काय उपयोग त्या शिक्षणाचा असा विचार करणाऱ्या डॉक्टरांना जीवन सार्थकी लागण्याचा अनुपमेय आनंद कसा मिळावा आणि समाजाला तर त्यांचा काहीच उपयोग नाही अपवाद फक्त लक्षाधीश माणसांचा त्याशिवाय ते शास्त्र अवगत करुन घेण्याची बुध्दी व आवड असल्याशिवाय त्यात पारंगत होता येणार नाही. त्यामुळे कित्येकवेळा योग्य निदाना अभावी, योग्य औषधोपचार न झाल्याने, आवश्यक ती काळजी न घेतल्याने रोगी दगावूही शकतो. रोग्याचे प्राण वाचविण्याऐवजी जर प्राण घेण्यात व्यवसायाची परिणती होणार असेल तर यापेक्षा 'भयावह' काय आहे. म्हणून कोणीही उठावे आणि डॉक्टर व्हावे असे होता कामा नये. असे होणे म्हणजे मोहापायी 'आंबा' सडविणेच होय.

या उलट शिक्षकीपेशा आज समाजात कनिष्ठ दर्जाचा म्हणजे 'विगुण' मानला जातो. कारण पैसा मिळवून देणारा हा व्यवसाय नाही आणि आपण

तर सध्या 'रुपया भोवतीच फिरतो' आहोत. वास्तविक हा पेशा माणसाचे जीवन उन्नत करणारा त्याचे मानसिक संतुलन सांभाळणारा असा वैभवशाली पेशा आहे. अर्थात कोणीही उठावे अन् शिक्षक व्हावे असा सहज सुलभही तो नाही. त्यासाठी सतत अध्ययन करण्याची तयारी हवी आणि अध्ययन करणे तसे सोपे नाही. अध्ययन करणाराला सुख मिळू शकत नाही. भरपेट जेवण, आणि सुखासनावर निद्रा यापरते काहीच मोलाचे नाही असे मानणारा अध्ययन करु शकत नाही. पण ज्याला अध्यापन करावयाचे आहे त्याने सतत अध्ययन केले तरच तो चांगले अध्यापन करु शकतो. 'सिंहाच्या' शिकारीची तयारी करावी तेव्हा सशाची शिकार करता येते असा शिक्षण शास्त्राचा नियम आहे. याचा अर्थ असा की शिक्षकाची इतकी जय्यत तयारी असेल तरच तो चांगले शिकवू शकतो. अन्यथा त्यालाही 'पाटयाच टाकाव्या'लागतात. पण जेवणापासून झोपेपर्यंत प्रत्येक सुखावर पाणी सोडण्याची तयारी असेल तर ज्ञानदानासारखा आनंद नाही. पण तो आनंद मिळविण्याची मनाची तयारी हवी, तशी आवड हवी, जन्मजात तो स्वभाव हवा. नेत्यापासून तो संतापर्यंत सर्वांना घडविण्याचे कार्य गुरु-शिक्षकच करीत असतो. चंद्रगुप्तासारखा राजा तयार करण्यासाठी आचार्य चाणक्यच लागतात. ज्ञानेश्वरांसारखा महानुभाव होण्यासाठी निवृत्तिनाथांसारखाच सद्‌गुरु भेटावा लागतो.

पण सध्या 'शिक्षणालाच' 'अनुत्पादित उद्योग' मानणाऱ्या आपल्या सारख्या करंट्यांना 'शिक्षकीपेशा' कनिष्ट वाटला तर नवल ते कोणते? 'मागता येईना भीक तर मास्तरकी शीक', अशी गुरुवर्यांची संभावना करणारा समाज भ्रष्टाचाराला शिष्टाचार मानणार हे सांगणे नलगे. आणि त्याचा परिणाम म्हणून 'चंगळवादा' शिवाय काय पदरी पडणार? त्याचे भयावह परिणाम मोठ्या प्रमाणावर अनुभवण्यासाठी 'आंबा सडण्यास' अजून थोडा अवधी असला तरी तो सडणार आहे हे नक्की.

या पेशाची इतकी घृणास्पद स्थिती येण्यामध्ये एकतर्फी समाजच दोषी आहे व तो पेशा स्वीकारणारांचा काहीच अपराध नाही असे म्हणता येणार नाही. खरे तर एवढा मानाचा पेशा करणाऱ्यांनाही त्याची प्रतिष्ठा सांभाळता

आली नाही असे म्हणण्यावाचून गत्यंतर नाही. पूर्वी विद्यार्थी गुरुगृही जाऊन रहात व विद्याभ्यास करीत. मग तो राम वा कृष्णासारखा राजपुत्र असो नाही तर सुदामदेवसारखा दरिद्री ब्राम्हण पुत्र असो आणि गुरुही शिष्यामध्ये कधी भेदभाव करीत नसत. कारण भेदाचे मूळ 'पैशाचा लोभ' हाच अस्तित्वात नव्हता. गुरुजींच्या मनात नव्हता. विद्या शिकून झाल्यावर गुरुने शिष्याला 'अवभृत स्नान' (म्हणजे विद्या पूर्ण झाल्याची खूण-म्हणून हल्लीच्या भाषेत पदवीदान) घातल्यानंतर विद्यार्थी गुरुंच्या अनुज्ञेने घरी परत येत आणि त्यावेळी विद्यार्थ्याला शक्य असेल तेवढी 'गुरुदक्षिणा' विद्यार्थी गुरुंना देत. गुरुने कधीही गुरुदक्षिणा मागितलेली नाही आणि ठराविक विद्येसाठी ठराविक दक्षिणा असेही ठरलेले नव्हते. ('फी' हा प्रकारच नव्हता) विद्या शिकवितानाही गुरुदक्षिणेचा विचार गुरुजींच्या मनाला कधी शिवला नाही. ज्या क्षणी गुरुजींच्या मनात चलबिचल झाली, मोह उत्पन्न झाला, वाईट वाटले त्याच क्षणी अध:पतन सुरु झाले, या पेशाचा सन्मान संपला. प्राण निघून गेला आणि राहिले फक्त कलेवर आणि हे बीज फार जुने आहे असे नाईलाजाने म्हणावे लागते. हा मोहाचा धागा थेट द्रोणाचार्यांपासून पुढे आलेला आहे असे नाईलाजाने म्हणावे लागते. त्यांच्या लाडक्या मुलाला 'दूध' म्हणून पिठात पाणी घालून द्यावे लागे. ही विपन्नावस्था द्रोणाचार्य सहन करु शकले नाही आणि परिणामत: त्यांनी कौरवपांडवांना धनुर्वेद (धनुर्विद्या) शिकविण्यासाठी राजवाड्यात राहण्याचे मान्य केले. तेथेच ही अप्रतिष्ठेची ठिणगी पडली. द्रोणाचार्य राजाचे मिंधे झाले आणि आजच्या घडीला विद्यादानासाठी ठराविक मोबदला (वेतन) घेऊनही वर्गात मनापासून न शिकविता तेच ज्ञान खाजगी शिकवणी करुन वा क्लासमध्ये शिकवून द्यावयाचे व दुपटीचौपटीने पैसा मिळवायचा ही जी व्यापारीवृत्ती निर्माण झाली आहे ती म्हणजे त्या ठिणगीचे वणव्यात झालेले रुपांतर आहे असे म्हणण्यावाचून गत्यन्तर नाही. वणवा पेटत्यावर अपरिमित नुकसान होणार हे गृहित तत्वच आहे.

पण हे शुभ चिन्ह नाही 'अध:पतन' आहे म्हणून ज्याला स्वभावत:च या पेशाची आवड आहे, अध्ययन, अध्यापनासाठी कष्ट करण्याची तयारी आहे, त्यागात आनंद आहे, वृत्ती खंबीर आहे, गरिबीत राहण्याची मनापासून

तयारी आहे. अशानीच हा पेशा स्वीकारला तर आणि तरच या पेशाला पुन्हा प्रतिष्ठा प्राप्त होईल. गुरुजींना यथोचित सन्मान मिळू लागेल.

दुध पाण्यापेक्षा मौल्यवान व पौष्टिक हे खरे असले तरी मासा पाण्यातच जगतो तो दुधात जीवंत राहू शकणार नाही. तसेच दुसऱ्याचा पेशा कितीही चांगला असला, पैसा उपलब्ध करुन देणारा असला, प्रतिष्ठित मानला जात असला तरी जीवन जगण्यातला आनंद तो व्यवसाय देऊ शकणार नाही म्हणूनच जीव गुदमरुन टाकणारा परक्याचा व्यवसाय शहाण्या माणसाने स्वीकारु नये. अशी आपआपला 'स्वधर्म' पाळणारी माणसे ज्या देशात बहुसंख्येने असतील ते राष्ट्र उन्नत होण्यास वेळ लागणार नाही. म्हणूनच गांधी-टिळक आदी जाणत्या नेत्यांचे अंतिम ध्येय केवळ स्वातंत्र्य हे नव्हते तर त्यांचे ध्येय होते भारत हे 'रामराज्य' व्हावे. ज्या राज्यात राम,लक्ष्मण, भरत, सीता, कैकयी, वसिष्ठ, विश्वामित्र, यांच्यासारखे समाज धुरीणच नव्हे तर बहुसंख्य प्रजाजनही स्वधर्म आचरणारे होते. म्हणून प्रजा सुखी होती. राजधानी नावप्रमाणे खरोखरच 'अयोध्या' होती.

'धर्म' या शब्दाच्या वरील अर्थाशी अगदी जवळचा असा एक अर्थ आहे. 'धर्म म्हणजे मूळ प्रकृती' जसे पृथ्वी स्वत:भोवती फिरता फिरता सूर्याभोवती प्रदक्षिणा घालते ही तिची 'मूळ प्रकृती' आहे. म्हणजेच तिचा तो 'स्वधर्म' आहे. ती स्वत: भोवती फिरते म्हणून दिवसरात्र होतात तर सूर्याभोवती प्रदक्षिणा घालते म्हणून ऋतू बदलतात. आणि म्हणूनच जगाचे रहाट गाडगे व्यवस्थित चालू आहे.

याउलट एका जागी स्थिर राहून प्रकाश देणे हा सूर्याचा 'स्वधर्म' आहे. समजा पृथ्वीने स्वत: भोवती फिरताफिरता सूर्याभोवती प्रदक्षिणा करण्याचा स्वधर्म सोडला. एका जागी स्थिर राहण्याचा सूर्याचा स्वधर्म पण पृथ्वीचा परधर्म तो स्वीकारला तर? तर मोठाच अनर्थ ओढवेल. भयानक परिणामांना सामोरे जावे लागेल. कोणते ते पाहू या. पृथ्वी एकाच जागी स्थिर झाली तर तिचा जो भाग सतत सूर्यासमोर राहील तो सूर्याच्या प्रखर उष्णतेने काही कालावधीतच जळून खाक होईल. त्या भागावर सतत सूर्यप्रकाश असल्याने माणसाला ती उष्णता सहन करणे कठीण होईल.

आवश्यक ती विश्रांती मिळणार नाही. कारण रात्र कधी होणारच नाही. रात्र नाही म्हणून झोप नाही. त्यामुळे माणूस कार्यक्षम राहू शकणार नाही. शान्तपणा, थंडावा मिळणारच नाही. त्यामुळे माणूस चिडचिडा, संतापी होईल. इतकेच नाही तर निसर्गावरही भयानक परिणाम होईल. शेते, झाडे सूर्याच्या उन्हाने करपून जातील. नद्या आटू लागतील. जमीनीला मोठमोठ्या भेगा पडतील. या उलट पृथ्वीचा जो भाग सूर्या समोर येणारच नाही, तेथे सर्वकाळ काळोखाचे साम्राज्य पसरेल, सूर्यप्रकाशच न मिळाल्याने वनस्पती उगवणार नाहीत, पिके येणार नाहीत, फळे-फुले येणार नाहीत. ढग तयार होणार नाहीत तर पाऊस कोठून येणार? पाणी कसे मिळेल जीवनसत्वे व प्राणवायू यांच्या अभावी जीवसृष्टीही नष्ट होईल. हे सर्व भयानक परिणाम पृथ्वीने 'स्वधर्म' सोडला त्याचे. पृथ्वी सूर्याभोवती प्रदक्षिणा घालते म्हणून ऋतू बदलतात. तो 'स्वधर्म' तिने सोडला तर पावासाळा येणार नाही. पाणी मिळणार कसे? थंडी पडते म्हणून जीवन समृध्द होते. पशूपक्षी मानव सर्वच सुखाने जगतात, आनंद उपभोगात हे सर्व असे चालू राहण्यासाठी पृथ्वीला आपले स्वधर्माचरण करीत राहिले पाहिजे.

एका जागी स्थिर राहून प्रकाश देणे, जीवनसत्व पुरविणे ही सूर्याची मूळ प्रकृती म्हणजे 'स्वधर्म' तोच जर त्याने सोडला तर, नुसती कल्पना सुध्दा भयावह वाटते. असे झाले तर! तर विश्वाचे अस्तित्वच धोक्यात येईल. सूर्य हा निष्ठावंत 'कर्मयोगी' आहे. तुम्ही त्याचे महत्व माना, त्याचे उपकार माना वा मानू नका, वंदन करा वा करू नका तो त्याचे प्रकाश देण्याचे काम निरलसपणे करीतच राहणार. त्याला रविवारची सुटी नाही, सुखाची आस नाही, दु:खाची खंत नाही. त्याचे एकमेव कार्य - प्रकाश देणे ते तो करीतच राहणार म्हणून जग निर्वेध चालू आहे.

आपले स्वधर्म अत्यंतिक निष्ठेने आचरणारा 'सूर्य व पृथ्वी' ही निसर्गातील दोन उदाहरणे आपल्यासाठी आदर्शभूत आहेत. ते आदर्श समोर ठेवून मानवानेही आपल्या जीवनात 'स्वर्धर्माचरण' केलेच पाहिजे. मग स्वधर्म आचरणे फारच कठीण जाते असे म्हणून चालणार नाही. म्हणूनच श्रीकृष्ण म्हणतो 'निधन प्रत्करावे लागले तरीही स्वधर्म सोडू नका'. आता

आपण मानवी जीवनाचा त्या दृष्टीने विचार करुया भारतीय संस्कृतीने मानवी जीवन शंभर वर्षांचे मानले आहे. त्याची चार विभागात विभागणी केली आहे. त्या प्रत्येक भागाला 'आश्रम' असे नाव दिले आहे हे सर्वश्रूत आहे. त्या त्या आश्रमाचा ठराविक असा 'स्वधर्म' हा ठरवून दिला आहे. तो 'स्वधर्म' आचरता यावा म्हणून काही नियमही तयार केले आहेत. हे नियम म्हणजे स्वतःच्या व समाजाच्या कल्याणासाठी स्वतःच स्वतःवर घातलेली बंधने होत. अर्थात कल्याण व्हावे असे वाटत असेल तर ही बंधने सांभाळणे क्रमप्राप्त आहे हे सांगणे नलगे.

असे नियम म्हणजे त्या त्या आश्रमाचा 'स्वधर्म' ज्याने ज्या आश्रमाचा स्वीकार केला असेल त्याने त्या आश्रमाचे नियम पाळलेच पाहिजे अन्यथा त्याचे घातक परिणाम झाल्याशिवाय राहणार नाहीत. 'वाहतुकी' चे नियम पाळले नाहीत तर तुम्हाला इच्छा नसली तरीही अपघात हा होणारच तेच तत्व इथे आहे. माणसाच्या शारीरिक क्षमतेचा व मानसिक अवस्थेचा विचार करून त्या आश्रमांचा गुणानुक्रमही ठरवून दिला आहे.

१) ब्रह्मचर्याश्रम - पहिली २५ वर्षे त्यापैकी पहिली ८ वर्षे बालपण - खेळण्या बागडण्याचे वय पुढची ८ ते २५ वर्षे हा जीवनातील उदयोन्मुख असा कालावधी. बुध्दी सक्षम झालेली असते. स्मरणशक्ती ताजीतवानी, संग्रह करण्यास, पाठांतर करण्यास समर्थ झालेली असते. शरीर सुदृढ असते. म्हणून या आश्रमाचा स्वीकार म्हणजे विद्यार्थी जीवनाला प्रारंभ. विद्या मिळविण्यासाठी अभ्यासाला पर्याय नाही. आणि अभ्यास करावयाचा तर मौजमजा, सुख, मनमानी निद्रा, चमचमीत भरपेट भोजन इत्यादी गोष्टींचा आनंद मिळणे दुरापास्त 'कुतो विद्यार्थिनः सुखम्' या संस्कृत पंक्तीचा हाच भावार्थ आहे. पण एकदा विद्यार्थीव्रत घेतले की सर्व नियम पाळलेच पाहिजेत. मुख्य नियम ब्रम्हचर्य सांभाळणे, अभ्यासात शरीर व मन सदृढ ठेवणे. हा कालावधी म्हणजे भावी जीवनाचा पाया तो जितका मजबूत व भव्य तितके भावी जीवनाचे शिल्प मजबूत व सौंदर्यपूर्ण. पण त्यासाठी हवा संयम, कष्ट करण्याची तयारी, मनाला मोहापासून दूर ठेवणे ही आहेत पथ्य.

एका विशिष्ट वयानंतर विद्या मिळविणे जमण्यासारखे नसते. वयानुरूप भावभावना बदलतात, स्मरणशक्तीही तितकी सतेज रहात नाही, त्यामुळे

स्वाध्याय लक्षात ठेवणे जड जाते. वयानुरूप काही जबाबदाऱ्या घ्याव्या लागलात. त्यामुळे अभ्यासाला पुरेसा वेळ मिळत नाही परिणामी या वयातच विद्या मिळविली नाही तर पुढे भिक्षा मागण्याशिवाय पर्याय नाही पण 'भिक्षापात्र अवलंबिणे! जळो जिणे लाजिरवाणे' ही उक्ती सर्वांना परिचित आहे. तेव्हा पुढे अपमानित जीणे जगण्यापेक्षा, कष्टात दिवस काढण्यापेक्षा योग्य वेळी विद्या मिळविणे हेच श्रेयस्कार नाही काय? मात्र येथे एक स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे. विद्या म्हणजे 'पुस्तकीज्ञान' असा मर्यादित अर्थ घेऊ नये तर विद्या म्हणजे सुतारकाम असेल, लोहारकाम असेल हातमाग चालविण्याची कला असेल, वा उत्तम शेती करण्याचे तंत्र असेल किंवा हल्लीच्या युगातील टंकलेखनाचे ज्ञान असेल, रेडियो वा दूरदर्शन संबंधिचे ज्ञान असेल, पत्रकारिता असेल नाहीतर संगणकाचे (कॉम्प्युटरचे) ज्ञान असेल. थोडक्यात ज्या माध्यमाद्वारे आपण स्वतःचे व स्वतःच्या परिवाराचे उदरभरण सुखाने करू शकू असे कोणतेही शिक्षण या वयातच घेतले पाहिजे. ते न करता या वयात चित्रपट दूरदर्शनाद्वारे होणाऱ्या संस्कारांमुळे, जरुरी पेक्षा जास्त पैसा (पॉकेटमनीच्या रूपात) हाती आल्यामुळे, पालकांचे असावे तितके लक्ष न राहिल्यामुळे, नको त्या गोष्टी करण्यात विद्यार्थी मशगूल झालेले दिसतात त्याचे फलित म्हणून व्यसनाधिनता, मनाचे संतुलन गमावणे, आत्महत्या, खून, वासनाकांड याशिवाय काय पदरी पडणार? आजच्या घडीला आपली मुले या सर्व गदारोळातून कशी वाचविता येतील असे मोठे प्रश्नचिन्ह प्रत्येक समजंस पालकापुढे 'आ' वासून उभे आहे. ही समाज स्थिती भयावह नाही असे तुम्ही म्हणू शकाल काय? याचे कारण आहे 'ब्रह्मचर्याश्रमा'चे स्वधर्मचरण करण्यात होणारी हयगय.

२) गृहस्थाश्रम - ब्रम्हचर्याश्रमात मिळविलेल्या ज्ञानाच्या बळावर आपला 'योगक्षेम' म्हणजे 'उपजीविका' चालविण्यास ती व्यक्ती समर्थ झालेली असते. वयानुसार दोनाचे चार हातही होतात. याचवेळी खऱ्या अर्थाने 'गृहस्थ' व्हावयाचे म्हणजे घरात राहून आपल्या संसाराला उमेदीन सुरूवात करण्याचा असा हा कालावधी २५ वर्षापासून ५०/६० वर्षापर्यंत. हा आश्रम सर्व आश्रमांमध्ये महत्वाचा. सर्व समाजाला आधारभूत समर्थ रामदास म्हणतात

‘नानावेष, नाना आश्रम। सर्वांचे मूळ गृहस्थाश्रम। जेथे पावती विश्राम । त्रैलोक्यवासी।। देव,ऋषी, मुनी योगी । नाना तापसी वीतरागी। अतीत अभ्यागत।।’ हे सर्व गृहस्थाश्रमातच निर्माण होतात हे खरे पण या सर्वांना भिक्षेकरीता पुनः गृहस्थाच्याच घरी यावे लागते. कारण अन्न (जेवण, भिक्षा इत्यादी) गृहस्थच देऊ शकतो. या कारणे गृहस्थाश्रम सकाळांमध्ये उत्तमोत्तम। परंतु पाहिजे स्वधर्म। आणि भूतदया।।४।। जेथे षट्कर्म चालती। नियुक्त क्रिया आचरति। वाग्माधुर्ये बोलती। प्राणी मात्रासी।।५।। दशक १४ समास ७ समर्थ रामदास जेंव्हा ‘स्वधर्म’ पाहिजे असे आवर्जून सांगतात. तेव्हा त्याला विशेष महत्व आहे हे सांगण्याची गरज नाही. मग तो ‘स्वधर्म’ कोणता ते पाहूया.

गृहस्थाश्रमाचे आधारस्तंभ म्हणजे ‘पतिपत्नी’ ते एकमेकांशी निष्ठेने वागणारे हवेत. ‘धर्मे च अर्थेच कामे च। नातिचरामि।। नातिचरामि।। नातिचरामि।।’ अशी त्रिवार शपथ दोघांनी विवाहाच्या वेळी घेतलेली असते. तिचा नीट अर्थ लक्षात घेऊन पतिपत्नीने या तिन्ही क्षेत्रात सदाचरणाचे उल्लंघन करू नये व या आश्रमाचे पावित्र्य राखावे.तसेच कुलपरंपरा, कुळधर्म चालविण्यासाठी मुलांच्या कल्याणासाठी, वृध्दांच्या आधारासाठी, अतिथी अभ्यागतांच्या पाहुणचारासाठी, तापसी संन्याशांच्या भिक्षेसाठी, पर्यायाने समाजाच्या स्वास्थ्यासाठी कष्ट करण्याची, त्याग करण्याची तयारी हवी. यात कोठेही स्वार्थी विचाराला जागाच नाही. किंबहुना हे सर्व सांभाळताना स्वतःच्या सुखाला, मौजमजेला वेळच मिळण्याची शक्यता खूप कमी. सणावाराच्या निमित्ताने काय मौजमजा होईल तीच खरी.

राष्ट्रात जे वातावरण असावे असे वाटते ते घरात तयार झाले पाहिजे त्यावरच चर्चा घरात होत राहिली पाहिजे. कारण राष्ट्राची लहान प्रतिकृति म्हणजेच कुटुंब. बोलण्यात वागण्यात संयम सांभाळता आला पाहिजे. सचोटीचा, सदाचाराचा आदर्श प्रौढांच्या वागणूकीतून न बोलता सतत समोर दिसला पाहिजे. पैशापेक्षा सुखशांतीला महत्व असल्याचे मुलांना जाणवले पाहिजे. घरातील कर्ती माणसे निर्व्यसनी, सदाचारी, अध्ययन करणारी, दानधर्म करणारी, गोड बोलणारी, नोकरमाणसांवर तसेच पशूपक्षांवर प्रेम

करणारी असली पाहिजेत. कारण मुले अनुकरण प्रिय असतात. घरातील वातावरणाचा परिणाम त्यांच्यावर न कळत होत असतो. शब्दात चारित्र्य व प्रामाणिकपणा असेल तरच त्या शब्दांचा परिणाम होतो आणि शब्दात ह्या गोष्टी येतात. वागणुकीमुळे स्वत: भ्रष्ट असलेले पालक मुळातच बोथट असतात. त्यामुळे घरातल्या नव्या पिढीवरचा आदराचा अकुंश नाहीसा होतो. आपुलकी ही सगळ्यात महत्वाची गोष्ट. तेथे धाक व प्रेम दोन्हीही गोड होतात म्हणून 'आपुलकी' हा या आश्रमाचा पाया. तो मजबूत करण्याचे काम घरातल्या कर्त्या माणसांना जमले पाहिजे. हे सर्व सांभाळताना मुख्य आधारभूत व्यक्तींना खूपच मेहनत घ्यावी लागते. मन मारावे लागते. खूपच बंधने सांभाळावी लागतात. पण ही सर्व बंधने म्हणजेच या आश्रमाचा 'स्वधर्म' हा स्वधर्म आचरता आला नाही तर होणारे दुष्परिणाम अतीव भयानक. ही बंधने न सांभाळता, त्रास नको म्हणून कसेही वागणे म्हणजे 'परधर्म' हा परधर्म स्वीकारला तर. तर काय! कुटुंब उध्वस्त होईल, मुले बिघडतील, वाटेल तशी वागू लागलीत, वृध्द निराधार होतील, नोकर माणसे, पशुपक्षांना कोणी वालीच उरणार नाही. पाहुण्यांना, गरीब दुबळ्यांना दिलासा मिळणार नाही. परिणाम म्हणजे समाजाचे स्वास्थ्य हरवून जाईल. कोणाचा पायपोस कोणाच्या पायात राहाणार नाही. नदीचे वा समुद्राचे पाणी दूषित झाले म्हणजे जलचर प्राण्यांना प्राणास मुकावे लागते. तोच न्याय इथे. समाजस्वास्थ संपल्यावर त्यातील (समाजातील) माणसांना स्वास्थ कोठले?

याचा काहीसा अनुभव आपल्याला येऊ लागला आहे. कदाचित काही कालावधी नंतर सर्वत्र वसतिगृहे, वृध्दाश्रम, अनाथालये, छुपी वेश्यागृहे यांचाच सुळसुळाट होईल. श्रध्दादिना ऐवजी मातृदिन, पितृदिन साजरे करावे लागतील. शिक्षणाची, शाळा कॉलेजांची गरजच राहणार नाही, 'संस्कार' हा शब्दच हरवून जाईल. भ्रष्टाचार हाच शिष्टाचार होईल. समाज पैशाने समृध्द पण मनाने हवालदिल होईल. घरे वरुन दिसण्यात संगमरवरी पण आतून थडगी बनतील. थोडक्यात भारताला ललामभूत असणारी कुटुंबव्यवस्था पूर्णतया निकालात निघेल आणि आपण पुन: एकदा अश्मयुगाकडे जाऊ. ही नुसती कल्पना सुध्दा भयावह, मन थरारुन सोडणारी

वाटते आहे, खरं ना? म्हणूनच वेळीच सावध होऊन आपण गृहस्थाश्रमाचा स्वधर्म कसोशीने आचरला पाहिजे.

३) वानप्रस्थाश्रम - या आश्रमाचे वैशिष्ठ्य असे की घर सोडून तर जायचे नाही पण घरात राहून स्वत:चा अधिकार न गाजवता निर्मल वृत्तीने राहावयास शिकायचे. वानप्रस्थ म्हणजे वनात जाण्यासाठी प्रस्थान ठेवण्याचा कालावधी म्हणजे त्यासाठी मनाची तयारी. वानप्रस्थाची नवी व्युत्पत्ती अशी 'न प्रस्थ' म्हणजे घरातील आपले प्रस्थ कमीकमी करुन मुळीच प्रस्थ नाही असे रहाणे. पूर्वी लोक संन्यास घेतल्यावर गावात रहात नसत तर वनात रहात असत. घर सोडण्याची तयारी सहजासहजी होणार नाही. खानदेशकन्या कवि बहिणाबाईंनी म्हटल्याप्रमाणे 'मन हे ओढाळ गुरं' कितीही हाकला ते परत परत पिकाकडेच येते. तसे आहे मनाचे. ते सहजी संसारातील अधिकारांपासून निवृत्त होणार नाही म्हणून पूर्वसुरींनी हा काळही सर्वधारण २०/२५ वर्षांचा ठेवला आहे. यावरुन भारतीय ऋषीमुनी मानसतज्ञ होते असे कबूल करणे भाग आहे. गोड पदार्थावर बसलेली माशी एखदेवेळी पटकन् उडून जाईल पण माणसाचे मन फार चिकटू असते.

पण समाजस्वास्थ्याचा विचार केला तर तरुण मनाला, नव्या पिढीच्या कर्तृत्वाला वाव द्यायलाच हवा. अन्यथा त्यांची कुचंबणा होईल. त्यांचे कर्तृत्व बहरणार नाही. मोठ्या झाडाखाली लहान झाडाची योग्य वाढ होत नाही हे समजून घेऊन ठराविक कालावधीनंतर प्रौढांनी आपण स्वत:च दूर होणे हेच योग्य नाही काय? त्यांच्या शरीरस्वास्थ्याच्या दृष्टीनेही हे करणे जरुरीचे आहेच. कारण पूर्वीसारखी गृहस्थाश्रमातील धावपळ झेपणे जडच होणार असते. म्हणून घराची जबाबदारी हळूहळू नव्या पिढीवर सोपवून प्रौढांनी काढता पाय घेण्याचा असा हा कालावधि, शक्यतोवर कोणाला त्रास होणार नाही असं वागणे आवश्यक. त्यासाठी आपले खाणे-पिणे, फिरणे, घरातील सहभाग सर्वांवरच बंधन घालायचे. हे बंधन स्वत:च स्वत:वर घालून घ्यायचे. कारण दुसऱ्याने घातलेले बंधन त्रासदायक वाटते. पारतंत्र्याप्रमाणे बोचते. तरुणांच्या कारभारात लुडबुड करावयाची नाही. समर्थांनी म्हटलेच आहे 'ना आयके त्यास शिकवी। तो एक मुर्ख।।' हे ध्यानी घेऊन विचारल्याशिवाय

सल्ला देणे, एखादी वस्तू करण्यास शिकविणे अशा भानगडीत पडावयाचे नाही. फारच नुकसान होत असेल तर सल्ला देणे भाग असते. पण दिलेला सल्ला विचारात घेतला गेला नाही तरी खंत वाटून घ्यायची नाही. योग्य वाटले ते सांगितले आता आपला कार्यभाग संपला हे चटकन ध्यानी घ्यावयाचे. आपल्या माणसांनाच आपला मायेने, आपुलकीने दिलेला सल्ला अडचणीचा वाटू लागलाय हे समजून घेणे यापरते शहाणपण नाही. जीवनातील अनेक गोष्टी अनुभवांची किंमत देऊनच शिकायच्या असतात. म्हणून आपल्या अनुभवांचा डोस पाजण्याच्या भानगडीत पडावयाचे नाही. मदत मागितली तर हात पुढे करावयाचा असे जीवन जगण्याचा एकमेव मार्ग आहे. तो ज्याला जमतो तो जिंकतो.

हळूहळू मन संसारावरुन काढून ईश्वर चरणी लावणे, ज्याला भक्तीची आवड नसेल किंवा ईश्वरावर विश्वास नसेल त्याने एखादा छंद जोपासावा जो वेळेअभावी पूर्वी जमला नाही. उदा. गाणे शिकणे, पेटी शिकणे, लहान मुलांना शिकविणे इत्यादी. समाजसेवेची आवड असेल तर ती करावी, लेखन वाचन आवडत असेल तर ते करावे. परिस्थितीनुरुप करता येण्यासारखे असेल ते करावे पण अहंकाराच्या आहारी न जाता संसारापासून निवृत्त होण्याचा प्रयत्न करावा.

अशा पध्दतीचे आचरण म्हणजे जो ‘स्वधर्म’ तो टाकून मन संसारातच गुंतवून नव्या पिढीच्या कारभारात लुडबुड करण्याचा प्रयत्न करणे हा ‘परधर्म’ हा जर स्वीकाराल तर तरुण पिढीकडून अपमान झाल्याशिवाय राहणार नाही. असा अपमान सहन करणे हे मरणापेक्षाही दुस्सह, भयावह म्हणून स्वधर्माचरण करणेच श्रेयस्कर आणि आता ‘बघताबघता साठी आली। सुनांची राज्ये सुरु झाली। आणि जीवनमूल्येच बदलली, अता दुय्यम स्थानावर सरकायचं। डोळे उघडे ठेवून सारं बघायचं, खटकल्या बाबीना टाळायचं। अन् गुणांच कौतुक करायचं, पण कुणी विचारल तरच सांगायचं।अन् निवृत्त जीवन जगायचं, पण नाही कशामध्ये गुंतायचं। हळुच त्यातून सटकायचं अन् श्रीराम जयराम म्हणायचं।।’ या विद्याताई आपटे यांच्या काव्यात जणू या आश्रमाच्या स्वधर्माचे सार सांगितले आहे असेच म्हणावे लागेल.

४) संन्यासाश्रम - जीवनातील शेवटचा टप्पा. चढत्या वाढत्या श्रेणीने प्रत्येक आश्रमानुसार अवघड होत गेलेले ‘स्वधर्माचरण’ पण प्रत्येक आश्रमानुसार जर आपण स्वधर्माचरण करीत आलो असलो तर अवघड होत गेलेले धर्माचरण करण्याइतपत आपले मन व बुध्दी तसेच वृत्तीही प्रगल्भ झालेली असणार हे निश्चितच. मग अवघड जबाबदारी स्वीकारणे जड जाण्याचे कारणच पडणार नाही.आणि समजा अवघड वाटली तरीही, अवघड असेल ते यशस्वी करण्यातच खरा पुरुषार्थ. मग या शेवटच्या टप्प्यावर तरी पुरुषार्थ करणे जमते का ते पाहूया. निदान प्रयत्न तर करण्यास प्रत्यवाय नसावा ना.

परमार्थ साधन किंवा लोकसेवेचे व्रत हे संन्यासाश्रमाचे कर्तव्य म्हणजेच ‘स्वधर्माचरण’. या आश्रमात ‘जो विभक्त नाही तो भक्त’ या अर्थाने ईश्वराचा भक्त होता आले पाहिजे. ईश्वरचिंतनात मन अशा पध्दतीने एकाग्र करण्याचा प्रयत्न केला पाहिजे किंवा ‘लाभाविण करी प्रिती’ तो सुहृद असा समाजाचा ‘सुहृद’ होता आले पाहिजे. समाजाकडून कशाचीही अपेक्षा न करता समाजासाठी झटता आले पाहिजे. पैसा तर राहोच पण समाजाकडून मान, सन्मान, कीर्ती कशाचीही अपेक्षा असता कामा नये.

ईश्वराचा खऱ्या अर्थाने भक्त होणे सोपे नाही तसेच समाजाचा खरा ‘सुहृद’ होणे हेही सोपे नाही. सेवा करणाराला सेवेचा कोणताच मोबदला नको असला तरी समाज शेणगोळे, दगड मारण्यापासून जीवे मारण्यापर्यंत कोणताही मोबदला केव्हा देईल हे सांगता येणार नाही. तसेच शिवीगाळ करण्यापासून ते चारित्र्यहनन करण्यापर्यंतची शिक्षा केव्हा सुनावतील याचाही नेम नसतो. स्वा.सावरकर, आगरकर, म.गांधी, सावित्रीबाई फुले, ज्योतिबा, लोकमान्यांपासून ते ज्ञानेश्वरापर्यंत कोणीही याला अपवाद ठरलेले नाही. मरणोत्तर दिल्या जाणाऱ्या मंत्राग्नीचे चटके त्या कलेवराला बसत नाहीत म्हणूनच की काय त्याचा अनुभव या लोकोत्तर पुरुषांनासुध्दा जीवंतपणी समाजाकडून घ्यावा लागतो. पण मुक्ताबाईने म्हटल्याप्रमाणे ‘जग झाल्या वन्हि। संता व्हावे लागे पाणी।’ ही वृत्ती असणाऱ्यालाच हे जमू शकेल. तोच समाजसेवक जीवंत मरण पत्करून हा स्वधर्म पार पाडू शकेल पण ते त्याला करावेच लागते. तसेच ईश्वरभक्ती करतानाही परमेश्वराचा

साक्षात्कार होईपर्यंत रामदासांसारख्या भक्ताची सुध्दा आत्यंतिक तगमग झाली आहे हे त्यांच्या 'करुणाष्टका' सारख्या काव्यातून जाणवते. मग आपल्या सारख्या सामान्य माणसाची काय कथा. तरी पण या आश्रमाचा जो 'स्वधर्म' तो सोडता येणार नाही. आणि स्वधर्माचा त्याग केला तर 'अरत्री ना परत्री' अशी 'त्रिशंकू अवस्था' वाट्याला येऊन हालच होणार शिवाय अपकीर्ती होईल ती निराळीच. हे भयानक परिणाम सहन करण्यापेक्षा 'स्वधर्माचरण' करण्याचा प्रयत्न करीत रहाणे हेच श्रेयस्कर होय.

हे चारही आश्रम एकानंतर दुसरा अशा क्रमानेच आचरावयाचे आहेत. माणसाच्या शारीरिक व मानसिक क्षमतेचा विचार करुनच हा क्रम ठरविलेला आहे. तेव्हा एका आश्रमाची कर्तव्ये पूर्ण केल्यानंतरच पुढील आश्रमाचा स्वीकार अपेक्षित आहे. एखाद्या आश्रमातील 'स्वधर्म' झेपत नाही म्हणून, कंटाळा आला आहे म्हणून, रस वाटत नाही म्हणून, विरक्ती आली असल्यानेसुध्दा त्या आश्रमातील स्वधर्माचा त्याग करुन, तो अर्ध्यावरच सोडून एकदम पुढच्या आश्रमाकडे वाटचाल करता येणार नाही. असे केल्याने किती भयावह परिस्थिती येते याचे एक आणि एकच उदाहरण डोळ्यात अंजन घालण्यास पुरेसे आहे.

ते उदाहरण आहे ज्ञानियांचा राजा, महायोगी, अभिजात कवि व माऊली ही बिरुदावली भूषविणाऱ्या ज्ञानेश्वरांचे पिताश्री 'विठ्ठलपंतां'चे. विठ्ठलपंतांच्या योग्यतेपुढे मी नतमस्तक आहे. ज्ञानेश्वरांना गुरुस्थानी असलेले निवृत्तिनाथ ज्ञानियांचे राजे असे ज्ञानदेव, सोपानदेव, आदिमाता असलेली मुक्ताबाई अशी एकाहून एक सरस अशा चार अपत्यांना जन्म देणारे विठ्ठलपंत त्यांची योग्यता जाणत असल्याने त्यांची अगदी मनापासून क्षमा मागून त्यांच्या पायांवर श्रध्देने माथा ठेवूनसुध्दा केवळ 'स्वधर्मा' चा त्याग करून 'परधर्म' स्वीकारणे किती भयावह होते हे सर्वांच्या मनावर बिंबावे म्हणूनच फक्त हे उदाहरण घेत आहे. हे मी चांगले जाणते पुन: एकदा त्यांची व वाचकांचीही क्षमा मागते व पुढे जाते.

एवढ्या ज्ञानी, शीलवान, सदाचरणी माणसाच्या हातून गृहस्थाश्रमाची कर्तव्ये पूर्ण न करता, संसारात मन रमेना, विरक्ती उत्पन्न झाली आहे. तेव्हा तो सोडावा व संन्यास घ्यावा या मोहामुळे संसाराचा त्याग करुन

संन्यास दीक्षा घेण्याचा प्रमाद घडला आणि केवढे भयावह परिणाम भोगावे लागले हे आपणा सर्वांना ज्ञात आहेच केवळ स्मरणाने सुध्दा अंगावर काटा येतो. भले हे परिणाम फक्त विठ्ठलपंतानाच भोगावे लागले असे नाही तर त्यांची पत्नी 'रुक्मिणीबाई' तसेच निवृत्ती ज्ञानदेवादी मुले यांनाही भोगावे लागले. वास्तविक पाहता त्यांचा तसा काहीच अपराध नव्हता.

विठ्ठलपंताचे सद्‌गुरु 'श्रीपादस्वामी' यांना खरी हकीगत समजल्यानंतर त्यांनी विठ्ठलपंतांना प्रथम गृहस्थाश्रमाची कर्तव्ये पूर्ण कर आणि मगच संन्यास घे असे म्हणून परत पाठविले तेव्हासुध्दा संसाराची मुळीच आसक्ती नसलेल्या विठ्ठलपंतांनी आपल्या गुरुजींची नाना प्रकारे विनवणी केली पण श्रीपादस्वामींनी त्यांचे काहीही ऐकले नाही. प्रथम गृहास्थाश्रमाची कर्तव्ये पूर्ण कर व मग संन्यास घ्यायला ये अशीच आज्ञा दिली. यावरुन स्वधर्माचरणाला केवढी मोलाची किमंत आहे हे जाणवल्याशिवाय रहात नाही. पुढे विठ्ठलपंतांना ज्या यातना भोगाव्या लागल्या त्याची कल्पना श्रीपादस्वामींसारख्या जाणत्या गुरुला नसेल असे मानण्यास मन धजावत नाही. पण स्वधर्माचरण झालेच पाहिजे त्यात हयगय होता कामा नये, ती हयगय करणाराला योग्य असे शासन झालेच पाहिजे हीच श्रीपादस्वामींची धारणा असावी असे वाटल्यावाचून रहात नाही.

विठ्ठलपंतांनी लग्न केले होते. तेव्हा गृहस्थाश्रम हा त्यांचा आश्रम होता. त्या आश्रमाचा 'स्वधर्म' आचरणे हे शास्त्रसंमत होते. गृहस्थाश्रमात प्रवेश केल्यानंतर वंशवृध्दीसाठी पुत्रप्राप्ती-अपत्यप्राप्ती होत नाही किंवा पत्नी संसार सोडण्यास 'मनापासून' परवानगी देत नाही तोपर्यंत विठ्ठलपंताना संसाराची कर्तव्ये करणे क्रमप्राप्त होते, मग त्यांना संसार कितीही नकोसा वाटत असला तरी. एरवी वैराग्य हा फार मोठा गुण मानला जातो. पण स्वधर्माचरण टाकून वैराग्याचा स्वीकार मान्य नाही. वैराग्य जरी प्राप्त झाले तरी गृहस्थाश्रमाची कर्तव्ये पूर्ण होत नाहीत तोपर्यंत संन्यास घेणे म्हणजे 'परधर्मा'चा स्वीकार होता आणि विठ्ठलपंतानी स्वधर्माचरणाचा त्याग करुन 'परधर्म' स्वीकारला होता. त्यामुळेच त्यांना इतके भयावह परिणाम भोगावे लागले. इतक्या गुणी, निरपराध, लहान मुलांना वाऱ्यावर सोडून 'देहान्त शासन' म्हणून स्वत:ला इंद्रयणीच्या प्रवाहात झोकून देताना, उड्या टाकताना

त्या माता-पित्यांच्या मनाला किती यातना झाल्या असतील या कल्पनेनेही मनाचा थरकाप होतो.

म्हणूनच स्वधर्माचरण करण्यासाठी प्राणापेक्षाही प्रिय असलेल्या आणि ती निष्कलंक आहे याची खात्री असूनही स्वत:च्या पत्नीचा व त्याबरोबरच स्वसुखाचा त्याग करणाऱ्या प्रभु रामचंद्राचा आदर्श आपल्याला जितका मोलाचा वाटतो तितकाच परधर्म स्वीकारल्यामुळे झालेल्या भयावह परिणामांचा प्रभावही मनावर पडल्याशिवाय रहात नाही. एवढ्या मोठया सत्वशील माणसाच्या हातून कर्तव्य पालनात झालेल्या प्रमादामुळे जर इतकी भयावह परिस्थिती होऊ शकते आणि तो प्रमादही कर्तव्य करण्याचा आळस म्हणून किंवा मौजमजा करण्यासाठी घडलेला नाही तरीही हे पाहिल्यावर 'स्वधर्म' म्हणजे स्वत:चे कर्तव्य कितीही अवघड वाटले तरी केलेच पाहिजे आणि दुसऱ्याचा धर्म म्हणजे कर्तव्य कितीही सोपे आणि विलोभनीय वाटले, मनाला भावले, त्यावेळेपुरता मनाला दिलासा मिळाल्यासारखा वाटला तरीही आचरता कामा नये, हे सुस्त होऊन पडलेल्या आपल्यासारख्या तथाकथित सुशिक्षितांना गदागदा हालवून जागे करण्यास पुरेसे उपकारक अशाच या दोन्ही घटना आहेत.

एकंदर 'चिंतनाचा' गंभीर होत चाललेला रंग काहीसा बदलण्यासाठी एक गोष्ट सांगते व माझ्या चिंतनाचा समारोप करते. अर्थातच गोष्ट असली तरी ती केवळ मनोरंजन करणारी नाही तर मनोरंजनाच्या माध्यमामतून चिंतनाचाच विषय मनावर ठसविणारी व बोध घ्यावा अशीच आहे.

कथा आहे एका बहुरूप्याची. हा बहुरूपी स्वत:च्या कलेत अतिशय निष्णात. आपले अभिनय कौशल्य राजासमोर सादर करण्यासाठी म्हणून राजदरबारात हजर झाला होता. राजाही कलेचा मोठा भोक्ता असल्याने राजाने त्याचे यथोचित स्वागत केले. राजधानीतील एका उत्सवप्रसंगी त्याला त्याचे कौशल्य दाखविण्यास सांगितले गेले. त्या उत्सवासाठी राजाने सर्व प्रजाजन आणि दरबारी मंडळीनाही निमंत्रित केले. उत्सवाच्या दिवशी सर्व प्रजाजन, दरबारी मंडळी, स्वत:राजा-राणी आपआपल्या आसनावर स्थानापन्न झाले. सनईचे मंजूळ स्वर घुमले. राजाने बहुरूप्याला आपले

कौशल्य प्रगट करण्यासाठी आज्ञा दिली. आणि बहुरूप्याने आपल्या प्रयोगाला प्रारंभ केला. पाच दिवस तो वेगवेगळे एकपात्री प्रयोग करणार होता. त्यापैकी एक दिवस त्याने 'जगद्गुरु' शंकराचार्यांची भूमिका सादर केली. कलाकार निष्णात असल्याने भूमिका सुंदरच वठविली. सर्वजण खूष झाले. राजाही खूष झाला. प्रथेप्रमाणे राजाने चांदीच्या तबकात त्याची यथोचित बिदागी सादर केली पण बहुरूपी बिदागी घेईना. राजाने खूप विनवणी केली पण बहुरूप्याने बिदागी काही घेतली नाही. प्रार्थना म्हटली आणि राजाची रजा घेतली.

दुसऱ्या दिवशी त्यांने नर्तकीच्या वेषात, सर्व साजशृंगार लेवून , नटूनसजून सुंदरसे नृत्य सादर केले. नृत्य अप्रतिम झाले. राजा-राणी, सर्व प्रजाजन एकदमच खूष झाले. राजाने आज तर सोन्याच्या तबकात हिऱ्यामोत्याचे अलंकार घालून 'बिदागी' देऊ केली. पण बहुरूपी असंतुष्टच. बिदागी अत्यल्प आहे असा त्याचा सूर होता.तसे पाहता गेले चार दिवस त्याने प्रयोग सादर केले होते. पण असा हावरटपणा त्याने कधीच दाखविला नव्हता. काल तर त्याने बिदागी नाकारलीच होती. त्यामुळे राजाला काही उमजेना. बहुरूप्याच्या वागण्याचे रहस्य काही राजाच्या ध्यानी येईना. राजाने त्याचे स्पष्टीकरण बहुरूप्यालाच विचारले.राजा बहुरूप्याला म्हणाला 'काल मोठ्या कौतुकाने बिदागी देऊ केली पण आपण ती नाकारलीत. बिदागी न घेता अतिशय सन्मानाने एक स्मित करुन प्रार्थनेने कार्यक्रमाची समाप्ती केलीत. आणि आजची बिदागी कालच्या मानाने कितीतरी अधिक आहे तरीही तुमचे समाधान झाल्याचे दिसत नाही. तुम्ही असा लोभीपणा कधीच दाखवला नाहीत. या दोन विसंगत वागण्याचे रहस्य माझ्या तरी ध्यानी आलेले नाही.' बहुरूपी विनयाने म्हणाला 'महाराज, स्वाभाविकच आहे माझे वागणे विसंगत नाही. मी सादर केलेल्या भूमिकांना साजेसे मी वागलो. काल मी 'शंकराचार्यांची' भूमिका केली. शंकराचार्य जसे वागले असते तसा वागलो त्यांना धनाचा लोभ वाटणे शक्य नाही तो त्यांना शोभा देणारही नाही. ते ज्ञानी तत्वचिंतक, समाज हितचिंतक सदा तृप्त असे होते. समाजाचे सत्व राखणे आणि समाजाला उन्नतीचा मार्ग दाखवणे हेच त्यांचे जीवनसर्वस्व मग त्या भूमिकेत बिदागी स्वीकारणे मला शोभा देणार नाही. मी कलाकार

आहे. मी माझ्या भूमिकेशी प्रतारणा करणार नाही. म्हणून मी समाधानाचे स्मित करुन सर्वांच्या कल्याणासाठी प्रार्थना म्हटली. आज माझी भूमिका नर्तकीची आहे. नर्तकीला धन हेच सर्वस्व कितीही मिळाले तरी असमाधानीच. तृप्ती तिला माहीतच नसते. म्हणून मी तिच्या स्वभावाप्रमाणे वागलो. काय चुकले माझे? राजाला बहुरूप्याच्या वागण्याचेच नव्हे तर जणू जीवनाचेच इंगित समजले आणि बहुरूप्याचे मनापासून कौतुक वाटले त्यांने त्याला प्रेमाने अंलिगन दिले आणि पाठ थोपटून पावती दिली व राजधर्म सांभाळला. आपण राजे आहोत तेव्हा राजाप्रमाणे वागून 'राजधर्म' सांभाळला पाहिजे हा समर्पक भाव व स्वतःच्या कर्तव्याची जाणीव बहुरूप्याने राजाच्या मनात जागविली होती.

राजाप्रमाणेच आपल्याला सर्वांनाही योग्य संदेश देणारी अशीच ही कथा आहे.

पण जीवनातील आपल्या भूमिका बहुरूप्याप्रमाणे केवळ थोड्या वेळासाठी अभिनय म्हणून करावयाच्या नाहीत तर खरोखरीच्या आणि जीवनाच्या अंतापर्यंत कायम स्वरुपी करावयाच्या आहेत म्हणून हे काम अवघड आहे हे खरे. तरीपण स्वधर्म आचरणे हे आपल्या स्वतःच्या व समाजाच्याही दृष्टीने हितावह आहे मग ते काम कितीही कठीण असले तरीही. याउलट जीवन रंगमंचारील दुसऱ्याची भूमिका म्हणजेच दुसऱ्याचे कर्तव्य म्हणजेच 'परधर्म' कितीही सोपा, लोकात वाहवा मिळवून देणारा असला तरीही तो स्वीकारणे भयावह होय. थोडक्यात श्रीकृष्णाने अर्जुनाला निमित्त करुन आपल्या सारख्या सामान्य माणसांसाठी 'स्वधर्म निधनं श्रेयः परधर्मो भयावह' हा संदेश दिला आहे असे सतत जाणवते.

हे विवेचन केल्यानंतरही सद्यस्थितीत मनाला एक प्रश्न सतत पडतो की आपल्या मूळस्वभावानुसार वा आवडीनुसार काम आपल्याला मिळेलच असे खात्रीने सांगता येत नाही. उदा. मला समाजसेवेची मनापासून आवड आहे, गरिबीत समाधानाने राहण्याची, खेड्यात जाण्याची तयारी आहे. ईश्वरकृपेने बऱ्यापैकी बुध्दीही आहे, ऐपतही आहे, प्रयत्नही भरपूर केले आहेत तरी मी डॉक्टर होऊ शकेन असे नाही. परीक्षेत मिळणाऱ्या गुणांच्या स्पर्धेमुळे एखाददुसऱ्या गुणानेसुध्दा माझी संधी हुकू शकते आणि प्रवेशच

मिळाला नाही की पुढचे स्वप्न भंगलेच ना! मग जीवनाचा चरितार्थ चालविण्यासाठी दुसरा काहीतरी पर्यायी व्यवसाय स्वीकारण्याशिवाय गत्यंतरच नाही. अशा वेळी मी माझा 'स्वधर्म' कसा निभवावा. कारण मुळातच मला 'परधर्म' स्वीकारणे भाग झाले आहे.

तरीपण 'भारतीय संस्कृतीच्या' चिंतनातच 'परिवर्तन' मान्य केलेले आहे. तेव्हा बदलत्या परिस्थितीनुसार परिवर्तनाची कास धरलीच पाहिजे अन्यथा वरील सर्व तत्वज्ञानच कुचकामी होईल आणि शास्वत सत्य वा तत्व कधीही निरर्थक होऊ शकत नाही.कारण ते वाहत्या पाण्याप्रमाणे प्रवाही असले पाहिजे. फक्त पथ्य एवढेच की त्याचा 'गाभा' कायम राहिला पाहिजे. पाण्याचा तहान भागविण्याचा तो 'स्वधर्म' तो कायम टिकण्यासाठी ते वहाते असावे लागते. तसे न राहता ते जर साठून राहिले तर त्याचे डबके तयार होईल आणि मग मात्र त्या पाण्याचा काहीच उपयोग नाही उलटपक्षी उपसर्गच होईल. म्हणून मध्ये येणाऱ्या अडचणीला वळसा घालून पाणी जसे पुढे जाते, पुढे वहात राहते तसे आपल्यालाही आडमुठेपणा न करता नव्या परिस्थितीतून मार्ग काढता आला पाहिजे.

म्हणून 'स्वधर्म' या शब्दाचा नवा संदर्भ शोधला पाहिजे म्हणून 'स्वधर्म' म्हणजे 'आपल्या आवडीनुसार कर्म असे न म्हणता 'वाट्याला आलेले कर्तव्य' म्हणजेच 'समाजधर्म' म्हणजेच 'स्वधर्म' हा नवा संदर्भ स्वीकारला पाहिजे. 'समाज धर्म' म्हणजे आपल्या आचरणामुळे समाजाचे कोणतेही नुकसान होता कामा नये. आणि स्वतःचा जीवनक्रम तर चाललाच पाहिजे. म्हणून वाहत्या पाण्याप्रमाणे आपली विचारधारा बदलून पुढे जावे लागते. मध्ये येणाऱ्या अडचणींना वळसा घालून बाजूबाजूने पुढे सरकावे लागते.

मला माझ्या आवडीप्रमाणे, स्वभावाप्रमाणे व्यवसाय करणे शक्य झाले नाही म्हणून माझा चरितार्थ चालविण्यासाठी मी दुसरा पर्यायी व्यवसाय निवडला किंवा पुढे आला, उपलब्ध झाला तो स्वीकारला आहे तेव्हा त्या व्यवसायाशी एकनिष्ठ राहणे हाच आता 'स्वधर्म' त्या व्यवसायाशी प्रामाणिक राहण्यासाठी आवश्यक ती तडजोड मला स्वीकारली पाहिजे. मग त्यासाठी खूप कष्ट करावे लागतील, मन मारावे लागेल, मनाचा विरसही होईल

तरीही त्याकडे पाहाण्याची स्वत:ची दृष्टी बदलावी लागेल तरच मी माझ्या व्यवसायाला न्याय देऊ शकेन आणि मी माझ्या व्यवसायाला न्याय दिला, व्यवसाय प्रामाणिकपणे केला तरच समाजावर अन्याय होणार नाही. प्रथम हे अतिशय जिकीरीचे, त्रासाचे वाटेल पण ते केलेच पाहिजे. समाजाच्या कल्याणाचा विचार सतत समोर ठेवून त्यासाठी प्रयत्नांची शिकस्त करून आचरण करीत रहाणे हाच माझा 'स्वधर्म' होऊ शकेल. माझा स्वधर्म सांभाळतांना करावे लागणारे अपरिमीत कष्ट,मनाची सतत होणारी घालमेल आणि हे सर्व आपल्या मनाविरुध्द आहे ही मनाला लागणारी टोचणी मरणप्राय वाटणे अगदी स्वाभाविक आहे. पण ते करणे हेच श्रेयस्कर होय.

आपल्याला हवा असणारा आवडता व्यवसाय मिळाला नाही म्हणून चिडून, रागावून, जणू तो समाजाचाच अपराध आहे अशी समजूत करून घेऊन व्यवसायाशी प्रतारणा करीत रहाणे हा 'परधर्म' होय. आपली व्यवसायाशी प्रतारणा म्हणजे अप्रत्यक्षपणे समाजावर समजून उमजून केलेला 'अन्याय'. असा अन्याय म्हणजे समाजाचा एक प्रकारे आपण करीत असलेला अपराधच म्हणावा लागेल आणि ही गोष्ट समाजधर्माशी पूर्णतया विसंगत आहे. समाजाशी द्रोह नक्कीच भयावह आहे.

एक उदाहरण घेऊन समजून घेऊ. माझे औषधाचे दुकान आहे. तेव्हा योग्य औषध विकणे हा माझा 'धर्म'. भेसळ असलेली किंवा तारीख उलटून गेलेली औषधे मी विकता कामा नाही. अशा गैर व्यवहारात माझा आर्थिक लाभ होईल हे निश्चित. पण अशी भेसळ वाढत जाणार आणि शुध्द आणि योग्य औषध कोणते व भेसळयुक्त कोणते हे समजणारच नाही. स्वत:च्या मुलासाठी घेतलेले औषधही असे भेसळीचे असू शकेल. आणि त्याचा परिणाम जर मूल गमवावे लागले. तर मग या व्यवहाराचा जीवघेणा प्रकार जाणवेल. आणि याला कारण मी माझ्या व्यवसायाशी केलेली प्रतारणा. मी जर ती करु शकतो तर दुसरा का नाही, तिसरा का नाही असे लोण पसरत जाणार आणि या मनोवृत्तीचा फटका केंव्हा ना केंव्हा स्वत:लाही बसणारच अशा वेळी त्याची भयानकता जाणवेल. दुसऱ्यावर पाळी आहे तोपर्यंत ती ध्यानी येणार नाही. कारण परदु:ख शीतल असते म्हणतात. हे एक उदाहरण

दिले. असेच दुध, धान्य, पेपर काढणे, तपासणे, बेकायदा घरांना परवानगी देणे, एक ना दोन प्रत्येक व्यवसायातच असा जीवघेणा व्यवहार होऊ शकतो.म्हणूनच 'समाजधर्म' सुध्दा निष्ठेने आचरावा लागेल. मग त्यासाठी किती कष्ट पडले. आर्थिक नुकसान सहन करावे लागले, मन खंतावत राहिले तरीही. म्हणूनच समाजाची धारणा व्हावी व स्वत:चेही कल्याण व्हावे म्हणून 'स्वधर्म' आचरणाचे सामर्थ्य व परधर्माचे रूप वरवर पाहता जरी मोहक व सोपे वाटत असले तरी त्याचा मोह मनाला पडू नये अशी बुध्दी श्रीकृष्णाने आम्हा सामान्यांना द्यावी एवढीच इच्छा. असो.

ज्ञानेश्वरांचे पसायदान (भावार्थ)

हल्ली साधारणपणे सांस्कृतिक कार्यक्रम संपला की 'ज्ञानेश्वरांचे पसायदान' गाऊन सांगता केली जाते. ही एक चांगली प्रथा रुढ होत आहे असे वाटते. पण हेच पसायदान भावार्थ समजून घेऊन म्हटले तर अधिक हृद्य होईल असे मनात येते.

असे भावार्थ समजून म्हटले गेले तरच त्यातील प्रत्येक शब्द म्हणजे 'गागरमें सागर' भरलेला कसा आहे. तसेच त्यातील विचार विश्वमोलाचा आहे हे ध्यानी येईल. या पसायदानाला हिमालयाची उंची आहे, तर महासागराची खोली आहे. हेही लक्षात येईल. म्हणूनच आज माझ्या कुवतीप्रमाणे पसायदानाचा भावार्थ सांगण्याचा माझा विचार आहे. त्यासाठीच हा लेखन प्रपंच.

प्रत्येक संताने आपला ग्रंथ वा लिखाण पूर्ण झाल्यानंतर परमेश्वराजवळ कृपाप्रसाद मागितला आहे. तसाच ज्ञानियांचा राजा असलेल्या ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी किंवा भावार्थ दीपिका' हा ग्रंथ पूर्ण झाल्यावर आपल्या परमेश्वराजवळ म्हणजेच आपल्या गुरुंजवळ निवृत्तीनाथांजवळ कृपाप्रसाद माण्यासाठी केलेली प्रार्थना म्हणजेच 'ज्ञानेश्वरांचे पसायदान'. ही प्रार्थना म्हणजे जणू ज्ञानेश्वरांनी अवघ्या विश्वासाठी गायिलेले 'भावगीत' आहे.

ज्ञानेश्वरांच्या धाकल्या बहिणीने - मुक्ताबाईने ज्ञानेश्वरांबद्दलची स्वत:ची भावना फक्त दोन शब्दात व्यक्त केली आहे. ते प्रभावशाली दोन शब्द आहेत 'मोठा वैष्णव'.

हा मोठा वैष्णव आपल्या पसायदानात जगाच्या कल्याणाशिवाय दुसरे मागणार तरी काय? म्हणून या पसायदानात 'सोनेमें सुगंध' या हिंदी म्हणीप्रमाणे 'श्रेयसाची झळाळी' आणि त्यातच 'विश्वगीताचा सुगंध' आला आहे.

ज्ञानेश्वरांनी आपली मागणी 'विश्वात्मक देवा' जवळ केली आहे. नाथसंप्रदायाच्या तत्त्वज्ञानात त्या परमतत्वाची दोन रुपे मानली जातात (१) विश्वोत्तीर्ण (२) विश्वात्मक.

'विश्व व्यापून अठांगुळे उरणारे' असे रूप म्हणजे 'विश्वोत्तीर्ण' रूप होय. तर या विश्वातच सामावलेले जे रूप ते 'विश्वात्मक' रूप.

ज्ञानेश्वरांना 'निवृत्तीनाथ' म्हणजे सर्वस्व. त्यांची त्यांच्या ठिकाणी अनन्य भक्ती आहे. 'श्रीगुरूसारिखा असतां पाठिराखा। इतरांचा लेखा कोण करी'

अशी जाज्वल्य भावना निवृत्तीनाथांबद्दल असणाऱ्या ज्ञानदेवांना त्यांच्यामध्ये 'विश्वात्मकदेवा'ची अनुभूती आली असल्यास नवल ते काय? म्हणून त्यांच्या दृष्टीने देवाच्या ठायी असलेल्या, आपले सद्‌गुरु असलेल्या निवृत्तीनाथांजवळ ज्ञानेश्वर 'पसायदान-कृपाप्रसाद' मागत आहेत.

ज्ञानेश्वरांनी निवृत्तीनाथांच्या आज्ञेवरूनच 'भगवद्‌गीता' या संस्कृतमध्ये असलेल्या ग्रंथाचा अर्थ सर्वसामान्य माणसाला कळावा म्हणून मराठीत सांगितलेला आहे. तो मराठीतील भावार्थ म्हणजेच 'ज्ञानेश्वरी' किंवा 'भावार्थ दीपिका' एकेका श्लोकांचा मराठीत अर्थ स्पष्ट करताना तो सहज समजावा म्हणून स्वत:ची उदाहरणे देऊन स्वत: भाष्य केले आहे आणि हे सर्व लिहून घेण्याची मोलाची कामगिरी केली आहे 'सच्चिदानंद बाबांनी'.

असा हा ग्रंथ पूर्ण झाल्यानंतर मागितलेला कृपाप्रसाद म्हणजेच 'पसायदान'.

'यज्ञ' ही संकल्पना वेदकाळापासून चालत आलेली आहे. यज्ञात मंत्र म्हणून-गाऊन प्रज्वलित केला जाणारा 'अग्नी' ही देवता म्हणजे देव आणि मानव यांच्यातील पवित्र असा एक 'दुवा' मानवाने समर्पित केलेल्या 'समिधा' देवांपर्यंत पोहचविणारा 'वाहक' (जणू पोस्टमन) असा हा 'अग्निदेव' मानला जातो. यज्ञात प्रकट होणाऱ्या 'अग्नी'ला 'यज्ञपुरूष' अशी संज्ञा आहे. यज्ञात आहुती दिली जाते तिला 'समिधा' असे म्हणतात. ती असते तीळ, तांदूळ, तूप आणि काही विशिष्ट झाडांच्या काटक्या.

यज्ञाची कल्पना 'दाना'वर आधारित आहे. पुरूषार्थ करून जे जे काही मिळविले ते यज्ञ करून दान द्यावयाचे व पुनश्च नवीन मिळविण्यासाठी, पुरुषार्थ करण्यासाठी संधी तयार करावयाची. हा आहे हेतू. जो सक्षम आहे त्याने सर्व शक्ती पणाला लावून संपत्ती मिळवायची आणि यज्ञाच्या निमित्ताने ती समाजातील दीनदुबळ्यांना, समाजाचे मानसिक संतुलन राखण्यासाठी अध्यापन व अध्यापन करणाऱ्या ब्रह्मवृदांना, विद्याभ्यास करणाऱ्या आश्रमवासियांना, समाजाच्या उन्नतीसाठी, सुखासाठी संशोधन करणाऱ्या ऋषीमुनींना म्हणजेच संशोधकांना देऊ करावयाची अशी उदात्त भावना आहे या मागे, हे यज्ञ साधारणपणे राजेलोकच करीत.

पण राजानेच नव्हे तर सामान्य माणसाने सुध्दा - ज्याच्याजवळ मिळविण्याची ताकद आहे त्याने पूर्ण ताकदीनिशी मिळवावे पण त्या संपत्तीचा-अधिकाराचा अहंकार होऊ नये म्हणून-ही संपत्ती माझी फक्त माझी एकट्याची नाही तर त्यात समाजाचाही वाटा आहे असे लक्षात घेऊन 'दाना'च्या रुपाने समाजाला परत द्यावयाचे व गरजू लोकांची गरज भागवायची. थोडक्यात समाजातील अपंग माणसाला सुध्दा पोटाची काळजी पडू नये ही आहे भावना. कार्यशक्ती गंजू तर द्यावयाची नाही आणि अहंकारालाही वाव द्यावयाचा नाही.

अग्नीचे वैशिष्ट्य असे की जे जे म्हणून हिणकस असेल ते सर्व त्यात जळून जाते आणि पवित्र, शुध्द असेल ते जास्त झळाळून निघते म्हणून यज्ञात अग्निदेवतेला आवाहन करतात की आहुती देणाऱ्या यजमानाच्या तसेच पुरोहिताच्या ठायी असलेल्या कामक्रोधादि षड्रिपू जळून जावे व समाजासहित सर्वांचे कल्याण व्हावे. ही शुध्दातिशुध्द भावना तेवढी झळाळून यावी.

तसेच आजूबाजूच्या परिसरातील हवाही शुध्द व्हावी. पर्यावरण शुध्द व्हावे. सहाजिकच रोगराईला प्रतिबंध होतो.

वेदकाळातील यज्ञ हे नैमत्तिक कर्म होते. पण ज्ञानेश्वरांनी गीतेच्या तिसऱ्या अध्यायातील आठ व नऊ या दोन श्लोकांवर भाष्य करताना नित्य यज्ञाची कल्पना मांडली आहे. जणू वेदकाळातील यज्ञाचे हे 'परिणत' रुपच आहे.

ज्ञानेश्वर म्हणतात - 'स्वधर्मु जो बापा। तोचि नित्ययज्ञ जाण पां। म्हणोनि वर्तता तेथ पापा। संचारु नाही।।८१।। म्हणोनि जें जे उचित। आणि अवसरें करोनि प्राप्त। ते कर्म हेतुरहित। आचर तू।।७८।। स्वधर्मानुष्ठान। ते अखंड यज्ञयाजन। जो करी तया बंधन। काहींच नाही।।८३।। अध्याय ३रा

अर्थ असा - आपला जो धर्म म्हणजेच आपल्यासाठी विहित असे जे कर्तव्य (मग ते कोणतेही असे) करीत रहाणे हाच नित्य यज्ञ म्हणूनच त्याचे आचरण करीत असताना कोणतेच पाप लागत नाही. फक्त तेथे 'कर्तृत्वाचा मदु' म्हणजे 'मी माझे कर्तव्य करीत आहे' असा अहंकार नसावा तसेच 'कर्मफलाचा आस्वादु' म्हणजे 'मी केलेल्या कर्माचे फळ मलाच मिळाले पाहिजे' अशी इच्छाही नसावी.

असा हा सहजपणे मोक्ष प्राप्त करुन देणारा 'नित्ययज्ञ' करण्याचा अधिकार अगदी सामान्यातील सामान्य माणसालाही प्राप्त करुन दिला तो ज्ञानेश्वरांनीच.

''जे जे आपणांसी ठावे। ते इतरांसी सिकवावे। शहाणे करुन सोडावे। सकळजन'' या समर्थांच्या उक्तीप्रमाणे स्वत:जवळ असलेले, गुरुकृपेने प्राप्त झालेले ज्ञान सामान्यांना देऊन सर्वांना शहाणे करण्याचा प्रयत्न म्हणजेच ज्ञानेश्वरांचा 'स्वधर्म' तो त्यांनी आचरला आहे. पसायदान मागण्यापूर्वीच्या ओवीत ते म्हणतात 'किंबहुना तुमचें केलें। धर्मसंकीर्तन हे सिध्दी गेलें। येथे माझे जी उरले। पाईकपण।।१७९२।। अध्याय १८वा. त्यांनी स्वत:कडे सेवकाची भूमिका घेतली आहे अशा विनयशील शिष्याजवळ 'कर्तृत्वाचा मदु' संभवतच नाही. तसेच निवृत्तीनाथांच्या कृपेमुळे ते 'पूर्णकाम' आहेत म्हणजे त्यांच्या सर्व इच्छा तृप्त आहेत तेव्हा 'कर्मफलाचा आस्वादु' असण्याचा प्रश्नच नाही. म्हणूनच त्यांनी केलेले धर्मसंकीर्तन हाच त्यांचा 'नित्ययज्ञ' आहे. या यज्ञाचे साधन आहे 'वाणी' म्हणून हा आहे ''वाक्‌यज्ञ - वाग्‌यज्ञ''

हा 'वाग्‌यज्ञ' सिध्दीस गेला आहे. ग्रंथ पूर्ण झाला आहे म्हणूनच माझ्या 'विश्वात्मकदेवा'ने म्हणजेच सद्‌गुरु निवृत्तीनाथांनी संतुष्ट होऊन पसायदान म्हणजे कृपाप्रसाद द्यावा अशी आहे ज्ञानेश्वरांची प्रार्थना.

आता आपण पसायदानातील एकेका ओवीचा भावार्थ जाणून घेऊया. ''आता विश्वात्मकें देवें। येणे वाग्‌यज्ञें तोषावे। तोषोनि मज द्यावे। पसायदान हे।।१७९३।।'' पसायदानातील पहिली पण ज्ञानेश्वरीच्या अठराव्या अध्यायातील सतराशे त्र्याणवी ओवी.

ओवीतील पहिलाच शब्द आहे 'आता' या शब्दाला सुध्दा एक विशिष्ट अर्थ आहे. हा शब्द उभयान्वयी अव्ययाप्रमाणे उपयोगात आणलेला आहे. हा शब्द येण्यापूर्वी काही तरी कृती झालेली आहे आणि नंतरही काही तरी म्हणावयाचे आहे ही आहे भावना. हा शब्द येण्यापूर्वी काय कार्य झाले आहे 'तर' सामान्य माणसाला समजावा म्हणून संस्कृतमध्ये असलेल्या 'भगवद्‌गीतेचा' अर्थ मराठीत सांगण्यासाठी निवृत्तीनाथांच्या

आज्ञेवरुन भाष्य करण्याचे अवघड पण मोलाचे कार्य ज्ञानेश्वरांनी अगदी व्यवस्थित पूर्ण केले आहे. हा ज्ञानेश्वरांच्या मनातील भाव हा आहे पूर्वार्ध तर मी माझ्या गुरुंजवळ पसायदान म्हणजे कृपाप्रसाद मागणार आहे ही ज्ञानेश्वरांची मनोकामना हा आहे उत्तरार्ध. या दोन उदात्त भावनांना सांधणारा असा हा अर्थगंभीर दुवा म्हणजे 'आता' हा शब्द.

आपल्या सद्‌गुरुंनी संतुष्ट व्हावे इतक्या 'अमृताते पैजा जिंकणाऱ्या मधूर सुरस शब्दामध्ये भावार्थ स्पष्ट झाला आहे. याबद्दल ज्ञानेश्वरीच्या मनात आत्मविश्वास आहे म्हणूनच जणू एखाद्या कर्तृत्ववान्, वडिलांच्या लाडक्या पुत्राने, पित्याने सांगितलेले कार्य पूर्णतया यशस्वी केल्यानंतर कौतुकाने पित्याजवळ बक्षीस मागावे असा भाव आला आहे या पसायदानातील शब्दामध्ये, तरीही ज्ञानेश्वरांनी मला कृपाप्रसाद द्याच आग्रह धरलेला नाही तर (माझ्या) या वाग्यज्ञाने माझा 'विश्वात्मकदेव' म्हणजे निवृत्तीनाथ जर संतुष्ट झाले असतील तर आणि तरच मला मी मागणार आहे ते पसायदान (बक्षीस) द्यावे इतकी घनगंभीर भावना आहे त्यात. केवढी ही नम्रता.

पसायदान 'हे' हे म्हणजे मी पुढे जे मागणार आहे ते - त्या स्वरुपाचे. इतका व्यापक अर्थ आहे 'हे' या एकाक्षराला.

अशी आपली भावना व्यक्त करून बहुधा ज्ञानेश्वरांनी निवृत्तीनाथांकडे पाहिले असावे. त्यांची भावना समजून बहुधा निवृत्तीनाथांनी आपली मूक संमती दिल्यावर ज्ञानेश्वरांनी त्यांना कोणते पसायदान हवे आहे त्याचे समग्र-सविस्तर वर्णन पुढील ओव्यातून केले आहे.

या ओवीपासून पसायदानाला खरी सुरवात होते आहे. ती ओवी अशी ''जे खळांची व्यंकटी सांडो। तया सत्कर्मीं रती वाढो। भूतां परस्परें पडो। मैत्र जीवाचें।।१७९४। अध्याय १८

त्यांना तीन गोष्टी हव्या आहेत (१) खळाची व्यंकटी सांडो। (२) जया सत्कर्मी रती वाढो। (३) भूतां परस्परे जीवाचे मैत्र पडो।

(१) खळाची व्यंकटी सांडो - खळ म्हणजे दुष्ट. 'खल' या संस्कृत शब्दाचे मराठीरुप. व्यंकटी म्हणजे कुटीलपणा. माणसाच्या मनातील दुष्ट-वाईट आचरण करण्याची बुध्दी किंवा प्रेरणा. सांडो म्हणजे नाहिशी होवो-जावो.

अर्थ असा की माणसाच्या (दुष्टाच्या) मनातील वाईट वागण्याची, दुसऱ्याला त्रास देण्याची इच्छाच नष्ट होऊ दे. (दुष्ट) माणसाने केवळ वाईट कर्म करु नये असे म्हटले नाही तर ते करण्याची त्याची प्रवृत्तीच मनातून नाहिशी होऊ दे. परिणामत: त्याच्या हातून कधी वाईट कर्म होणारच नाही. मनात इच्छा उत्पन्न होते आणि मग ते वाईट कर्म करण्यास तो प्रवृत्त होतो. पण इच्छाच उत्पन्न झाली नाही म्हणजे तो वाईट कर्म करणारच नाही.

अशा प्रकारे एक दुर्गुण नाहीसा झाला. ती जागा रिकामी राहू नये म्हणून तात्काळ त्या जागेवर 'सद्‌गुणा'ची स्थापना म्हणून -

(२) तया सत्कर्मी रती वाढो. तया म्हणजे ज्याची वाईट कर्म करण्याची इच्छा नष्ट झाली आहे त्याच्या ठिकाणी. सत् - चांगले कर्म - पुण्यकार्य कर्मी - म्हणजे कार्याच्या ठिकाणी म्हणजे त्याच्या मनात. रती - म्हणजे आवड. उत्पन्न होऊ दे असे न म्हणता 'वाढो' असा समर्पक शब्द आला आहे. फक्त एकदाच उत्पन्न होऊ नये तर ती भावना सतत वाढू दे. चांगल्या गोष्टींची सतत वाढ व्हावी अशीच असते अपेक्षा. म्हणूनच दान देताना किंवा देणगी देताना आपण दक्षिणा दहा रुपये दान देत नाही तर १० + १ = ११ रु. दक्षिणा देतो. देणगी देतानाही शंभर असोत नाहीतर लाख. ते १०१ करतो एक लाख एक देतो. हेतू असतो की देणाराची देण्याची इच्छा व त्यासाठी आवश्यक असलेली आर्थिक क्षमता वाढावी आणि देणगी घेणारांनाही भरपूर देणग्या मिळाव्या व हाती घेतलेले चांगले कार्य पूर्णत्वास जावे. त्या 'एका'ला इतकी मौलिक किंमत आहे. म्हणून ज्ञानेश्वर म्हणत आहेत की चांगले कार्य करण्याची इच्छाशक्ती - आवड वाढत राहावी. ज्यायोगे चांगले कार्य होत राहील.

(३) भूतां परस्परे जीवाचे मैत्र पडो - भूत म्हणजे प्राणीमात्र. भू - १ ग.प. असणे भूत - 'भू' धातूचे कर्मणी भूतकालवाचक विशेषण. अर्थ अस्तित्व असलेला म्हणजे प्राणीमात्र. (पण गंमत पहा व्यवहारी जीवनात मात्र आपण 'भूत' म्हणजे 'पिशाच्च' मेलेल्या माणसाचे कल्पनेतील अस्तित्व. अगदी उलट अर्थ (अस्तित्वात नसलेले) परस्परें-आपआपसात-एकमेकात. जीवाचे-जीवाभावाचे-मायेचे, प्रेमाचे मैत्र-संबंध-मैत्री पडो-निर्माण होऊ दे. प्राणीमात्रांचे-माणसांचे एकमेकांशी मायेचे, प्रेमाचे संबंध तयार होऊ देत.

या तीन गोष्टी एकमेकाशी कार्यकारण भावाने जोडलेल्या आहेत. मनातील दुष्ट भावना नाहीशी झाली तर चांगल्या कार्याची - पुण्यकर्माची आवड उत्पन्न होणार. तशी आवड उत्पन्न झाली तर आपआपसात मैत्री जागणार आणि मैत्रीची गोडी अनुभवता येईल. अशी आहे सोनसाखळी. एकही विधान मागेपुढे करता येणार नाही.

ज्ञानेश्वर हे 'कारकपुरुष' आहेत. 'कारकपुरुष' म्हणजे सात्विक तप करणारे. जे तप कोणत्याही सांसारिक लाभासाठी नाही. वाईट हेतू मनात धरून तर नाहीच नाही. 'कारसेवा' हा शब्द आपल्या थोडासा परिचयाचा आहे. अशी सेवा की ज्यात स्वत:च्या लाभाचा कोणताही विचार नसतो तर केवळ आवड म्हणून आणि समाजाच्या कल्याणासाठी. तसेच समाजाच्या कल्याणासाठी तप करणारे म्हणजे कार्य करणारे, धडपड करणारे ते 'कारक पुरुष'. अशा लोकांच्या मनात 'तमोगुणा'ला स्थानच नाही. म्हणूनच त्यांनी खल पुरुषांचा, दुष्ट माणसांचा नाश होवो असे म्हटलेले नाही तर त्यांच्या ठिकाणी असलेल्या खलप्रवृत्तीचा नाश होऊ दे अशी आहे प्रार्थना "Not the sinner but the sin" असे आहे त्याचे मागणे.

खलपुरुष का निर्माण होतात तर त्यांच्यावर योग्य वयात म्हणजे बालवयात चांगले संस्कार होत नाहीत. बालपणात घरातील वडिलधाऱ्यांनी चांगले संस्कार केले नाहीत तर निसर्गत: वयाबरोबर माणूस शरीराने वाढतो पण त्याची मानसिक वाढ योग्य प्रकारे होत नाही. त्याच्या ठिकाणी असलेल्या दैवीगुणांचा विकास होत नाही. पण असुरी प्रवृत्ती मात्र वाढते. कारण वाईट गुणांचा स्वीकार आपातत: होतो. जसे वर चढताना दमछाक होते, खाली घसरताना कष्ट होत नाहीत. खाली पडताना तर कष्टच नाही. अगदी सोपे. पण होणारे नुकसान मात्र अधिक, एखादेवेळी जीवावरही बेतू शकते. लहानपणी चांगले संस्कार न झाल्याने 'स्वार्थ आणि परमार्थ' यामधील पायरी म्हणजे 'पुरुषार्थ' ती पायरीच गायब झालेली असते. त्यामुळे मन फक्त वाईटाचाच विचार करु शकते त्यातूनच खल प्रवृत्तीचा जन्म होतो.

म्हणूनच चांगले संस्कार झाले पाहिजेत आणि तीच मागणी ज्ञानेश्वरांनी पुढील ओवीत केली आहे. ती ओवी अशी ''दुरिताचे तिमिर जावो। विश्व

स्वधर्म सूर्ये पाहो। जो जे वांछील तो तें लाहो।प्राणिजात।। १७९५।। अध्याय ३ रा''.

ज्ञानेश्वरांचे या ओवीतील मागणे 'ऋता'वर आधारलेले आहे. म्हणून प्रथम 'ऋत' म्हणजे काय? ते समजून घेऊया. ज्यांच्यामुळे अवघ्या विश्वाची धारणा होते असे सृष्टीचे विश्वात्मक नियम. त्या नियमांच्या आधारे वर्तन झाले तर आणि तरच विश्वाचे कल्याण होते. उदा. पर्यावरण. पर्यावरणाचे काही नियम आहेत ते पाळले पाहिजेत अन्यथा 'पर्यावरण' दूषित होते. पर्यावरण दूषित झाले की विश्व म्हणजेच पर्यायाने आपण सर्व सजीव जगू शकणार नाही असे पर्यावरणाचे नियम पाळणे म्हणजेच 'ऋत जपणे'. आज माणसाने धनाच्या हव्यासापायी, चैनीसाठी, चंगळवादाचा स्वीकार करून जंगले उध्वस्त केली आहेत, इमारती बांधण्यासाठी शहरातील झाडेही विषाची इंजक्शने देऊन मारुन टाकली आहेत. त्याचा परिणाम म्हणून पाऊस वेळेवर पडत नाही, पडला तर पुरेसा पडत नाही, कधी नको इतका जास्त होतो, त्यात ढगफुटी, गारपिट अशी संकटे आहेतच. अरण्ये नष्ट झाल्याने वन्य पशूंची राहण्याची गैरसोय झाल्याने त्यांनी आपला मोर्चा मानव वस्तीवर वळविलेला आहे. कारखान्यांनी पाण्याचा हवा तसा वापर केल्याने, कारखान्यातील दूषित पाणी विचार न करता नदीनाल्यांमध्ये सोडल्याने, जलप्रदुषणाची समस्या उभी ठाकली आहे. निरनिराळ्या वाहनांचे कर्कश भोंगे, मोठा आवाज करणारी वाद्ये यामुळे ध्वनीप्रदूषण, मानवाच्या वागण्यातील सुटत चाललेल्या संयमामुळे 'एड्स' 'कॅन्सर' यासारखे 'जीवघेणे' रोग, भयानक गुन्हेगारी, खून, मारामाऱ्या, चोऱ्या, वासनाकांड यांचा सुळसुळाट झाल्याने सामान्य माणसाला जीवन जगणे कठीण झाले आहे. वेळीच सावध झालो नाही तर विनाश अटळ आहे.

'ऋत' हे विज्ञानावरच आधारलेले आहे. निसर्ग नियमांची एकमेकात गुंफलेली एक साखळी आहे. तिचा कोणताही एखादा दुवा खिळखिळा झाला तर साखळी तुटण्याची भीती आहे. म्हणूनच 'ऋता'चे म्हणजेच निसर्ग नियमांचे पालन करणे क्रमप्राप्त आहे. असे नियम जपणे हा आहे 'स्वधर्म'. मानवाचा स्वधर्म.

'ऋत' शब्दासाठी मराठी शब्द आहे 'रित' 'रित'च्या विरुध्द शब्द दु + रित = दुरित. म्हणजे वैश्विक नियमांच्या विरुध्द वागणूक. व्यवहारी भाषेत 'पाप'. अंधारात जसा योग्य मार्ग दिसत नाही तसा पाप करणाऱ्याला सन्मार्ग सापडत नाही. म्हणून ज्ञानेश्वरांनी 'दुरिताचे तिमीर' असा शब्दप्रयोग केला आहे. जावो म्हणजे नाहीसा होवो. म्हणजेच वैश्विक नियमांची पायमल्ली करण्याचा उद्योग करणाऱ्यांकडून तसे न होवो. अंधार नाहीसा होऊ लागतो म्हणजेच प्रकाश येऊ लागतो. 'पंचपंच उष:काल' होतो. सूर्याचा उदय होऊ लागतो. खरेतर या दोन्ही क्रिया एकसमयावच्छेदे करूनच होतात.

नंतरचा शब्द आहे 'विश्व स्वधर्म सूर्यें पाहो' विश्वस्वधर्मसूर्यें' यात तीन पदे आहेत (१) विश्व (२) स्वधर्म (३) सूर्यें. विश्व म्हणजे जग. वैश्विक नियमांचे पालन करणे हा स्वधर्म. ह्या स्वधर्माचे ज्ञान जाणीव हाच जणू सूर्य आणि या सूर्याने जग पहावे म्हणजे या जगात उगवावे. ते वाक्य असे होईल 'स्वधर्म-सूर्यें विश्व पाहो'. सूर्य या शब्दाची सूर्यें ही तृतीया आहे म्हणजे सूर्याने जग पहावे. म्हणजेच लोकांना वैश्विक नियमांचे पालन करण्याचे जे कर्तव्य - त्याचे ज्ञान होऊ दे. म्हणजे लोक वैश्विक नियम पाळू लागू देत.

अशा स्व-कर्तव्य करणाऱ्या लोकांच्या मनातील इच्छा पूर्ण होऊ दे. असे लोक वाईट इच्छा करणारच नाहीत. कल्याण व्हावे अशीच इच्छा करतील ना. मग ती पूर्ण व्हावी असे जे ज्ञानेश्वर म्हणत आहेत ते योग्यच नाही का? (लाहो-मिळो)

सर्व मानवांच्या मनात वैश्विक नियमांचे पालन करण्याचे जे कर्तव्य त्याची त्यांना चांगली जाणीव झाली की जग सुखी होणारच पण मानवप्राणी हा 'स्खलनशील' आहे. त्याच्या मनातील चांगल्या विचारांना केव्हाही ग्लानी येऊ शकते याची जाणीव ज्ञानेश्वरांना आहे. पण तसे होऊ नये म्हणून त्याचेही यथोचित व्यवस्थापन त्यांनी केले आहे. म्हणून पुढील ओवीत ते म्हणतात-
''वर्षत सकळ मंगळी। ईश्वर निष्ठांची मांदियाळी। अनवरत भूमंडळीं। भेटतु भूतां।।१७९६।।''

वर्षत - वर्षाव करणे. सकळ म्हणजे संपूर्ण. संपूर्ण म्हणजे काहीही हातचे राखून न ठेवता. सर्वच्या सर्व देणे. फार मोठा गर्भित अर्थ आहे या

शब्दाला. दाता कितीही श्रीमंत झाला, कितीही उदार असला तरी तो सगळेच्या सगळे कधीच दान करीत नाही. स्वत:साठी थोडेतरी राखून ठेवतोच. आणि ते योग्यही आहेच. त्याला त्याचे पुढचे जीवन जगण्यासाठी तरतूद हवीच असते ना. पण ईश्वर निष्ठांचे तसे नाही. तुकारामांनी म्हटल्याप्रमाणे 'आता उरलों उपकारा पुरता' अशी असते त्यांची धारणा. म्हणून ते काहीही राखून न ठेवता सर्वच्या सर्व देऊ शकतात. एवढा गहन अर्थ आहे 'सकळ' या शब्दाला. मंगळी - मंगळ म्हणजे मंगल - कल्याण अर्थ असा काहीही राखून न ठेवता सर्वस्वाने कल्याणाचा वर्षाव करणारे (असे ईश्वरनिष्ठ).

ईश्वरनिष्ठ कोण? तर 'सन्त'. या भौतिक जगातील विज्ञान, कला, शास्त्र यांची माहिती देणारे ते शिक्षक वा प्राध्यापक. असे भौतिक गुरु. पण आत्मज्ञान म्हणजे परब्रह्मासंबंधी ज्ञान देणारे, त्या परमात्म्याची प्रत्यक्ष अनुभूती प्राप्त करून देणारे ते सद्गुरु म्हणजेच 'सन्त' ईश्वरनिष्ठ. निष्ठा म्हणजे अढळ श्रध्दा. जी कधीही तसूभरही विचलीत होत नाही. आपलीही परमेश्वरावर श्रध्दा असते. पण एखादा दु:खाचा प्रसंग आला किंवा मनासारखे झाले नाही की त्या श्रध्देत चलबिचल होते. अशी श्रध्दा म्हणजे निष्ठा नव्हे. तो ईश्वर सुख देवो वा दु:ख पण ज्यांची त्याच्यावरील श्रध्दा विचलीत होत नाही ते 'ईश्वरनिष्ठ'.

त्यांची मांदियाळी म्हणजे माळ म्हणजे समुदाय. एखादा दुसरा नव्हे तर 'समूह'. खूप जण. भेटतु - भेटत राहू दे. भूतां - प्राणीमात्रांना. अनवरत - सतत, खंड न पडता. भूमंडळीं - या पृथ्वी तलावर. एकूण अर्थ असा - कल्याणाचा सर्वस्वाने वर्षाव करणाऱ्या अशा ईश्वर निष्ठांचा सन्तांचा समुदाय म्हणजे अनेकानेक सन्त या पृथ्वी तलावर प्राणीमात्रांना सतत भेटत राहू दे.

आपण सामान्य माणसे किती चंचल आहोत याची यथोचित जाणीव ज्ञानेश्वरांना असल्याने आपल्यासारख्या चंचल मनाच्या माणसांना आपल्या ध्येयाशी, कर्तव्याशी एकनिष्ठ राहण्यासाठी, कर्तव्याची सतत जाणीव देण्यासाठी, जागृत करण्यासाठी ईश्वरनिष्ठांचा म्हणजेच सन्तांचा समुदाय भेटत राहू दे. अशी आहे ज्ञानेश्वरांची सुसंगत अशी मागणी. ही मागणी केल्यानंतर ते ईश्वरनिष्ठ सुध्दा कोणत्या गुणविशेषांनी समृध्द असावेत याचा विचार त्यांनी केला आहे.

ईश्वर निष्ठांची अनेक वैशिष्ट्ये आहेत. त्यातील महत्त्वाची आणि इथे उपयोगी असणारी अशी पाच वैशिष्ट्ये त्यांनी पुढील दोन ओव्यात सांगितली आहेत. त्या ओव्या अशा -

''चलां कल्पतरुंचे आरव। चेतना चिंतामणींचे गांव। बोलते जे अर्णव। पियूषाचे।।१७९७।। चंद्रमे जे अलांछन। मार्तंड जे तापहीन। ते सर्वांही सदा सज्जन। सोयरे होतु।।१७९८।। अध्याय १८''

आशय असा - 'चलां' या शब्दातील 'च' चा उच्चार 'च्' असा ऱ्हस्व करावयाचा नाही. तसा केला तर 'चला-जाऊ या' अर्थ होईल म्हणून तो उच्चार 'च्य' असा जोडाक्षर असल्यासारखा जोर देऊन करावयाचा.

अर्थ असा जे एकाजागी स्थिर न राहता - हालचाल करण्यास समर्थ आहेत. 'चल' म्हणजे एका जागेवरून दुसऱ्या जागेवर जाऊ शकतात असे. हालचाल करणारे उदा. जलचर प्राणी, पक्षी, पशू, मानव हे सर्व 'चल'. 'अचल' म्हणजे एका जागेहून दुसऱ्या जागी जाऊ न शकणारे. एकाच जागी स्थिर रहाणारे उदा. पर्वत, शिलाखंड, झाडे इ. पर्वत, दगड हे निर्जीव पण झाडे सजीव असूनही 'अचल' आणि ज्ञानेश्वरांनी या ईश्वरनिष्ठांना 'कल्पतरु' म्हटले आहे. पण अचल असण्याची जी उणीव ती मात्र त्यांच्यामध्ये नाही. 'कल्पतरु' म्हणजे असा वृक्ष की ज्या वृक्षाखाली बसलेल्याने मनातल्या मनात जरी एखादी इच्छा केली तरी ती पूर्ण होते. पण असा वृक्ष या जगात तरी नाही. ती आकाशपुष्पाप्रमाणे आहे 'कविकल्पना' पण सर्वांना खूप भावणारी, आवडणारी. आरव म्हणजे बाग - उपवन. जेथे केवळ एखादाच वृक्ष नाही तर असे खूप वृक्ष आहेत, अशी जागा. हे कल्पतरु हालचाल करणारे आहेत म्हणून तुम्हाला त्या झाडाकडे जावे लागणार नाही तर हे कल्पतरुच तुमच्याकडे येतील आणि तुमचे कल्याण करतील. तुम्हाला सन्मार्ग दाखवतील, तुमच्या मनातील परमार्थ प्राप्तीची, स्वधर्माचरणाची आस पूर्ण करतील कारण ते साधे वृक्ष नाहीत तर आहेत कल्पतरु.

आता दुसरे वैशिष्ट्य - चेतना म्हणजे चैतन्य-प्राणशक्ती उत्साह. 'चिंतामणी' हाही कल्पवृक्षाप्रमाणे कविकल्पनेतील एक सुंदर रत्न. याचे

वैशिष्ट्य असे की हा ज्याच्या जवळ असतो त्याच्या सर्व काळज्या दूर जातात, सर्व इच्छा मात्र पूर्ण होतात. हे जरी खरे असले आणि ते जरी एक मौल्यवान् असे रत्न असले तरी आहे तर एक प्रकारचा 'दगड'च. म्हणून शेवटी निर्जीवच. पण ईश्वरनिष्ठांजवळ ही 'चिंतामणी'ची वैशिष्ट्ये आहेत पण ते त्या रत्नाप्रमाणे निर्जीव मात्र नाहीत तर त्यांच्यात चेतना असल्याने ते सजीव आहेत. त्यामुळे भावभावना आहेत. तुमच्या विषयी त्यांच्या मनात 'आत्मीयता' आहे. पण निर्जीव नसून सजीव आहेत. त्यामुळे ते तुमच्या मनातील भावना-परमात्म प्राप्ती, स्वधर्माचरणाची आस समजून घेऊ शकतील व तुम्हाला मार्गदर्शन करतील आणि गंमत अशी की ते एक दोन नाही तर त्यांचे 'गांव' आहे. गावात एक घर नसते तर अनेक घरे असतात. तेव्हाच त्याला 'गांव' म्हणतात. असे हे चिंतामणींचे गांव आहे म्हणजे तेथे अनेक चिंतामणी आहेत.

तिसरे वैशिष्ट्य - हे बोलते अर्णव आहेत. अर्णव म्हणजे समुद्र. समुद्रात खूप पाणी असते. तसे हेही खूप आहेत अनेक आहेत. पण समुद्रातील पाणी असते खारट. त्यामुळे या इंग्रजी म्हणीप्रमाणे घोटभरही पिण्यासारखे नाही. त्यामुळे "Water, Water everywhere, but not a dorp to drink". या इंग्रजी म्हणीप्रमाणे घोटभर पिण्यासारखे नाही त्यामुळे तहान भागणार नाही. पण ज्ञानेश्वरांचा समुद्र आहे 'पियुषा'चा. पियुष म्हणजे अमृत-अतीव मधूर व अमरत्व देणारे. पण प्रत्यक्षात कोणीच त्याची चव पाहिलेली नाही. असो. समुद्राच्या लाटांचा जो आवाज येतो त्यालाच आपण सागराची 'गाज' असे म्हणतो. पण आवाज म्हणजे काही बोलण्याचे सामर्थ्य नव्हे. पण हा समुद्र असा आहे की 'बोलते' म्हणजे बोलणारा आहे आणि म्हणून तो तुमच्याशी हितगज करू शकतो. तुमच्या मनातील शंकांचे निरसन करील. तुमच्याशी संवाद साधेल आणि तुमचे कल्याण करेल. तुमच्याशी संवाद साधून तुम्हाला धर्माचरण करण्यास मार्गदर्शन करील. साहजिक तुम्हाला आनंद मिळेल. हा आनंद म्हणजेच मोक्ष-अमरत्व.

आता चौथे वैशिष्ट्य - 'चंद्रमे जे अलांछन' चंद्र-चंद्रमा-एकच आहे. हा एकमेव नाही तर चंद्रमे-चंद्रमा शब्दाचे अनेकवचन. म्हणून खूप-अनेक

चंद्र. चंद्र-शान्त प्रकाश देणारा, औषधी वनस्पतींचे पोषण करणारा-आरोग्यदाता. सुखप्राप्त करुन देणारा-एक नव्हे तर अनेक. अनेक ईश्वरनिष्ठ पण चंद्रावर काळसर डाग आहे हे आहे त्याचे लांछन म्हणजे न्यूनत्व (आता नवीन संशोधनाप्रमाणे हा काळसर भाग म्हणजे चंद्रावर असलेले खडक आहेत.) असो. (पण ज्ञानेश्वरांच्यावेळी काही हा शोध लागला नव्हता.) पण या सन्तरुपी चंद्रावर हे लांछनही नाही कारण सन्तांचे चरित्र व चारित्र्य शुध्द, सात्विक आणि निर्मल, डाग येणारच कोठून. म्हणून चंद्राचे जे न्यूनत्व तेही यांच्या ठिकाणी नाही. आणि शिवाय संख्येने पण पुष्कळ. त्यामुळे सर्वांचे कल्याण करण्यासही समर्थ.

पाचवे वैशिष्ट्य - 'मार्तंड जे तापहीन' - मार्तंड म्हणजे सूर्य. 'जे' या शब्दावरुन हे ध्यानी येते की ते सूर्यही अनेक आहेत नाहीतर 'जो' हे सर्व नामवजा विशेषण आले असते. प्रकाश देणे हा सूर्याचा स्थायिभाव. त्याच्या जवळ अंधार नाहीच. सतत धर्माचरण करणारा कर्मयोगी. तुम्ही सूर्याला पूजनीय माना अगर मानू नका. त्याला रविवार नाही सुट्टी माहीत नाही. म्हणून एकनिष्ठ कर्मयोगी. लोकांना सतत प्रकाश देणारा. पण दुपारच्या वेळी डोक्यावर प्रकाशू लागतो त्यावेळी त्याचा तो प्रकाश तापदायक होतो, नकोसा वाटतो. ही सूर्याच्या ठिकाणी असलेली उणीव. सन्तही सूर्यप्रकाशा प्रमाणे ज्ञानाचा प्रकाश देणारे पण कधी त्या ज्ञानाचा ताप देणारे नाहीत. कारण त्यांना 'अहंकारा'चा वारा कधी लागतच नाही. त्यामुळे सतत शान्त शान्त. म्हणून ज्ञानेश्वर एकनाथादी सर्व सन्त 'शान्तीब्रह्म'च. जणू लोकांनी छळ केला तरी लोकांच्या कल्याणाचाच विचार करणारे.

अशी ही आगळीवेगळी वैशिष्ट्ये असणारे व ईश्वरनिष्ठ ''ते सर्वांही सदा सज्जन। सोयरे होतु।।'' असे सदा सज्जन असणारे सन्त सदा-नेहमी सर्वांही-सर्वांना सोयरे-नाते संबंधी होतु-होऊ देत. सोयरा कोणाला म्हणतात. तर अंतरीचे सहस्य-गूढगोष्ट उकलून दाखवता येते. मनात खोलवर रुतलेले दु:ख एखादा सतत टोचणारा सल (काटा) सांगता येतो. असा, इतका जवळचा-घनिष्ठ. सोयरा होण्यासाठी आपआपसात तितका विश्वास निर्माण झाला पाहिजे. संतांचे चरित्र आणि चारित्र्य इतके सोज्वळ असते की त्यांच्या

ठिकाणी असा विश्वास सहज निर्माण होऊन जातो आणि मनातले दु:ख सांगितले की मन मोकळे होते. शान्त शान्त होते.

असे हे सन्त सर्वांचे सोयरे व्हावेत. केवढी मोलाची आन्तरिक आस आहे ही. खरोखर धन्य ते ज्ञानेश्वर. म्हणूनच सर्वांची 'माऊली'.

पुढील ओवीत ते म्हणतात ''किंबहुना सर्व सुखी। पूर्ण होऊनि तिहीं लोकीं। भजिजो आदिपुरुखीं। अखंडित।।१७९९।।''

किंबहुना म्हणजे फार काय सांगावे. ज्ञानेश्वरांना म्हणावयाचे आहे की मी ग्रंथभर जे सांगितले तेच पसायदानात मागत आहे. माझ्याजवळ सांगण्यासारखे जे (ज्ञान) होते ते सर्वस्वाने सांगितले आहे. आता सांगण्यासारखे काही शिल्लकच राहिलेले नाही म्हणून किंबहुना - आता एवढेच म्हणतो की सर्वजण सुखी व्हावेत. सर्वसामान्य माणसे ज्याला सुख मानतात ते सुख आणि ज्ञानेश्वरासारखे सन्त ज्याला सुख मानतात यात मात्र खूप फरक आहे. सामान्य माणसांचे सुख इंद्रियांच्या तृप्तीवर आधारित आहे त्यामुळे ते असते क्षणभंगूर. पण संताचे सुख असते आत्मप्राप्तीचे, चित्स्वरुपाच्या प्रचितीमुळे प्राप्त झालेले त्यामुळे ते असते अक्षय टिकणारे. असे सुख मिळाले की माणूस 'पूर्णकाम' होतो.

असे सर्वांनी पूर्णकाम होऊन तिन्ही लोकातील म्हणजे यच्चयावत प्राणीमात्रांनी त्या 'आदिपुरुखीं' म्हणजे आदि पुरुषालाच भजावे म्हणजे त्याच्या ठिकाणी एकचित्त व्हावे.

येथे आलेला 'आदिपुरुखीं' शब्द 'तैत्तरीय' उपनिषदातील आहे. हे मुद्दाम सांगावेसे वाटले कारण ज्ञानेश्वर वारंवार असे म्हणताना दिसतात की मी काहीच विद्याभ्यास केलेला नाही. केवळ ''एवं गुरुक्रमें लाधलें। समाधिधन जे आपुलें। तें ग्रंथे बांधौनि दिधले। गोसावी मज।।१७६३।। वाचूनी पढे ना वाची। ना सेवाही जाणे स्वामीची। ऐसिया मज ग्रंथाची। योग्यता कें असें।।१७६४।। अध्याय १८'' अर्थ असा - याप्रमाणे गुरूपरंपरेने प्राप्त झालेले आपले समाधिरूप जे धन, ते या ग्रंथाच्या माध्यमातून माझ्या स्वामींनी (निवृत्तीनाथांनी) मला दिले, नाहीतर मी काही शिकलो नाही, काही वाचलेले नाही इतकेच काय पण गुरूंची सेवाही मला धड करता येत नाही. त्या मला एवढे आशयघन व्याख्यान करण्याचे सामर्थ्य कोठून येणार बरे. हा त्यांचा

केवळ विनय आहे. त्यांनी उपनिषदादी सर्व ग्रंथाचा पूर्ण अभ्यास केलेला आहे. म्हणुनच 'तैत्तरीय' उपनिषदातील शब्द सहजपणे त्यांच्या पसायदानात आलेला आहे हे आपल्या ध्यानी यावे.

पुढील ओवीत ते म्हणतात ''आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं इयें। दृष्टादृष्ट विजयें। होआवेंजी।।१८००।।

भावार्थ असा - मागील ओवीत व्यक्त केल्याप्रमाणे तिन्ही लोकातील सर्वांनी 'पूर्णकाम' व्हावे व त्या परमपुरुषाच्या ठिकाणीच आपले चित्त एकाग्र करावे हे तर व्हावेच. त्याशिवाय त्यांची जी इच्छा आहे, अपेक्षा आहे ती त्यांनी 'आणि' या उभयान्वयी अव्ययाने सांगितली आहे. ती अपेक्षा कोणती आहे ते आता पाहूया.

ग्रंथोपजीविये म्हणजे हा ग्रंथ हेच ज्यांच्या उपजीविकेचे साधन आहे त्यांना. ह्या ग्रंथावर उपजीविका करणारे म्हणजे ग्रंथाच्या आधारे पुराण सांगून किंवा कीर्तन करून पोट भरणारे असा अर्थ मात्र नाही. तर जे आपले जीवन या ग्रंथाच्या तत्त्वज्ञानानुसार जगू इच्छितात त्यांना म्हणजे भगवद्गीतेतील तत्त्वज्ञानाचा अभ्यास करुन त्याप्रमाणे 'अहंकाराचा मदु' आणि 'कर्मफलाचा स्वादु' यांचा त्याग करुन स्वत:चे कर्तव्य - कितीही अवघड असले तरी तेच करणे ज्यांचा नित्ययज्ञ आहे तो करून तसे जीवन व्यतीत करण्याचा ज्यांचा मानस आहे. तसा प्रयत्न करीत आहेत इतकेच नव्हे तर त्यापुढे जाऊन 'सर्व धर्मान् परित्यज्य माम् एकं' (म्हणजेच त्या एकमेवाद्वितीय परमतत्त्वापुढे पूर्ण शरणागत होण्याची ज्यांच्या मनाची सिध्दता झालेली आहे असे जे कर्मयोगी (लोक) ते म्हणजे 'ग्रंथोपजीवि' ग्रंथांपजीवियें ही या शब्दाची चतुर्थी (विभक्ती) आहे. म्हणून अर्थ अशा 'लोकांसाठी' विशेषीं म्हणजे विशेषेकरून - प्राधान्याने इयें लोकीं - या मृत्यू लोकांमध्ये. दृष्टादृष्ट - हा दृष्ट आणि अदृष्ट या दोन शब्दांचा संधी आहे. दृष्ट म्हणजे इहलोकीचे (आपल्याला दिसते, समजते असे) म्हणजे ज्याला आपण 'प्रारब्ध' नशीब म्हणतो ते. अदृष्टी म्हणजे जे दृष्टीच्या टप्प्यात येत नाही म्हणजे परलोकींचे (पुढील जन्मात येणारे) म्हणजेच संचित. जे आपण केलेल्याच कर्मांचे फळ म्हणून जमा झालेले असते पण काय आहे ते माहीत नसते. पण नंतर तेच प्रारब्ध म्हणून येणार असते ते. या दोन्हीतही बदल

होणार नसतो. जे प्रारब्ध म्हणून वाट्याला आलेले असते ते भोगूनच संपवावे लागते. जे संचित आहे ते आपणच केलेल्या कर्माचे फळ असल्याने तेहि आता आपल्याला बदलता येणारे नाही. ते जेव्हा केव्हा 'प्रारब्ध' म्हणून पुढे येईल ते त्यावेळी भोगूनच संपवावे लागेल. पण ज्ञानेश्वर तर म्हणत आहेत 'विजयें होआवे' म्हणजे दोन्हींतर विजय मिळावा. खरे तर जे ठरलेले आहे त्यावर विजय कसा मिळवणार पण ज्याअर्थी ज्ञानेश्वरांची मागणी आहे त्याअर्थी त्यात नक्कीच गहन आणि लेककल्याणाचा अर्थ आहे. तो पाहूया.

विजय होऊ दे. विजय होण्यासाठी पुरुषार्थ गाजवला पाहिजे मग येथे पुरुषार्थ करावयाचा म्हणजे काय करावयाचे तर वाट्याला आलेल्या प्रारब्धाकडे 'नकारात्मक भावने' न पाहता 'सकारात्मक भावने' पाहण्याचा प्रयत्न करावा. ते सामर्थ्य प्राप्त व्हावे. जसे 'पेल्यात अर्धा ग्लास पाणी आहे व अर्धा रिकामा आहे. त्याकडे पाहताना पेल्यातील रिकाम्या असलेल्या ग्लासाचा विचार न करता पेला भरलेला आहे त्याचा विचार करावा.' 'अर्धा रिकामा आहे' असा विचार प्रमुखत्वाने करणे म्हणजे 'नकारात्मक भावने' पहाणे तर 'अर्धा भरलेला आहे' हा विचार प्रामुख्याने करणे म्हणजे 'सकारात्मक भावा'ने पाहणे. सकारात्मक भावाने पाहिले की आशा वाटते, भावना बदलते व उमेद अंगी येते. प्रारब्धाकडे सकारात्मक पाहणे म्हणजे सध्या वाईट दिवस आहेत हे खरे आहे पण हेही दिवस निघून जातील आणि चांगले दिवस येतील. सध्या रात्र आहे, अंधार आहे पण रात्र संपेल, दिवस उगवेल, प्रकाश येईल हा सृष्टीचा नियमच आहेना मग आपण कशाला निराश व्हावयाचे. असा विचार करावा आणि धीराने प्रसंगाला सामोरे जाण्याची सिध्दता करावी. धीराने आत्मविश्वास वाढतो व त्या बळावर प्रसंग निभवता येतो. फक्त त्यासाठी परमेश्वरावर नितान्त श्रध्दा असली पाहिजे. म्हणूनच ज्ञानेश्वरांनी प्रथम देवावर अनन्य श्रध्दा ठेवण्यास मागून घेतले. आणि मग अशा देवावर एकनिष्ठा असणाऱ्या लोकांना प्रारब्ध असो वा संचित त्यावर त्यांचा विजय व्हावा अशी मागणी केली आहे. अशा प्रकारे जे होऊन गेले आहे ते बदलता येत नसल्याने (What is done cannot be done असे म्हटले जाते ते सार्थ आहे.) त्यावर विजय

मिळवायचा आणि तयार होणारे 'संचित' चांगले व्हावे म्हणून दृढविश्वासाने 'स्वधर्माचरण' करावयाचे. कितीही त्रासदायक वाटले तरी स्वकर्तव्य करण्यास तत्पर रहावयाचे हा आहे त्यांचा भाव.

अशा ग्रंथोपजीवि लोकांच्या हातीं त्या परमतत्त्वाच्या ठिकाणी मन एकाग्र करण्याचा 'हुकमी एक्का' असल्याने 'हात' त्यांचाच होणार आहे हे सांगणे नलगे.

ज्ञानेश्वरांनी पसायदानात फक्त 'विध्यर्थ' वापरला आहे. 'आज्ञार्थ' कोठेही आलेला नाही. संतांचे हे वैशिष्ट्य असते की ते 'आज्ञार्थ' कधीही वापरत नाहीत. 'हे झालेच पाहिजे', 'हे करच' असे ते कधीच म्हणत नाहीत. एक कारण असे की ईश्वराला आज्ञा करण्याचा अधिकार आपला आहे असे ते मानत नाहीत. आज्ञा नेहमी श्रेष्ठाकडून कनिष्ठाला, मोठ्याकडून लहानाला होते. म्हणून परमेश्वराला आज्ञा आपण करू शकत नाही असे त्यांना वाटत असते. दुसरे असे की आज्ञार्थात आग्रही भूमिका असते. ती भूमिकाही ते घेत नाहीत कारण त्यांना जाणीव असते की हे सर्व होण्यासाठी प्रयत्न एकतर्फी होऊन चालणार नाही. कारण परमेश्वर जरी तयार झाला तरी साधकाच्याही मनात तितकी उत्कट इच्छा हवी. त्यानेही त्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत तरच कार्यसिध्दी होणार. म्हणून ते आग्रह धरत नाहीत.

येथे मला एक गोष्ट आठवली. माझा हा विचार स्पष्ट करणारी आहे ती कथा. 'एक होता राजा. त्याला एक मुलगा होता. दोघेही वृत्तीने तसे सदाचरणी पण स्वत:च्या ठिकाणी आग्रही स्वभावाचे. एकदा दोघांचा थोडा वाद झाला. दोघेही आपल्या मतावर आग्रही. राजपुत्र तरुण त्यामुळे थोडा अविचारी. रागाच्या भरात तो घर-राज्य सोडून गेला. राजाही जरा रागात असल्याने त्यावेळी काहीच बोलला नाही. पण राजाचे मुलावर मनापासून प्रेम होते. तसा मुलगाही होताच सदाचरणी. मुलगा निघून गेल्यामुळे राजा दु:खी झाला. राज्यकारभार पाहत असे पण सदा बेचैन असे. प्रधान चाणाक्ष होता. त्याच्या नजरेतून ही गोष्ट सुटली नाही. तो राजाला म्हणाला 'महाराज, राजपुत्र निघून गेल्यामुळे आपण अतिशय विमनस्क झाले आहांत. खरे ना. आपण मोठे आहात. दोन पावलें मागे जाऊ पण राजपुत्राला परत बोलावूया.

राजाला मनातून खूप बरे वाटले. पण तो व्यवहारज्ञ होता. त्याची दोन पावले मागे जाण्याची तयारी होतीच शिवाय स्वत: ९९ पावले पुढे चालत जाण्याचीही तयारी होतीच. पण राजपुत्राने एक पाऊल पुढे येण्याची इच्छा व्यक्त केली तशी तयारी ठेवली तरच. प्रधानाला समजेना असा आग्रह का? तसे पाहता माघार घेण्याचा मनाचा मोठेपणा राजाने दाखवला आहे. माझ्या सूचनेचा त्यांना आनंदही झाला आहे मग असे का? प्रधानाने राजालाच शेवटी स्पष्टिकरण विचारले. राजा म्हणाला - माझी कितीही इच्छा असली तरी राजपुत्राची इच्छा हवी तरच कार्यसिध्दी-समेट होणार. म्हणजे राजपुत्राने एक पाऊल जरी पुढे टाकले तरी मला समजेल की त्याचीही समेट करण्याची मनापासून इच्छा आहे. मग मी कितीही पुढे येण्यास तयार आहे. मी दोन पावले मागे जाण्यासही तयार आहे पण राजपुत्राची तयारी हवी ना समेटासाठी.

अगदी हाच मामला इथे आहे. ज्ञानेश्वरांसारख्या ईश्वरनिष्ठांच्या आग्रहाखातर ईश्वर पुढे येण्यास तयारही होईल पण साधकाच्या मनात इच्छा हवी आणि त्यासाठी त्याने प्रयत्न सुरु केले पाहिजेत तरच हे जमणार.

म्हणून ज्ञानेश्वर 'विद्यर्थ' उपयोगात आणतात. त्यांची इच्छा आहे, प्रार्थना आहे पण आग्रह नाही. कारण अशा ईश्वरनिष्ठांचा आग्रह ईश्वर डावलू शकत नाही.

पसायदानाचा भावार्थ समजल्यावर मी पूर्वी म्हटल्याप्रमाणे ज्ञानेश्वरांनी उपयोगात आणलेला प्रत्येक शब्द अगदी विचारपूर्वक निवडून घेतला आहे, योग्य अर्थवाहक असाच आहे. एकात एक दुवा अडकवून तयार केलेल्या सुंदर सोनसाखळी सारखा आहे. एकही दुवा कच्चा नाही. एकही शब्द इकडचा तिकडे करता येणार नाही, दुसरा शब्द वापरता येणार नाही इतका चपखल बसणारा आहे. एकही ओवी मागेपुढे करता येणार नाही. इतक्या त्या सुसंगत घेतलेल्या आहेत. इंग्रजीत ज्याला 'Read between the lines' म्हणतात तसा त्या त्या ओवीचा प्रतित होणारा भावार्थ जाणून घेतला तरच त्यांची खरी लज्जत ध्यानीं येईल. प्रत्येक शब्द जणू 'गागरमे सागर' भरणारा तर विचार विश्वमोलाचा आहे. एखाद्या प्रबंध लेखकाने आपली विधाने अगदी तर्कशुध्द पध्दतीने (Logically) स्पष्ट करीत जावे तशी त्यांच्या

ओव्यांची मांडणी आहे. म्हणूनच पसायदानाला 'हिमालयाची उंची' तशीच महासागराची खोली आहे.

ज्ञानेश्वरांची 'ज्ञानेश्वरी म्हणजेच भावार्थ दिपीके'चे निरुपण ऐकल्यावर निवृत्तीनाथ संतुष्ट झालेले आहेतच. या मंदिरावर कळस चढला आहे तो त्यांनी मागितलेल्या 'पसायदानाने'. ज्ञानेश्वरांनी जे जे मागितले आहे ते ते सर्व केवळ 'बहुजन हिताय' नाही तर 'सर्वेषाम्' हिताय असे आहे. त्यांच्या या भव्य-दिव्य भावात्मक मागण्याने विश्वात्मक देव म्हणजेच निवृत्तीनाथ-त्यांना अधिकच संतोष झाला आहे आणि संतुष्ट झालेल्या त्यांनी आपल्या एकुलत्या एक लाडक्या शिष्याच्या नव्हे नव्हे पुत्राच्याही विनवणीप्रमाणे त्यांची मागणी मान्य केली आहे. मान डोलावली व हा विश्वेशराव बोलला. (त्यांनी जणू त्यांना संमती हाच वर दिला) आणि या वराने - वराच्या प्राप्तीमुळे ज्ञानेश्वर 'सुखिया' झाले, तृप्त झाले हेच सांगणारी पुढील ओवी अशी आहे - 'येथ म्हणे विश्वेशरावो। हा होईल दान पसावो। येणे वरें ज्ञानदेवो। सुखिया झाला।।१८०१।। अध्याय १८'

येथ म्हणजे सर्व पसायदान ऐकल्यावर संतुष्ट होऊन. म्हणे म्हणजे म्हणाले. विश्वेशरावो - रावो म्हणजे राजा विश्व + ईश = विश्वेश विश्वाचा अधिकारी. राजांचाही राजा-महाराज-चक्रवर्ती सम्राट जणू. असे निवृत्तीनाथ म्हणे - म्हणाले. हा - म्हणजे ज्ञानेश्वरांनी मागितलेला वर म्हणजे त्यांनी पसायदानात व्यक्त केलेल्या सगळ्या आशा-अपेक्षा. दान पसावो - दान प्रसाद रूप होईल म्हणजे त्या सगळ्या आशा-अपेक्षांना पूर्णत्व प्राप्त होईल. त्यांच्या मनाप्रमाणे सर्व होईल. असे निवृत्तीनाथांनी म्हटल्यावर. आपल्या सद्गुरुंकडून मिळालेला हा वर म्हणजे आशीर्वाद (ऐकल्यावर) मिळाल्यावर ज्ञानदेव 'सुखिया' म्हणजे तृप्त झाले, आनंदी झाले.

आधीच 'पूर्णकाम' असलेले ज्ञानदेव या वराने अगदी तृप्त झाले. जणू सुखसागरात अमृताचा वर्षाव झाला. जणू ही मन:शान्तीची ध्वजा कळसावर विराजमान झाली. ज्याचे दुरुन दर्शन घेतले तरी भक्तांनी संतुष्ट व्हावे.

अशा त्रैलोक्यपावनी गीताचा सुगंध असलेल्या पसायदानाला आणि त्याच्या उद्गात्याला सर्वांसहित माझे त्रिवार वंदन.

परिशिष्ट

‘भगवद्गीता’च का निवडली - एकविचार

विठ्ठलपंतांनी मुलांसाठी चिठ्ठी लिहिली. रुक्मिणीला वाचून दाखविली. तिने ती देवाजवळ ठेवली.

दोघेही रात्रभर जागीच होती. दोन प्रहर रात्र झाली. तसे विठ्ठलपंत उठले. रुक्मिणीही उठली. तिने मायेने मुलांच्या अंगावरील पांघरुण नीट केले. दोघेही घराबाहेर पडले आणि चालू लागले.

मजल दर मजल करीत ते ‘प्रयागक्षेत्रीं’ आले. येथेच गंगा, यमुना, सरस्वतीचा त्रिवेणी संगम झाला आहे. दोघांनीही उषास्तवन केले. नंतर ‘‘निवृत्ती-ज्ञानदेव-सोपान-मुक्ताबाई - आमचे तुम्हाला अनेक आशीर्वाद’’ असे म्हणून आपल्या बाळांना शेवटचा आशीर्वाद दिला. दोघांनीही एकदमच स्वत:ला पाण्यात झोकून दिले.

धप्प-धप्प.

अनाहूतपणे सोपान व मुक्ताला स्वप्नात याची जाणीव झाली. दोघेही मुसमुसून रडतच झोपेतून उठले. निवृत्तीदेवांनी जवळ घेऊन दोघांनाही शान्त केले. पण चौघांच्याही डोळ्याला धार लागली होती.

हळूहळू चौघांचा जीवनक्रम व ज्ञानसाधना सुरु झाली. ज्ञानदेव भिक्षा मागत त्यावर जमेल तसा उदरनिर्वाह चालू झाला.

एक दिवस झोपडीत शिरताच ज्ञानदेव म्हणाले ‘आपल्या मौंजीबंधनाबद्दल आपण काहीतरी हालचाल केली पाहिजे’’.

निवृत्तीनाथ म्हणाले ‘‘ज्ञाना, समाजाने आपणास बहिष्कृत करून टाकलेच आहे. ब्राह्मणसमाज तर दुरावलाच आहे. तू म्हणतोस तसे शुध्दिपत्र मिळवून व मौंजीबंधन करून तरी हे ब्राह्मण आपल्याला जवळ करतील कशावरुन?’’

सोपान मध्येच म्हणाला ‘‘दादा, त्यापेक्षा आपण हे गाव सोडून दुसऱ्या गावी जाऊ या ना.’’

ज्ञानदेव म्हणाले ‘‘सोपाना, आपण गाव जरी बदलले तरी आपली अवस्था तर बदलणार नाही ना! काही काळाने तेथील समाजालाही आपण

संन्याशाची मुले आहोत हे कळले की आपण त्यांची फसवणूक केली, आपण त्यांना हे सांगितले नाही म्हणून त्यांचा रोष अधिकच वाढेल. त्यापेक्षा आपण येथेच राहू. मुंजी झाल्या तरी कोणी ब्राह्मण आपल्याला जवळ करणार नाहीत कदाचित हे जरी खरे असले तरी बाकीचा समाज - आपआपसातील दुरावा व द्वेष निश्चितच कमी होईल आणि ब्राह्मण मंडळी सोडली तरी बाकीचा बहुजनसमाज आपणास समजून घेऊ शकेल. निवृत्तीदादा, त्यामुळे आपले विशेषत: या दोन लहानग्यांचे जीवन तरी सुसह्य होईल खरे ना? आणि मुख्य म्हणजे ब्राह्मणाने संस्काराशिवाय राहू नये यासाठी तरी शुध्दीपत्रासाठी पैठणला जाणे भाग आहे. निवृत्तीदादा, ब्रह्मरुप असलेल्या आपणाला जरी कोणत्याच संस्कारांची गरज नाही हा तुमचा अद्वैत भूमिकेवरुन केलेला विचार कितीही योग्य असला तरी समाजात राहावयाचे म्हणजे लोकव्यवहार हा पाळलाच पाहिजे असे मला तरी वाटते म्हणूनच माझा पैठणला जाण्याचा आग्रह आहे. आपल्याला पटतो का माझा विचार?

निवृत्तीनाथ म्हणाले 'तुझा आग्रहही योग्यच आहे. तेव्हा आपण जाऊया पैठणला. झाले बेत ठरला. दोन्ही लहानग्यांना आनंद झाला.

मजल दरमजल करीत चौघेही पैठणमुक्कामी आले. मुले कृष्णाजीपंताच्या घरी आली. मुद्‌गलशास्त्रींनी दिलेल्या पत्राप्रमाणे कृष्णाजीपंतांनी धर्मसभा बोलावण्याचे ठरविले.

धर्मसभेचा दिवस उजाडला. सभा वेळेवर सुरु झाली. सभास्थानावर अनेक लोक जमले होते. चारही मुले एका बाजूला उभी होती. लोकांच्या नजरा त्यांच्यावरून फिरत होत्या. कोणाच्या चेहऱ्यावर कुतुहल तर कोणाच्या दया, कोणाच्या तिरस्कार तर कोणाच्या चेहऱ्यावर क्रोध असे नाना विकारांचे जाळे पसरले होते. मुले मात्र शान्त चित्ताने धर्मसभेकडे कौतुकाने, कुतुहलाने पहात होती.

सभेचे कामकाज सुरु झाले. आचार्यांनी बोलण्यास सुरवात केली. 'मुलांनो, तुमचा थोडा परिचय करून द्याल ना?'

ज्ञानदेवांनी पुढे होऊन आपला सर्व वृत्तान्त व्यवस्थित कथन केला. आणि नम्रतेने म्हटले 'आमची आपणास विनंती अशी आहे की आपण

आम्हांला व्रतबंध करण्यास परवानगी द्यावी व समाजाने आम्हाला जे बहिष्कृत केले आहे ते समाजात सामावून घ्यावे, एवढेच''.

सभेत विचारविनिमय सुरु झाला. पोथ्यांची बाडे तपासली केली. पण असा आधार मात्र कोठेच गवसला नाही. त्यामुळे आचार्य म्हणाले 'ज्ञाना, आता तूच सांग, आम्ही तुम्हाला समाजात कसे सामावून घ्यावे?'

ज्ञानदेव म्हणाले 'भूदेव, ज्यांनी आश्रमाचे संक्रमण केले. त्यांनी तर देहान्त प्रायश्चित्त घेतलेच आहे. आम्ही त्यांची मुले आहोंत. आम्ही तर आत्ता प्रथमच व्रतबंध करून ब्रह्मचर्याश्रमात प्रवेश करू इच्छित आहोंत तेव्हा आपण तेवढी मुभा आम्हांला द्यावी एवढीच आमची विनंती आहे.

आचार्य - 'ज्ञाना, खरे तर तुझे म्हणणे पटते पण ही धर्मसभा केवळ धर्मशास्त्राचाच विचार करणारी आहे. ती मानवता धर्म वगैरे काहीही जाणत नाही. स्वतंत्रपणे विचार करू शकत नाही.'

ज्ञानदेव म्हणाले 'धर्मशास्त्र म्हणजे गुन्हा व त्यासाठी शिक्षा याचा तक्ताच आहे असे वाटते. असे असेल तर कोणत्याही गुन्ह्याच्या शिक्षेची अंमल बजावणी धर्मशास्त्राचा जाणकार परस्परही करू शकतो. मग धर्मसभेचे प्रयोजन काय?'

आचार्य - 'नाही, ज्ञाना, गुन्हा का घडला? याची तपशीलवार माहिती मिळवून, गुन्हा कोणत्या परिस्थितीत झाला याचा सांगोपांग विचार तर केला पाहिजे ना!'

ज्ञानदेव - 'असे जर असेल तर माझ्या बाबांना विद्यार्जनासाठी संन्यास ग्रहण करण्याची सक्ती झाल्यामुळेच संन्यास घ्यावा लागला. आणि गुरु-आज्ञेचे पालन करण्यासाठीच पुन्हा संसाराचा स्वीकार करावा लागला. त्यात विषयासक्तिचा लवलेशही नव्हता खरे ना!'

आचार्य - 'पण त्यांनी खोटे बोलून संन्यास घेतला हा तर दोष आहेच ना?'

ज्ञानदेव - 'आचार्य, ज्ञानासारख्या पवित्र वस्तुची प्राप्ती व्हावी हाच हेतू होता. आणि ज्ञानापासून कोणताही स्वार्थ साधण्याचा हेतू त्यात नव्हता तेव्हा ते खोटे बोलणे क्षम्य नाही का? त्यातून त्यांनी त्याचे प्रायश्चित्त घेतलेले आहेच. आम्ही तर कोणताच गुन्हा केलेला नाही. म्हणूनच आम्ही, आम्हाला व्रतबंध करण्याची संमती देऊन शुध्द करून घ्यावे असे विनवत आहोंत.'

आचार्य - 'पण संन्याशाची मुले शूद्रापेक्षाही शूद्र मानली जातात.'

ज्ञानदेव - 'तसा तर प्रत्येक मनुष्य, अगदी विद्वान् ब्राह्मणसुध्दा जन्मतः शूद्रच असतो तो मुंज झाल्यानंतरच द्विज होतो. जन्मनः जायते शूद्रः। संस्कारात् द्विज उच्यते।। असे सुभाषितच आहे ना!'

आचार्य - पण जरी मुंजी केल्या तरी तुम्हांला ज्ञान देण्यास कोणीही तयार होणार नाही. खरे ना?

कृष्णाजी पंत मध्येच बोलले - 'आचार्य, क्षमस्व' मुलांच्या पित्याने त्यांना सर्व प्रकारचे ज्ञान दिलेलेच आहे. मुले व्युत्पन्न आहेत. पूर्ण ज्ञानी आहेत. वेद उपनिषदांचाही त्यांचा अभ्यास आहे. पण मुंज झाली नसल्याने कर्मकांडाचा अधिकार नाही हाच त्यांचा प्रश्न आहे. अशी बरीच चर्चा झाली.

आचार्य म्हणाले - असे जर म्हटले तर तुझ्यामध्ये आणि या रेड्यामध्ये काय फरक आहे?

ज्ञानदेव म्हणाले - आचार्य, देहात फरक आहे. तो पशू आहे आणि मी माणूस.

आचार्य - पण दोघांच्या देहाचे अवयव तर सारखेच आहेत ना.

ज्ञानदेव - होय आचार्य.

आचार्य - मग तुझ्या व त्याच्या ज्ञानामध्ये इतका फरक का?

ज्ञानदेव - आचार्य, ज्ञान हे संस्कारानेप्रगट होते. त्यासाठीचे आवश्यक संस्कार माझ्यावर झालेले आहेत आणि त्याच्यावर झालेले नाहीत म्हणून.

आचार्य - मग त्याच्यावर तसे संस्कार केले तर त्यालाही तुझ्याप्रमाणे ज्ञान होईल? तुला म्हणता येतात तशा 'ऋचा' त्यालाही म्हणता येतील?

ज्ञानदेव - आचार्य, निश्चितच. निश्चितच म्हणता येतील.

सभेत एकच गोंधळ झाला. कोणी टिंगल करीत होते तर कोणी खरोखरच या गहन विचारात गढून गेले.

ज्ञानदेवांनी आपल्या गुरुदेवांकडे - निवृत्तीनाथांकडे पाहिले.

निवृत्तीनाथ म्हणाले, ज्ञानदेवा, धर्म हा काही पोथ्यापुराणात नाही तो ज्ञानरुप आहे. आणि ज्ञान प्राप्त करून घेण्याचा अधिकार सर्वांना आहे. तू तुझे म्हणणे खुशाल सिध्द करून दाखव. यांची अशीच मागणी दिसते.

ज्ञानदेवांनी निवृत्तीनाथांच्या चरणी मस्तक ठेवले. निवृत्ती नाथांनी डोक्यावर हात ठेवून आशीर्वाद दिला. सभेतील सर्वांना अभिवादन करून ज्ञानदेव रेड्याजवळ गेले. त्यांनी शांतपणे डोळे मिटले. ॐकाराचा घनगंभीर आवाज घुमला. ज्ञानदेवांनी रेड्याच्या मस्तकी आपला हात ठेवला. रेड्याने त्यांच्याकडे पाहिले. त्याच्यातील बुध्दी जागृत झाली. ज्ञानदेवांनी रेड्याला संथा दिली आणि रेड्याने पहिली 'ऋचा' म्हटली. रेडा वेदपठण करू लागला. सर्व सभा थक्क झाली.

आचार्यही गोंधळले. त्यांना त्यांची चूक उमगली. ते ज्ञानदेवांना नमस्कार करण्यासाठी खाली वाकले. त्यांना वर उचलत ज्ञानदेव म्हणाले 'आपण काय करता आहात. मी लहान आहे आपण थोर आहात, ज्ञानी आहात, असे मला लाजवू नका.' आम्हाला शुध्दिपत्र देऊन उपकृत करावे एवढेच मागणे आहे. शुध्दिपत्र मिळाले की आम्ही अलंकापुरीत परत जाऊ.

दुसऱ्या दिवशी शुभ मुहूर्तावर शुध्दिपत्र थाटामाटात निवृत्तीनाथांच्या हाती दिले गेले. सर्वांनी जयजयकार केला व 'आपणही काहीतरी बोलावे' असा आग्रह सुरु झाला. निवृत्तीनाथांनी ज्ञानदेवांना खूण केली.

ज्ञानदेव बोलू लागले - 'संन्याशाची मुले म्हणून आम्हाला जीवन जगणे असह्य झाले होते. अलंकापुरीच्या ब्राह्मणवृंदानी शुध्दिपत्राचा आग्रह धरला. दैनंदिन जीव सुसह्य व्हावे व समाजाकडून मानवतेची वागणूक मिळावी ह्याच अपेक्षेने आम्ही येथवर आलो होतो. आमचा हेतू सिध्द झाला. आम्हाला आनंद आहे. आता आम्ही परत जाऊ.

समाज सुस्थितीत रहावा यासाठीच धर्मशास्त्राचे नियम हे प्रमाण आहेत. त्या नियमांच्या आधाराने धर्मसभेने, मानवतेच्या दृष्टीकोनातून वाट चुकलेल्या लोकांना थोडी फार शिक्षा करावी हे उचितच आहे पण त्यांना समाजात समावून घ्यावे हीच आमची प्रार्थना. म्हणून मी विनयाने म्हणतो आहे की धर्ममार्तंडांनी त्यांना प्राप्त असलेल्या अधिकाराचा, समाज घडविण्यासाठी, समाजातील सर्वांचे जीवन सुसह्य व्हावे यासाठी उपयोग करावा. ज्यांना ज्ञानामुळे शिक्षा करण्याचा अधिकार मिळाला आहे तो अधिकार त्यांनी क्षमा करून सार्थकी लावावा व अज्ञानी लोकांना सांभाळून घ्यावे त्यांना मार्गदर्शन करावे एवढीच आहे आमची प्रार्थना.

आचार्य म्हणाले 'अवश्य' आज आम्हाला खरे ज्ञान झाले. आपण मौंजीबंधन करावे आणि या असार संसारात न अडकता समाजाच्या कल्याणासाठी आपले जीवन व्यतीत करावे इतकीच आहे धर्मसभेची मनिषा. आपल्याला खूप खूप आशीर्वच.

असे बोलून आचार्यांसहित सर्वांनी चौघा भावंडांचा जयजयकार केला आणि कौतुकाच्या सोहोळ्यात सभा शान्त झाली. अपेगावचे लोक व पाटीलही सभेला आले होते. त्यांनी आपेगांवी मुलांच्या वडिलांच्या वाड्यात राहाण्यास येण्यासाठी खूप आग्रह धरला. पण निवृत्तीनाथांनी सर्व भावंडांच्या संमतीने आपेगावच्या घरात विठ्ठल मंदिर उभे करावे व सर्व जमीन त्या मंदिराला द्यावी अशी प्रार्थना केली.

ज्ञानदेवांची ख्याती सर्वदूर पसरली. लोक दर्शनासाठी येऊ लागले. त्यांच्याकडून उपदेश मिळावा असे म्हणू लागले. ही संधी साधून निवृत्तीदादांनी ज्ञानेश्वरांना कीर्तनप्रवचने करण्यासाठी सुचविले. लोक त्यांच्या प्रवचन-कीर्तनाला येत. ज्ञानामृत प्राशन करत. समाधानी होत.

लवकरच ते परतीला तयार झाले.

येताना चौघे आले होते. जाताना पाचजण झाले. त्यांच्या बरोबर 'महिषराज'ही होता. गोदावरी पार करून त्यांनी पैठणची वेस ओलांडली.

शुध्दिपत्र मिळाले आहे. आत अलंकापुरीला परत जाण्यापूर्वी नेवासे येथे 'मोहिनीराजाचे' मंदिर आहे ते पाहूया असे मुक्ताने सुचविले. सर्वांनाच हा विचार आवडला.

निवृत्तीनाथ म्हणाले 'माझ्या मनात एक वेगळाच विचार आला आहे. तिघांनाही विचार जाणून घेण्याची उत्कंठा लागली होती.

निवृत्तीनाथ म्हणाले 'ज्ञाना, आत्तापर्यंत आपण समाजापासून दूर होतो. समाजात आपले ऐकणारे कोणीच नव्हते. आपणच लोकांची दूषणे ऐकत होतो. अपमानित होत होतो. पण आता समाज आपण काही सांगावे अशी अपेक्षा करीत आहे. गीता, भागवत, वेद, उपनिषदे यावरील चर्चा विद्वानांसहित सर्वांना खूप भावते असे दिसते. पण हे ज्ञान फक्त उच्च वर्णीय ब्राह्मण समाजातच दिसून येते. या चर्चेसाठी येणाऱ्या लोकांमध्ये सरळ सरळ दोन प्रकार दिसत होते.

एक प्रकारचे लोक संस्कृतचे अभिमानीच नाही तर दुराग्रही. ज्ञानाचा प्रचार इतर वर्गीयांमध्ये होऊ नये अशा मताचे. त्यामुळे समाजातील आपले वर्चस्व कमी होईल अशा भीतीने पछाडलेले. त्यामुळे कर्मकाण्डात गुंतून पडावे असे वाटणारे. लोकांना पापपुण्याचा हिशोब सांगून त्यांना त्रास देण्यात आनंद मानणारे. या सत्ताधारी लोकांच्या विरोधात काहीजण होते खरे पण ते सरळमार्गी, मवाळ वृत्तीचे असल्याने विरोध करण्याचे धाडस नसणारे. त्याशिवाय संस्कृत भाषेच्या अज्ञानामुळे धर्मशास्त्र तसेच वेद-उपनिषदे यातील ज्ञानाबद्दल अज्ञानी असलेले असे लोक. तेव्हा माझ्या मते अशा प्रकारच्या सामान्य लोकांना खऱ्या मार्गदर्शनाची नितान्त गरज आहे.

तेव्हा धर्मशास्त्राचा अर्थ स्पष्ट करून सांगणारा, कर्मकाण्डाचे मर्म कशात आहे हे समजावून सांगणारा, संस्कृत भाषेत असणाऱ्या ज्ञानाची वाट मोकळी करून देण्यासाठी प्राकृतात (मराठीत) ज्ञान देणारा अशा कोणातरी निस्पृह माणसाची आज खरी गरज आहे. जो या वैदिकांच्या ओझ्याखाली दबलेला नाही, दबून जाण्याचीही शक्यता नाही अशा धीरोदात्त पुरुषाची फार फार गरज आहे. आणि ज्ञानदेवा, हे काम तू करावेस असे मला मनापासून वाटते. गुरुदेव गहिनी नाथांनी जो आदेश दिला आहे त्याचे यथायोग्य पालन करण्यासाठी ही सुवर्णसंधी आहे.

ज्ञानेश्वरांसहित तिघांनाही ही कल्पना खूपच भावली. ज्ञानेश्वरांनी तर ती गुरुदेवांची आज्ञाच मानली. म्हणून ते म्हणाले, गुरुदेव, स्वतंत्रपणे वेगवेगळे विषय घेऊन प्रवचने, कीर्तने करावीत की एखादा ग्रंथ घेऊन त्याचा प्राकृतात मोकळा अनुवाद करावा व तो करताना आपल्या मनातील विचारांची सुसंगत मांडणी करणे सोयीस्कर व श्रेयस्कर होईल. आपला विचार सांगावा.

निवृत्तीनाथ म्हणाले 'मला तरी असे वाटते की कोणत्यातरी ग्रंथाचा आधार घ्यावा म्हणजे विचारांची सुसंगत मांडणी करता येईल.'

ज्ञानेश्वरांनी विचारले 'मग असा कोणता ग्रंथ आहे की ज्यामध्ये आज समाजात ज्या समस्या आहेत त्यांना योग्य प्रकारे हाताळता येईल आणि समाजधारणेसाठी आवश्यक असे तत्वज्ञान सांगता येईल व आपले उद्दिष्ट पूर्ण होईल.

सर्वजण विचारमग्न झाले. थोड्यावेळाने सोपान म्हणाला 'दादा, 'भगवद्‌गीता' ग्रंथ घेतला तर कसे होईल?

ज्ञानेश्वर म्हणाले - सोपाना, अगदी माझ्या मनातले बोललास. निवृत्तीनाथांनी मान्यता दिली आणि सर्वानुमते त्यावर शिक्कामोर्तब झाले.

भगवद्‌गीतेची पार्श्वभूमी

पांडव पांच तर कौरव शंभर.

कोणत्याही सुसंस्कृत समाजात लोकप्रिय होण्यासाठी जे सद्‌गुण लागतात ते सर्व पांडवांच्या ठायी होते. पाचही पांडव चारित्र्यसंपन्न. बाह्य प्रतिकुल घटनांनी ते जितके दाबले जात होते तितके त्यांच्यातील सात्विकता, दृढश्रध्दा, प्रेम, सहिष्णुता, चांगुलपणा या गुणांची चढत्याक्रमाने वाढच होत होती.

याच्या अगदी उलट - कौरव. कौरवांतील मोठा दुर्योधन हा तर मत्सरी, दुष्ट, दगाबाज, कारस्थानी. आपली हीन उद्दिष्टे साध्य करण्यासाठी कितीही खालच्या पातळीवर उतरण्यास तयार असलेला.

योग्यवेळी थाटामाटात सार्वजनिक समारंभात युधिष्ठिराला - पांडवातील मोठा - पहिला राजपुत्र - सर्वामध्येपण मोठा - भरत राज्याचा युवराज म्हणून घोषित केले गेले. मोठा राजपुत्र या नात्याने त्याने राज्यकारभार हाती घेतला. भीष्माचार्य, द्रोणाचार्य यांच्या मार्गदर्शनाखाली त्याने राज्याची घडी लोककत्याणासाठी योग्य प्रकारे बसविली.

अर्थातच त्याचा चुलतभाऊ, कौरवांतील मोठा जो दुर्योधन याच्या मनात द्वेषाची धुमसती आग भडकली. त्याने अनेक मार्गाने पांडवांचा काटा काढण्याचा प्रयत्न चालविला.

सर्व बाबतीत चांगला असलेल्या 'धर्मराज' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या युधिष्ठिरामध्ये एक मात्र घातक व्यसन होते ते म्हणजे 'द्युत खेळणे' तो एकदा त्यात रमला की भान हरपून खेळे. कशाचाच विचार न करता वागे. हा दोष हेरून दुर्योधनाने खोटेपणाने खेळणाऱ्या आपल्या मामाच्या - 'शकुनी'च्या मदतीने त्याला द्युतात हरविले. बारावर्षे वनवास व एक वर्ष राज्याबाहेर घालवले.

तेरा वर्षाचा खडतर प्रवास, दु:खीकष्टी जीवन यात्रा संपवून ते राज्यात परतले व त्यांनी आपले राज्य परत मागीतले. तो त्यांचा हक्क होता. पण दुर्योधनाला इतकी वर्षे साम्राज्याचा निरंकुश घेतलेला उपभोग सोडवेना ती सत्ता सोडाविशी वाटेना.

भीष्म, द्रोण यांनी योग्य सल्ला दिला. पण तो त्यांना जुमानेना. कृष्णानेही शिष्टाई केली पण दुर्योधन कोणाचेच ऐकण्याच्या मन:स्थितीत नव्हता. राज्यच काय पण सुईच्या अग्रावर मावेल एवढीही जमीन मी देणार नाही असे तो ठामपणे सांगू लागला.

साहजिकच न्याय मिळविण्यासाठी युध्द करणे अटळ झाले. दोन्ही सैन्ये समोरासमोर उभी ठाकली. त्यांनी आपले शंख वाजवून युध्द पुकारल्याची गर्जना केली. अर्जुनाने श्रीकृष्णाला रथ दोन्ही सैन्याच्या मध्ये उभाकरण्यास सांगितले. हेतू असा की त्याने कोणाशी युध्द करावयाचे ते त्याला नीट ठरविता यावे.

श्रीकृष्णाने रथ दोन्ही सैन्याच्या मध्ये उभा केला. दोन्ही सैन्याचे निरीक्षण करताना अर्जुनाच्या ध्यानी आले की दोन्ही सैन्यात त्याचेच आजोबा, गुरुवर्य, मामा, भाऊ, मित्र असे नातेवाईक पण आहेत. आणि युध्दाला सज्ज झालेल्या अर्जुनाच्या मनात चलबिचल झाली. तो मोहाने ग्रासला, त्याच्या मनात करुणा उत्पन्न झाली. आपल्याच लोकांना मारुन विजय मिळविण्यात काय अर्थ आहे. याविचाराने - अविचाराने तो गोंधळला.

आणि कर्माचरणाच्या पहिल्या पायरीवरच तो अडला. तसे पाहता अर्जुनाने कधी युध्द केले नव्हते, क्षत्रिय धर्माचे पालन केले नव्हते असे नाही. पण कर्तव्य-अकर्तव्य, धर्म-अधर्म, कर्म-अकर्म अशा द्वंदांचा विचार करण्याची मात्र त्याची ही पहिलीच वेळ होती. अशी समस्या अर्जुनासमोर यापूर्वी कधीही उभी राहिली नव्हती. त्यामुळे त्याचा विचार करताना तो भांबावला, गोंधळला, हतबल झाला आणि शस्त्र टाकून देऊन खाली बसला.

अशा हतबल झालेल्या अर्जुनाला कर्तव्य करण्याचा उपदेश करुन कृष्णाने त्याचा विवेक जागृत केला. त्याची वीरवृत्ती जागविली. त्याचा मोह दूर केला आणि कर्तव्य करण्यास प्रवृत्त केले.

अर्जुन क्षत्रिय असल्याने समाजात न्याय-नीतीची प्रतिष्ठापना करणे हे त्याचेच कर्तव्य होते. मग त्यासाठी जे करावे लागेल ते त्याने केलेच पाहिजे. मग कर्तव्य करताना कितीही त्रास झाला तरी मरणप्राय दुःख झाले तरी अगदी मरण पत्करावे लागले तरी.

हा कर्तव्याकर्तव्याचा विचार हाच भगवद्गीतेचा मुख्य विषय आहे.

ज्ञाना, आज समाजातील लोकही आपआपले कर्तव्य विसरत आहेत. दुर्योधनाप्रमाणेच, ज्ञानाचे अधिकारी असलेले लोक कर्तव्य विसरुन, स्वतःच्या मोठेपणाच्या मोहात सापडले आहेत. समाजाला मार्गदर्शन करणारेच मोहवश झाल्याने समाज हतबल झाला आहे. अशा ज्ञानी असूनही कर्तव्य विसरुन वावरत असलेल्या लोकांना स्व-कर्तव्याची जाणीव करून देण्यासाठी, कर्तव्य करीत रहाणेच कसे योग्य आहे याची यथायोग्य जाणीव करून देणारा ग्रंथ म्हणजेच 'भगवद्गीता'.

पण तो ग्रंथ आहे संस्कृत भाषेत आणि समाजातील सामान्य माणसाला 'गीता' जाणून घेण्यासाठी लागणारे संस्कृतचे ज्ञान नाही. त्यामुळे समाज या अमौलिक ज्ञानापासून वंचित होतो आहे. म्हणूनच त्यांना समजणाऱ्या मराठी भाषेतून ह्या ग्रंथाचे स्पष्टिकरण करणे आवश्यक आहे आणि ज्ञानदेवा 'ते काम' तू करावेस असे मला मनापासून वाटते.

निवृत्तीनाथांनी ही कामगिरी ज्ञानेश्वरांवर सोपविली. ज्ञानेश्वरांनी गुरुदेवांची आज्ञा आनंदाने शिरसावंद्य मानली आणि ज्ञानेश्वर करतील ते मराठीपण लिहून घेण्याची कामगिरी 'सच्चिदानंद' बाबांनी स्वीकारली.

भगवद्गीतेतील तत्वचिंतनाचे मराठी भाषेतील स्पष्टिकरण म्हणजेच 'ज्ञानेश्वरी' किंवा भावार्थ दीपिका.

।। श्री कृष्णार्पणमस्तू ।।